# माणूस

शनिवार
२८ डिसेंबर १९७४
एक रुपया



## इचलकरंजी साहित्य संमेलन

### जयप्रकाश आंदोलनाला पाठिंबा व्यक्त करणारा ठराव हवा

या आठवड्यात, दिनांक २६।२७।२८ डिसेंबरला इचलकरंजी येथे श्री. पु. ल देशपांडे यांच्या अध्यक्षतेखाली मराठी साहित्य संमेलनाचा भव्य सुवर्ण–महोत्सवी सोहोळा साजरा होत आहे, ही महाराष्ट्राच्या सांस्कृतिक जीवनातील निश्चितच एक महत्त्वाची घटना आहे.

पाठोपाठ आणखी एक महत्त्वाची घटना महाराष्ट्रात घडत आहे. जानेवारीच्या शेवटच्या आठवड्यात जयप्रकाशजी येथे येत आहेत व पुण्यामुंबईत त्यांचे भरगच्च स्वागत कार्यक्रमही ठरविण्यात आलेले आहेत.

इचलकरंजी येथे साजऱ्या होणाऱ्या पन्नासाव्या सुवर्ण–महोत्सवी अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनात जयप्रकाशांच्या आंदोलनाला पाठिंबा व्यक्त करणारा एखादा ठराव संमत झाला तर सर्वच दृष्टीने हे इचलकरंजी साहित्य-संमेलन ऐतिहासिक ठरल्याशिवाय राहणार नाही असे वाटते. निदान पुण्याहून या संमेलनाला जाणाऱ्या साहित्यिकांनी–पत्रकारांनी असा खास प्रयत्न जरूर करायला हवा.

कारण गेल्या एक ऑगस्टला जयप्रकाशांच्या आंदोलनाला पाठिंबा व्यक्त करण्यासाठी योजलेल्या शनवारवाड्यासमोरील कार्यक्रमात पुण्यातील अनेक साहित्यिकांनी, पत्रकारांनी उत्स्फूर्तपणे भाग घेतलेला होता. संमेलनाध्यक्ष श्री. पु. लं. देशपांडे यांचाही या कार्यक्रमाला मनःपूर्वक पाठिंबा होता. व 'पूर्व नियोजित' दिल्लीभेट नसती तर आपणही या कार्यक्रमात सहभागी झालो असतो असे पत्रही त्यांनी कार्यक्रमाच्या संयोजकांकडे पाठविले होते. एकट्या पु. ल.चे नावच आज इतके मोठे आहे, त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा प्रभाव इतका व्यापक आहे, की त्यांनी व आसपासच्या दोन–चार साहित्यिकांनी ठरविले, थोडाफार पुढाकार घेतला तर जयप्रकाश आंदोलनाला पाठिंबा व्यक्त करणारा ठराव या अधिवेशनात संमत होणे मुळीच अवघड जाऊ नये.

असा पाठिंबा व्यक्त करण्याची, सर्व क्षेत्रातून जयप्रकाशांच्या चळवळीला बळ पोचविण्याची वेळ आली आहे की नाही, हा आता तसा वादाचा मुद्दा उरलेला नाही. जयप्रकाशजींची चळवळ ही एक नैतिक उत्थानाची चळवळ आहे. आपले सार्वजनिक जीवन आज भ्रष्टाचाराने किडलेले, बरबटलेले झाले आहे; हे शुद्ध केल्याशिवाय आपल्या लोकशाहीला, राष्ट्रवादाला, विकासालाही अर्थ नाही, या जाणीवेतून जयप्रकाशांचे आंदोलन उभे राहिले व ही जाणीव सार्वत्रिक असल्यामुळे ते इतक्या अल्पावधीत, इतक्या झपाट्याने सर्वत्र पसरले. राजकीय मतभेदाचाही हा मुद्दा उरलेला नाही. राजकीय सत्तेला काही नैतिक अधिष्ठान हवे की नको असा स्वच्छ व सनातन सवाल जयप्रकाशजी उपस्थित करीत आहेत, आणि गांधीनेहरूंच्या भारतात तरी या सवालाला होकारार्थी उत्तरच अपेक्षित आहे, अवश्य आहे. जयप्रकाशांच्या अवतीभवती कोण मंडळी आहेत हा प्रश्नही येथे गौण आहे. आंदोलन उद्या कोणते वळण घेणार याबद्दलही वाद घालण्यात आज अर्थ नाही. जयप्रकाशजी एका नैतिक प्रेरणेचे आज प्रतीक बनले आहेत आणि भारतीय जीवन शुद्ध आणि समृद्ध व्हावे असे ज्यांना ज्यांना वाटते त्यांनी पक्ष, वर्ग, प्रांत, भाषा हे भेद उल्लंघून त्यांना मनःपूर्वक पाठिंबा देण्याची ही वेळ आहे. साहित्य संमेलनासारख्या प्रतिष्ठित, सांस्कृतिक व्यासपीठावरून असा पाठिंबा व्यक्त होण्यात तर फार मोठा अर्थ आहे. भ्रष्टाचाराला सोकावलेला वर्ग यामुळे हळुहळु उघडा व अलग पडत जातो आणि लोकशाही यंत्रणेवरचा जनतेचा विश्वास टिकून राहतो. जनता आज चारित्र्यसंपन्न नेतृत्वाची अपेक्षा करीत आहे आणि जयप्रकाश हे या चरित्र्यसंपन्नतेचे एक सर्वमान्य प्रतीक ठरले आहेत. या प्रतीकाला वंदन करण्यात 'साहित्यबाह्य' असे काय आहे? ◻



फाशी देणाऱ्या मांगांकडून आम्हीं आमचे सम्राट घडवितो आहोत !
केवढे लज्जास्पद दुर्भाग्य आहे !
असल्या खुन्यांनी वेढलेल्या राजांना आम्ही पदच्युत करतो....

**अलेक्झांडर**
**सर्जीव्हिच**
**पुष्किन**

●

प्रदीर्घ लेख

सौ. सुमती देवस्थळे

पृष्ठ ११

# साप्ताहिक माणूस

| संपादक | साहाय्यक | शनिवार | वर्ष : चौदावे |
|---|---|---|---|
| श्री. ग. माजगावकर | दिलीप माजगावकर | २८ डिसेंबर | अंक : एकतिसावा |
| | सौ. निर्मला पुरंदरे | १९७४ | किंमत : एक रुपया |


सोलकढी

## □ पुस्तके दोन; बक्षीस एक

बेडेकर जसे लोणच्याकरता, किर्लोस्कर जसे पंपांकरता, बिटको जसे माकडछाप काळया दतमंजनाकरता, तसे केशवराव कोठावळे 'मॅजेस्टिक' लॉटरीच्या तिकिटाकरता; महाराष्ट्रात 'मशहूर' (हा शब्द 'महशूर' असाही उच्चारतात–लिहितात हे धोरण अन्य काही शब्दांच्या बाबतीत आपण का दाखवू नये ?) आहेत. 'मॅजेस्टिक' असा छाप असल्याची खात्री करून घेतलेल्या महाराष्ट्र–राज्य लॉटरीच्या इतक्या तिकिटाना बक्षिसे लागली आहेत की असा छाप नसलेले एखादे तिकिट चुकून बक्षिस पात्र ठरले तर त्या तिकिटावर मागाहून असा छाप मुद्दाम मारण्यात येतो, असे म्हणतात. ज्यांना सरकारी बक्षीस लागत नाही त्याना केशवराव कोठावळे उत्तेजनार्थ 'मॅजेस्टिक' बक्षिसे देतात. एकूण बक्षिसे देण्याची अनावर हाव या माणसाला आहे असे दिसते. (मराठी माणसाला हे शोभत नाही.)

अलीकडे त्यांनी दरवर्षीच्या सर्वोत्कृष्ट मराठी पुस्तकाला नगद एक हजार रुपयाचे पारितोषिक द्यायचा अभिनंदनीय उपक्रम आरंभला आहे. तसा पुस्तकाशी केशवरावांचा आज तीस वर्षांचा संबंध आहे. सुरुवातीला ते जुनी पुस्तके विकत असत (आणि फादर स. गं. मालशे ती विकत घेत असत.) जुनी पुस्तके पायपथावर विकावी असे भगवतानी भगवद्गीतेमध्ये सांगून ठेवले असल्यामुळे केशवरावानी गिरगावच्या 'मॅजेस्टिक' सिनेमागृहासमोरच्या पायपथावर जुन्या पुस्तकांचे दुकान थाटले. मग ते नवी पुस्तके विकू लागले. त्यासाठी पायपथ सोडून त्याच्या कडेला रीतसर दुकान माडावे लागले. नवी पुस्तके खपू लागली तेव्हा आपणच नवी पुस्तके निर्माण का करू नयेत असा, मराठी माणसाला न शोभणारा, विचार केशवरावांच्या डोक्यात आला. त्यातून 'मॅजेस्टिक प्रकाशनाची'ची स्थापना झाली. आज 'मॅजेस्टिक प्रकाशना'ने पुस्तकाच्या दुनियेत केवढा दरारा बसवला आहे. अहो, या वर्षी ज्या दोन पुस्तकाना 'मॅजेस्टिक पारितोषिके' मिळाली आहेत ती दोन्ही पुस्तके 'मॅजेस्टिक प्रकाशना'नेच प्रसिद्ध केली आहेत. (१) स्मरण गाथा : गोपाल नीलकठ दाडेकर (२) मुबई दिनाक : अरुण साधू.

एक लोकलाडकुटा मराठी लेखक म्हणून गोपाल नीलकठ दाडेकर उभ्या (आणि आडव्यासुद्धा) महाराष्ट्राला ठाऊक आहेत. महाराष्ट्राला आणखी कोणकोण म्हणून सुद्धा दाडेकर ठाऊक आहेत. या माणसाला पॅलूच फार: दाडेकर लिहितात; बोलतात; कथाकीर्तनप्रवचन करतात; नाचतात; भ्रमती करतात; नाटके करतात, छायाचित्रे काढतात, उपरली जमवतात; अत्तरे फोकतात; हवे तेव्हा (आणि नको तेव्हाही) चवीचवीने मिटक्या मारत रडतात; धरतीला गुदगुल्या करतात; आकाशाचा गालगुच्चा घेतात. शिवाय ? इत्यादी वगैरे. आणि हे सगळे एखाद्याच्या गालाना खळया पडाव्या तितके सहज. कृत्रिमतेचा लवलेश त्यात नाही. ज्याच्या लिहिण्याबोलण्यावागण्याला कृत्रिमतेच पर्श नाही असे हे निसर्गाचे लख्ख ‑ करू आहे म्हणूनच रागडधा महाराष्ट्राने ‑ना डोक्यावर घेतले असेल. गोपालरामाचे 'स्मरणगाथा' हे आत्मचरित्र चांगले वाचनीय आहे. आत्मचारित्रिक दृष्ट्या ते कसे आहे किंवा मराठी आत्मचरित्र वाङ्मयात त्याचे स्थान कितवे आहे, याचा ऊहापोह करून महाराष्ट्रातल्या मायमराठीच्या त्या अभ्यासू प्राध्यापकाच्या सुरक्षित क्षेत्रावर मी अतिक्रमण करू इच्छित नाही. मी एवढेच म्हणतो की या आत्मचरित्रातले 'चरित्र' भलतेच वेगळे आहे. 'स्मरणगाथे'त गोपालरामांनी अवघ्या तीस वर्षांची हकीगत सांगितली आहे. पुढल्या वर्षांची हकीगत सागण्यासाठी दाडेकरांना आणखी दोन पाच खड लिहावे लागतील असे दिसते. दांडेकर ते लिहितील; 'मॅजेस्टिक' कोठावळे ते प्रसिद्ध करतील; मराठी मंडळी ते वाचतील. आपण फक्त टाळया वाजवायच्या.

अरुण साधू नावाचा शिकाजांभया देणारा खराखुरा माणूस असेल याची मला कितीतरी दिवस कल्पनाच नव्हती. साप्ताहिक 'माणूस'मध्ये हे नाव दिसायचे. ते टोपणनाव असणार असे मी ठरवून टाकले होते. मराठी साप्ताहिकात आढळणाऱ्या नावात खरी कोणती आणि टोपण कोणती याचा नेमका बोध मला तरी होत नाही. उदाहरणार्थ 'नारायण आठवले' हे नाव मला खरे वाटायचे तर 'दादुमियाँ' हे टोपण वाटायचे; आता बोला. 'अनंतराव' हे नाव तर मला कधी खरे तर कधी टोपण वाटते. असो. तर एकदा अरुण साधू या खऱ्या नावाच्या खऱ्याखुऱ्या माणसाशी ओळखच झाली. तेव्हा साधूबुवाच्या नावावर एकदोन पुस्तके आणि काही लेख जमा झाले होते. त्याचे काही विशेष वाटले नाही. पण ते इंग्रजी दैनिकात वार्ताहरी करतात हे कळल्यावर त्यांच्याशी अदबीने बोलू लागलो. पुढे त्यांच्या घरी गेलो तेव्हा मेजावर इंग्रजी टकलेखन यत्र पाहिले. त्या टकलेखन यत्रापुढे बसून अरुण साधू हा मूळ अमरावतीचा मराठी माणूस दोन दोन हातांनी काडकाड इग्रजी टकावतो, अशी आख्यायिका ऐकली

आणि अरुण साधूंबद्दलच्या आदराने माझी बोबडीच वळली. अशा बोबडिल्या मनस्थितीत असतानाच एक दिवस अरुण साधूची 'मुंबई दिनाक' ही कादंबरी प्रसिद्ध झाली. नवल म्हणजे ती सगळ्यांनाच आवडली. कोणाला ती वेगळी आहे म्हणून आवडली, तर कोणाला ती वेगळी नाही म्हणून आवडली; कोणाला आजचे जिवत वास्तव तिच्यात आहे म्हणून ती आवडली, तर कोणाला ती 'आज'च्या आणि 'वास्तवा'च्या पलीकडे जाते म्हणून आवडली; कोणाला तिचा आशय अर्थपूर्ण वाटून ती आवडली, तर कोणाला तिची रचना लक्षणीय वाटून ती आवडली; कोणाला ती 'ग्रेट' आहे म्हणून आवडली, तर कोणाला ती 'इम्मेन्सली ग्रीडेबल' आहे म्हणून आवडली. ज्या एकाच माणसाला 'मुबई दिनाक' ही कादंबरी आवडली नाही तो माणूस म्हणजे स्वत. अरुण साधू (साधूचे मित्र त्याना 'भोदू' या नावाने हाक मारतात म्हणे). ही लेखक मंडळी अशीच टरबुजी असतात. कालिदासाला आपले 'मेघदूत' आवडले नव्हते; विजय तेंडुलकरांना स्वतःची नाटके आवडत नाहीत.

. अरुण साधूची ही कादंबरी सर्वांना आवडली इतकेच नव्हे तर चांगली-वाजली गाजली. तिच्यावर मुबलक परीक्षणे लिहिली गेली; तिची दुसरी आवृत्ती इतक्यात निघणार की काय असे बाकीचे लेखक धास्तावलेल्या आवाजात विचारू लागले; महाराष्ट्रराज्य-नाट्यस्पर्धेत 'मुबई दिनाक'वर आधारलेले नाटक सादर केले गेले (ते नाटक त्या कादबरीला न्याय देऊ शकले नाही असे जाणकारमडळी पुटपुटताना मी ऐकले आहे); तिच्यावर चित्रपटसुद्धा निघेल असे बोलले जाऊ लागले, तिला पारितोषिके मिळाली.

तीनपासून पचवीस सत्तावीस वयापर्यंतच्या तीन मुली आणि एक चालणारे इग्रजी टकलेखनयत्र या कुटुबियाचा सांभाळ करत तिशीबत्तिशीच्या एका खऱ्याखुऱ्या साधूने एवढी घसतशीत कादबरी लिहिली याबद्दल मी त्याचे ढामढुम अभिनदन करतो.

दरवर्षी सर्वोत्कृष्ट अशा एका पुस्तकाला हजार रुपयाचे बक्षीस द्यायचे 'मॅजेस्टिक'च्या कोठावळ्यांनी ठरवले आहे. यावर्षी 'स्मरणगाथा' आणि मुंबई दिनांक' ही दोन्ही पुस्तके सारखीच सर्वोत्कृष्ट आहेत, असे पारितोषिक-समितीला वाटले. प्रसंग बाका होता. सर्वोत्कृष्ट ठरूनच्या ठरून लेखकांना पाचशे रुपये गमावावे लागणार होते. पण केशवराव कोठावळ्यानी मराठी माणसाला शोभेसे प्रसंगावधान आणि मराठी माणसाला न शोभेसे औदार्य दाखवून सारे साजिरे गोजिरे केले

एकच पारितोषिक या दोन पुस्तकाना मिळाले, या घटनेवर भाष्य करताना (खरे तर तोंड टाकताना) आमचे एक मित्र म्हणाले .

'स्मरण गाथा' ही गोपाल नीलकंठ दांडेकराची कादंबरी आहे.

आणि

'मुबई दिनांक' ही अरुण साधूची स्मरणगाथा आहे.

अरेच्चा ? हे असे आहे काय ?

—अनंतराव

---

मुक्काम भंडारा

## आम्ही देऊळगावचे जमीनवाटप करतो

गोविंदराव शिंदे

भंडारा जिल्ह्यात वायव्येकडील कोपऱ्यात जगलाला लागून देऊळगाव नावाचे पचेचाळीस घराचे छोटेसे गाव आहे. गरीब शेतकरी भूमीहीन शेतमजूर, आदिवासी व हरिजनाची वस्ती असलेले हे गाव. रात्रदिवस काबाड कष्ट करावेत व कसे तरी भागवावे असे चालले आहे. गावची अर्धी अधिक जमीन आहे नागपूरच्या श्रीमत नाईक साहेबाची. त्याच्या शेतीत मोलमजुरी करून जे मिळेल ते घ्यायचे—असे येथल्या गरिबाचे चालले आहे. स्वराज्य आले. कूळकायदा झाला. आणखी अनेक कायदे झाले. देऊळ गावची स्थिती कायम. १९६१ साली महाराष्ट्र सरकारने सीलिंगचा कायदा केला. आता जमीन कोठे लपवणार? शेवटी कायद्यातून पळवाटा काढता काढता सत्तावीस एकर जमीन नाईक साहेबांची वाटायला निघाली. आणि ती केव्हा? तब्बल दहा वर्षांनी.

जमीन वाटप म्हणजे सरकारी अधिकाऱ्याना पर्वणी. विशेषत तलाठी पटवारी तहसीलदाराना. या गावच्या पटवाऱ्याने या जमिनीचे गपचिप वाटप करून टाकले. तहसीलदारानी गावात न येताच त्याला मंजुरी देऊन टाकली. सारेच भागीदार एत्रढी घटना घडल्यावर गावात खळबळ सुरू झाली. गरीब लोक राहिले बाजूला, ज्यानी पटवाऱ्याला पैसे दिले त्याला जमीन मिळाली. गरीब लोकाना कोण वाली? तरी त्यानी एक अर्ज कलेक्टरकडे करून टाकला. एक अर्ज महसूलमत्र्याकडे पाठवला. त्याची काहीच दाद नाही. मग सर्व मिळून कलेक्टरकडे धीर करून गेले. सर्व हकीगत सागितली. झालेले वाटप योग्य आहे, उगाच तक्रारी करू नका असे उत्तर मिळाले. बिचारे हात चोळीत परत आले. ते तरी अधिक काय करणार? गरिबांचा कोणीच वाली नाही असे मानून गप्प बसले झाले.

त्याच सुमारास सर्वोदयाचे कार्यकर्ते त्या गावात हिंडता हिंडता गेले. गावकऱ्यानी एक प्रयत्न म्हणून त्यांना या जमीन वाटपाची कथा सागितली. कार्यकर्त्यांना आश्चर्य वाटले. व त्यानी सर्व परिस्थिती समजावून घेतली. त्यासाठी सर्वांना एकत्र बोलावले. सभा सुरू झाली. एक एक जण आपली तक्रार सागू लागले. बोधू टिलूची बायको रडत रडत सागू लागली. जमीन पाहिजे तर पाचशे रुपये दे, म्हणजे जमीन देतो, असे पटवाऱ्याने तिला सरळ सागितले होते. ती कुठून देणार एवढे पैसे? पण जमीन मिळत होती. शेवटी तिने दोनशे रुपये कर्जाऊ मिळवले. पुरे पाचशे रुपये पाहिजेत त्याशिवाय जमीन मिळणार नाही असे पटऱ्याने चक्क सांगितले. मग त्या माऊलीने आपल्या अगावरचे खिडुक मिडुक जे होते ते दिले. पटवाऱ्याने तिला जमीन दिली. पण इमान राखले नाही. जमीन दिली माल

पृष्ठ ३२ वर

आसपास

# टी. व्ही.

## ( तद्दन वेडेपणा )

आपले पूर्वज शहाणे—त्यातल्या त्यात आपण व्यास नामक वल्लीला मानून आहोत. परधर्मो भयावह. असे त्यानी जे म्हणून ठेवले आहे त्याचा मला किती वेळा अनुभव यावा ? अगदी भयावह. वगैरे सगळे रीतसर.

ताजाच प्रकार सागतो. मी गेली अडीच वर्षे व्याख्यात्याचे काम करीत होतो. माझ्या अस्ताव्यस्त खाक्याप्रमाणे कोणत्याही लेक्चरची कधीही कसलीही पूर्वतयारी करीत नसे. (लिहिताना देखील आपल्याजवळ पूर्वतयारी—आराखडा रफ-फेअर वगैरे काही नाही) वर्गात जायचे-दोन तास तोंडाचा पट्टा चालू-आर्थिक, इतिहास, समाजवाद, लोकशाही, समूहाचे मानसशास्त्र असख्य भानगडी ! मी बडबडे—विद्यार्थी ऐकत—तोंडावर अवर्णनीय असा आत्मरत भाव ठेवून. कधी विस्फारलेली नजर—कधी दाद दिल्यासारखी हलवलेली मान—कधी चक्क प्रामाणिक जांभया. एकदर आमचे बरे चालले होते.

एक दिवस आम्हाला अवदसा आठवली. पाच-सहा नेहमीच्या विषयावर मुद्देसूद टिपणे काढून नमुनेदार व्याख्याने तयार केली. टाईप करून घ्यावी असा विचार करीत होतो तोच व्याख्यात्याच्या जागेवरून बदली झाली. परधर्मो भयावह :!

आमचे एक सोडा. परधर्म गळ्यात घेतला की भल्याभल्याचे काय होते ते मी वर्षभर पहात आहे.

आमचे एक मित्र—वाचन अद्यावत—अत्याधुनिक विचारसरणी—गप्पा मारण्याचा खासा शौक. त्याच्याकडची सध्याकाळ म्हणजे तीन तास कसदार गप्पा आणि तीन कप चवदार चहा असे समीकरण. एके संध्याकाळी त्यांच्याकडे गेलो. बैठकीच्या खोलीत घरातली सगळी मडळी गोळा झालेली होती. डोळे भिंतीच्या एका कोपऱ्यात टी. व्ही. नामक खोक्याकडे पहात बसलेले होते. गेल्यावर मला एक सीट देण्यात आली. कोणीतरी अलगद येऊन चहाचा कप आणून ठेवला.

समोर पडद्यावरचा प्रकार—काही मिनिटे कावळ्याच्या छत्र्यांची लागवड—मग मानसिक दृष्ट्या अधु मुलांचा कार्यक्रम, मग चक्क नॉर्वे स्वीडन कुठल्यातरी सीनरीच्या तजबीरी.

डोळे दुखू लागले. पाऊण तास झाला—आमच्या मित्राचे डोळे-कान समोरच्या खोक्यावरून हलेनात. मी जिवाचा धडा करून म्हटले,

'जे. पी. चे कालचे स्टेटमेंट जरा...'

मित्रानी माझ्याकडे पाहून शूक केले. नजर समोर.

पधरा मिनिटांनी उठलो. सुस्कारा टाकून निघणार तोच मित्रपत्नी म्हणाल्या, 'उद्या या—छायागीत आहे' मित्रही तोंडभरून हसले 'हो हो या उद्या !'

हे एक प्रकरण जरा विस्ताराने वर्णन केले. असे अनेक प्राणी आहेत. त्यांची सख्या वाढते आहे. गाण्याचा अस्सल शौक करणारे, मैदानी खेळाची करीयर असणारे, अट्टल बुद्धीवादी, अट्टल गपिष्ट अशा अनेक प्रकारच्या मित्राचे हे 'असे' झाले आहे. सात ते दहा डोक्याचे खोके आणि समोर ते खोके ! सगळी नाती, सगळे सबध, सगळा सोशलनेस खलास होऊन समोरची चित्रे पहात बसणे असे एका अर्थाने खुळचट एकलकोंडेपण अनेकांना घेरून राहिले आहे. आपापले स्वधर्म मूळ स्वभाव सोडून हा टी. व्ही. चा परधर्म गळयात पडला आहे.

एक उथळ, सवंग, उद्धट आणि निर्बुद्ध असे टी. व्ही. कल्चर झपाट्याने वाढत आहे. उसना स्मार्टनेस, सर्वज्ञपणा बळावत आहे.

असेच एक दृश्य—सिक्कीमविषयी डिस्कशन चालू आहे. मुरब्बी राजनीतिज्ञ इदर मलहोत्रा व इतर चार बुजुर्ग बोलताहेत.

'ए, त्याचा डोळा कसा आहे नाही.'

'आणि त्याचा आवाज किती बकाल आहे.'

बाळगोपाळाच्या कॉमेंटस चालू आहेत. एक अक्षर समजत नाही. पण टी. व्ही. समोरून उठण्याचे नाव नाही.

दुसरे दृश्य—उस्ताद अमजाद अलिखा सरोदे वाजवीत आहेत.

'त्याचे नाक कसे दिसते नाही.'

'आणि माना तरी कशा हलवतो हा—हा—हा !'

तिसरे दृश्य—शोभा गुर्टू अगदी जमून एक मराठी गझल म्हणत आहेत.

'ए—काय म्हैस आहे रे'

'साडीचा पदर केवढा ग बाई'

अशा कॉमेंट्स रोज घरोघरी झडत आहेत. टी. व्ही चे पैसे आई बापानी मोजले एवढ्या जोरावर रविशंकरपासून ते कमलेश्वरपर्यंत सर्वांची मापे काढली जात आहेत. सात ते दहा टी. व्ही. चालू आहे.

वर्षानुवर्षाची उग्र कलासाधना जन्मभराचा विद्याव्यासग, जिवाचे कान करायला लावणारी एकादी शब्दाची फेक, चमकून टाकणारी एकाद्या नामदेव ढसाळची कळकळ या साऱ्या साऱ्याची विल्हेवाट, सात ते दहा मधील एक 'दृश्य' म्हणून लावली जात आहे.

गायकाचा स्वर पहावा, विज्ञानाचे विचार पहावे, खेळाडूची मागची सगळी करीयर लक्षात घ्यावी, कवीचा शब्द पहावा हे भान सुटत आहे. नाकाचा आकार, केसाची रचना, हातवारे, माना हलविणे यावर जीवनातील सगळ्या साधनेची बोळवण होत आहे.

'एक दृश्य' याच एका बुद्धीने जीवनाकडे, सत्याकडे, कष्टाकडे, प्रतिभेकडे बघण्याचा सराव होत आहे. मोठा सदर्भ सुटून, अख्खं जीवन दोन बाय दीडच्या पडद्यावरच अनुभवण्याचा हा प्रयत्न मोठा भयानक परधर्म आहे.

वयाच्या दोन वर्षापर्यंतची मुले आसमताकडे 'एक दृश्य' म्हणून पहात असतात—टी. व्ही. कल्चरमधील जमातीचे मानसिक वय दोनपर्यंत घसरले आहे. निरुद्देश अगठा चोखीत बसणे आणि तीन तास टी. व्ही. ला चिकटून बसणे यात तसा फारसा फरक नाही. 'फेटीश' असे या क्रियेचे शास्त्रीय नाव आहे.

टी. व्ही. ने ज्ञान व मनोरजन प्राप्त होते म्हणे. ज्ञान मिळविण्याचे मार्ग वेगळे व मनोरजनाचे मार्ग वेगळे, या दोहोंच्या अतिरिक्त खिचडीने उथळपणाखेरीज पदरी काही येणार नाही हे आपल्या पूर्वजानी जाणले होते—म्हणूनच प्रारभी त्यांना 'शहाणे' म्हटले.

टी. व्ही. ने जीवनात काय हॅवॉक होऊ शकतो याचे सामाजिक अध्ययन युरोप-अमेरिकेत खूप झाले आहे. या यंत्राला 'इडियट बॉक्स' असे नाव आहे ते उगाच नाही. आपल्याला हे सारे शिकायचे आहे. टी. व्ही. च्या पडद्यावरच सारे काही शिकता येईल या पहिल्या अवस्थेत आपण आहोत. जबर किंमत दिल्यानंतरच आपला नियोजित क्लास पुढच्या अवस्थेत प्रवेश करणार की त्याशिवाय काही शिकणार हा मिलियन डॉलर क्वेश्चन आहे.

मी थोडा अतिरेक करीत आहे असे कोणास वाटेल. पण टी. व्ही. पाहाण्याचे अजून खूप किस्से मी येथे नोंदले नाहीत. ते जर का नोंदले तर मी अतिरेक करीत नसून फारच सौम्य प्रतिक्रिया व्यक्त करीत आहे असे वाटेल. असो. उपदेश करणे हा आपला धर्म नाही. केवळ काही नोंदी करणे हे आपले काम. तेथेच थाबू !

—चंद्रशेखर

# वंग रंगभूमी

## महानगर कलकत्ता

वि. भा. देशपांडे

लेखांक दोन

मराठी माणसा इतकाच बंगाली माणूस नाटकवेडा आहे. तिथल्या समाजमनाशी आणि मातीशी ते नाटक मूळ धरून आहे. केवळ नाटक करण्याकरिता दहा-बारा स्वतंत्र थिएटर्स आहेत आमच्या मुक्कामात आम्ही प्रत्यक्ष नाटक पाहिली, रंगभूमीच्या संदर्भात काम करणाऱ्या अनेक लहान मोठ्या मंडळींना भेटलो, खूप बोललो. काही काळ त्यांच्या संगतीत राहिलो, काहींच्या तालमी पाहिल्या. ज्या ज्या माणसाला भेटण्याची इच्छा व्यक्त केली तो तो भेटला. भेटण्यासाठी आढेवेढे नाहीत, तिष्ठत राहणं नाही, इतकंच नाही तर प्रत्येकानं आपलं नाटक आम्हाला सन्मानीत पद्धतीनं निमंत्रण देऊन दाखवलं. प्रयोगाच्या आधी–नंतर आमच्याशी चर्चा केली. उत्पलदत्त, बादल सरकार, तृप्ती मित्र, तरुण राय, नितीश सेन, असित बसू, प्रत्येकाच्या तोंडी पु. ल. चं आणि तेंडुलकरांचं नाव. पु. ल. च्या नावाचा तर सतत उपयोग होत होता. आम्ही तो चांगल्या कारणांसाठी करून घेत होतो. बंगाली रंगभूमीतला प्रत्येक महत्त्वाचा माणूस पु. ल. व्यक्ती आणि त्यांची कलाकृती यावर आवर्जून बोलत होता. ते सारं पाहून–ऐकून भारून गेलो. एका मराठी कलावंतानं बंगाली कलाकाराची जिंकलेली मनं पाहून अभिमान वाटला. तिथंच लक्षात आलं की, पु. ल. देशपांडे हे आता केवळ मराठी माणसाचे राहिले नाहीत तर भारतातल्या सर्व प्रांतातल्या कलावंताचे सुहृद बनलेत....

एकूण दहा प्रयोग पाहिले. आठ नाटकाचे आणि दोन जात्रांचे प्रयोग. १) 'पूर्वसारथी' संस्थेचं–'परीकल्पना' आणि 'सन्याशी' २)'अदाकार'चं 'बूरे फांसे' ३)'सी. पी. ए. टी.'चं–'कलकत्तेर हॅम्लेट' (हॅम्लेट कलकत्त्यात) ४) उत्पल दत्त यांच्या पी. एल. टी. संस्थेचं 'दुःस्वप्ननगरी' ५) 'टीनेर तलवार' ६) 'बॅरीकेड.' ७) तरुण राय यांच्या थिएटर सेंटरचं 'अथ तो सयुक्त' ८) नंदीकार'चं 'भालो मानूस' ९) 'अग्रगामी' संस्थेचा जात्रा प्रयोग– 'के ठाकोर डाकात.' (ठाकूर डाकू) आणि १०)'नाट्टो कंपनी'चा जात्रा प्रयोग–'मा माटेर मानूस' (आई, माती आणि मनुष्य).

नाटक पाहाताना भाषेच्या प्रश्नानं काही वेळा अडचणीच झाल. बऱ्याच वेळा नाटक सुरू होण्यापूर्वी दिग्दर्शकाला किंवा तशाच कोणा महत्त्वाच्या व्यक्तीला भेटून नाटकाचा विषय, मध्यवर्ती कल्पना आणि काही महत्त्वाच्या गोष्टी विचारून घेत असू. त्यातूनही जर काही कळू शकलं नाही तर नाटक संपल्यावर पुन्हा खुलासा करून घेत असू. इतकं होऊनही काही शब्द, कल्पना निसटत असत. विशेषतः शाब्दिक विनोदाचा भाग जात असे. शाब्दिक कोटी किंवा त्यावरचा विनोद झाल्यावर लोक हसत आम्ही स्वस्थ, असही काही वेळा व्हायचं. पण भाषेअभावी जाम वैतागलो मात्र नाही. एकतर बंगाली भाषा ऐकायला अति मधुर आहे. तीत काठिण्य नाही. बरेच संस्कृत शब्द आहेत. तेव्हा पूर्ण अवधान देऊन ती भाषा ऐकली की किमान समजू शकते.

बंगाली रंगभूमीवरचं बरंचसं नाटक राजकीय विषयाला जवळचं आहे. आजच्या कलकत्त्यात राजकीयदृष्ट्या जे घडतंय ते नाटकात दिसतं. नाट्यविषयामधलं हे वेगळेपण सोडलं तर संवाद, नाट्यरचना या दृष्टीनं आपल्यापेक्षा अधिक पुढचा टप्पा त्यांनी गाठलाय असं दिसलं नाही. निदान आम्ही पाहिलेल्या नाटकात तरी! महत्त्वाचा फरक आहे तो हाच की आपण शाश्वत–वैश्विक मूल्यांचं दर्शन नाटकरूपानं दाखवण्याच्या धडपडीत असतो, 'अक्षर वाङ्मया'च्या दृष्टीनं नाट्य साहित्याकडं पाहातो आहोत तर ती मंडळी आजच्या जीवनाचं चित्रण नाट्यरूप करण्याच्या उद्योगात आहेत. राजकीय विषयाचं तत्त्वज्ञान नाट्यरूप करण्याचा विचार विशेष गांभीर्यानं आपल्याकडं नाही. अजून तरी तशी निकड आपल्याला भासत नाही. त्यांना ती भासली आहे. इतकंच नाही तर विशिष्ट प्रकारचं तत्त्वज्ञान नाट्यरूपानं लोकापर्यंत पोहोचवण्याची त्यांची प्रतिज्ञा आहे. त्या बोधाला, प्रचाराला कलेचं आवरण आहे...

आजचं बंगाली नाटक लक्षात राहतं ते म्हणजे प्रयोग तंत्रातील अनेक विशेषांमुळं. नेपथ्य, प्रकाशयोजना, ध्वनियोजना इत्यादींमुळे प्रेक्षक थक्क होतो. तापस सेन हा तिथला महत्त्वाचा माणूस. स्थिर आणि फिरती प्रकाशयोजना करून अनेक चमत्कार तो रंगभूमीवर घडवतो. त्यानं केलेली प्रकाशयोजना पाहणं ही एखाद्या अभिजात अभिनय करणाऱ्या नटाला रंगमंचावर पाहण्याइतकं आनंदाचं मानलं जातं. श्रेयनामावलीत त्याच्या नावाला विशेष अर्थ प्राप्त झालेला आहे. नट-नाटककार-दिग्दर्शक यांच्या बरोबरीनं त्याची प्रसिद्धी आहे. सध्या कलकत्त्यात व्यावसायिक रंगभूमीवर लोकप्रिय असलेले 'मल्लिका' हे नाटक ज्या अनेक कारणांनी पाहिलं जातं, त्यामध्ये तापस सेनची प्रकाश योजना हे एक महत्त्वाचं कारण. इतकं त्याचं महत्त्व. आपल्याकडं 'तुघलक'च्या प्रयोगासाठी त्याचा उपयोग झाला होता.

आम्ही पाहिलेल्या नाटकामध्ये प्रकाशयोजनेचे–नेपथ्याचे अनेक तंत्र-विशेष होते. पहिल्याच दिवशी ज्या दोन एकांकिका पाहिल्या (परीकल्पना-सन्याशी) त्यामध्ये रंगभूमीवर नटाबरोबर प्रकाशझोत हालताना पाहून वेगळेपण तर वाटलेच. पण नाट्यास्वादामध्ये व्यत्यय येतोय असंही जाणवलं. पण पुढे इतर चांगले प्रयोग पाहाताना त्या प्रकाशयोजनेचे काही फायदेही कळाले. स्थिर प्रकाश योजनेने नटाला

रंगभूमीवर वावरण्याची मर्यादा पडते. उलट फिरती प्रकाश योजना त्या नटाबरोबर जात असल्यानं तो रंगमंचावर मुक्तपणानं वावरू शकतो. ध्वनी आणि प्रकाश यांच्या साह्यानं अनेक आभास निर्माण करण्याचीही धडपड मोठ्या प्रमाणात आढळली. ध्वनी-प्रकाशाबरोबरच प्रोजेक्टरच्या साह्यानं चित्रदर्शनही केलं जात होतं. 'कलकत्तेर हॅम्लेट 'मध्ये या सर्वच साधनांचा वापर परिणामकारक होता. 'भालोमानूस 'मध्ये प्रेक्षकांच्या डाव्या आणि उजव्या बाजूस असलेल्या गॅलऱ्यांमधून पात्रांना उभे करून नाट्यपरिणाम साधण्यात आला. प्रत्यक्ष रंगमंच, त्याचा पुढचा भाग, प्रेक्षागृह, गॅलरी वगैरे सर्व गोष्टींचा वापर केला जात होता. संगीताचा वापर काही प्रमाणात होता. प्रत्यक्ष रंगमंचावर गाणं म्हणून नाट्याशय व्यक्त केला जात होता. उत्पल दत्तांच्या नाटकात असा वापर विशेष.

विषय–आशय या दृष्टीनं आणखी दोन विशेष आढळले– एक म्हणजे 'हॅम्लेट' या पात्राचा, नावाचा आणि नाटकाचा प्रत्यक्ष उल्लेख आणि वापरही. 'कलकत्तेर हम्लेट 'मध्ये तर दिग्दर्शकाला हॅम्लेट भेटल्याचा भास सतत आहे. उत्पलदत्तांच्या नाटकात हॅम्लेटचा उल्लेख आहे. तर एक सत्तरीतला नाटककार मुखोपाध्याय मूळ हॅम्लेट जसच्या तस बंगालीत सादर करीत होता. म्हणजेच त्यांच्या मनातलं हॅम्लेटचं प्रेम कमी होत नाही. ते निरनिराळ्या पद्धतीनं अजूनही व्यक्त करावंस वाटतंय. यामध्येही कलात्मक अर्थ जरूर आहे. दुसरा एक विशेष म्हणजे नक्षलवाद्यांचं रंगभूमीवरचं दर्शन. उत्पल दत्तांच्या नाटकात पोलिसांनी जनतेचा–नक्षलवाद्यांचा केलेला छळ आहेच. तर तरुण रॉय यांनी सादर केलेल्या 'अथ तो संयुक्त' मध्ये कवी, वेश्या, नक्षलवादी शेवटी एकत्र येतात हेच प्रामुख्यानं दाखवलंय.

प्रयोग तंत्रामध्ये अमाप कीर्ती मिळवली ती उत्पल दत्तांनी. अर्थात केवळ तेवढाच त्यांचा विशेष आहे असं नाही. पण त्यांचा प्रयोग पाहाणं हा एक 'अनुभव' आहे. प्रचारकी रंगभूमीवर त्यांचा विश्वास आहे. तसं ते जाहीरही सांगतात. त्यांना जीवनातला 'आज' महत्त्वाचा वाटतो. आजच्या जीवनातले विविध रंग नाट्यरूप झाले पाहिजेत असा त्यांचा आग्रह आहे. भूतकाळात त्यांचं मन रमत नाही. कोणतीही प्रगत कला ही आजच्याच जीवनासंबंधी बोलत असते असं ते मानतात. आजच्या जीवनाचे अनेक रंग, अनेक ताण, मतभेद कलेत येतात–यावेत. प्रचारकी नाटक असूनही कलाकृतीतील सौंदर्य कमी होऊ नये यासाठी त्यांचा प्रयत्न असतो. नाटक–रंगभूमी ही सामाजिक–राजकीय वातावरण बदलण्यास कारणी होते यावर त्यांची श्रद्धा आहे. हे सारं आम्ही त्यांच्या 'दुःस्वनगरी', 'टीनेर तलवार', 'बॅरीकेड 'मध्ये पाहिलं. निर्दोष असे प्रयोग पाहिले. प्रयोगांच्या तयारीसंबंधी बोलताना ते म्हणाले– तालमींना प्रारंभ होण्यापूर्वी नाटकाची पूर्वतयारी (पेपरवर्क) करण्यासाठी सात सिटिंग्ज घेतो. पहिली तालीम नेपथ्य, पोषाख, संगीत वगैरे प्रयोगाला आवश्यक असणाऱ्या सर्व गोष्टींसह होते. अशा बारा दिवस तालमी घेतो. तालमी दिवस-रात्र चालतात. सर्व तालमी स्टेजवर घेतो. माझ्या हाताखाली तीन सहदिग्दर्शक काम करतात. मी नसताना तेच सारं पाहतात. तालमी आणि संस्था यंत्रासारखी सुरळीत चाललेली असतात. माझ्या हाता खालून शिकून गेलेल्या कलाकारांनी स्वतःच्या संस्था काढल्या आहेत. असे आठ ग्रुप्स आज कलकत्त्यात आहेत. तीन दिग्दर्शक जात्रा प्रकारात गेलेत... नाटकात काम करण्यासाठी स्त्रिया आपणहून येतात. तशी बंगाली रंगभूमीत अडचण पडत नाही. पण त्यातल्या अनेकींना चित्रपटात जाण्याचं आकर्षण असतं. चित्रपटात जाण्यासाठी त्या नाटकाच्या माध्यमाचा उपयोग करतात.

... जूनच्या अठ्ठावीस तारखेला उत्पल दत्त यांच्या 'दुःस्वप्ननगरी' च्या प्रयोगाला सरकारकडून (पोलिसांकडून) खूप त्रास झाला. त्यात सरकार विरोधी उपरोधिक टीका असल्यानं विरोध झाला. त्या प्रयोगाला कलकत्त्यात अधिकृत नाट्यगृह न मिळण्याची व्यवस्था केली. पण दक्षिणी लोकांचा एक हॉल तयार होतोय. त्या 'त्यागराज हॉल 'मध्ये प्रयोग झाला. आम्ही तिथंच प्रयोग पाहिला. हजार-पंधराशे प्रेक्षक खुर्च्यांवर बसलेले. चार-पाचशे भिंतीच्या कडेनं उभे सारेजण जिवाचा कान करून नाटकातला शब्द ऐकत होते, दाद देत होते. उत्पल दत्तांनी रंगभूमीवर प्रवेश केला. माइकचा त्रास टाळण्यासाठी सर्वांना सांगून पंखे बंद केले. उकड्यानं जीव अस्वस्थ होत होता. पण लोकांचं उत्पलवर अफाट प्रेम. मध्यम उंचीचा, भरदार देहयष्टीचा, भरीव आवाजाचा हा सुलक्षणी कलाकार प्रेक्षकांना मनोमन आवडला आहे. त्यांच्यावर लोकांचा जीव आहे. आणि त्यांचाही लोकांवर, तसाच रंगभूमीवर! तो मधून मधून चित्रपटात कामं करतो. संस्थेला हजारो रुपयांचं कर्ज आहे. तेवढं फिटलं की चित्रपटातली कामं बंद. फक्त नाटक आणि नाटक. त्यांच्या मतानं ते जे राजकीय विषय घेऊन प्रचारी नाटक करतात, या अशा नाटकानं बंगाली रंगभूमीत नवा इतिहास घडवलाय. 'पोथोनाटिका' (स्ट्रीट प्ले) नावाचा नवा प्रकार रंगभूमीला दिलाय. निवडणुकीच्या काळात अशा नाटकाचे प्रयोग रस्त्यावर होतात. तीन-तीन तास लोक ते पाहात उभे राहातात. त्या प्रयोगाचं चित्रणही बी. बी. सी नं केलंय.

... असा हा सरकारची पर्वा न करणारा, आपल्या मस्तीत नाटक करणारा माणूस 'नॅशनल थिएटर' वगैरे गोष्टी मानीत नाही. प्रत्येक प्रांताचं प्रादेशिक थिएटर हेच महत्त्वाचं. प्रत्येक थिएटर स्वतःच्या भाषेतून बोलत असतं. ते मोठं व्हायला पाहिजे असं मानणारा...फ्रान्स, इंग्लंड, इटाली येथली थिएटर्स बंद व्हावीत असं ठणकावून सांगणारा–रशियातल्या नटासारखा उत्तम नट पाहायला मिळत नाही म्हणणारा हा व्यापक दृष्टीचा कलावंत मराठी नाटकावर खूश आहे. 'घाशीराम 'वर निहायत खूश आहे. त्याला पु. ल. चं 'वटवट' आवडलय, तेंडुलकरांचं 'गिधाडे', 'सखाराम', 'शांतता कोर्ट' त्यानं पाहिलीत. त्यातलं 'सखाराम' हे त्याच्या दृष्टीनं महत्त्वाचं नाटक. 'घाशीराम' पाहून त्याला असं वाटतं की, त्या प्रॉडक्शनच्या दृष्टीनं बंगाली नाटक शंभर वर्षं मागं आहे...असं खूप पाहिलेला, अनेक नाटकं केलेला हा माणूस जबरदस्त आहे. बंगाली रंगभूमीतली एक प्रचंड शक्ती आहे. फार मोठा आधार आहे.

असाच आणखी एक जबरदस्त माणूस म्हणजे बादल सरकार. अग्रेसर नाटककार, दिग्दर्शक, स्वतःची संस्था असलेला. 'वल्लभपूरची दंतकथा', 'एवम् इंद्रजित', 'पगला घोडा', 'अंत नाही', 'सारी रात', 'बाकी इतिहास' इत्यादी नाटकांमुळे आपणा

सर्वांना परिचित असलेला. उत्पल दत्त यांच्या डोक्यात जसं एक विशिष्ट प्रकारचं नाटक आहे तसंच अगदी वेगळं बादलबाबूंच्याही डोक्यात आहे त्यांना प्रस्थापित रगमच आणि नाट्यगृह मान्य नाही. नेपथ्य, ध्वनी, प्रकाश इत्यादी गोष्टींचा वापर न करता मुक्तपणानं नाटक सादर करायच. एका अर्थी 'फ्री थिएटर 'ची कल्पना आहे. मध्यतरी त्यानी एक प्रयोगही करून पाहिला. प्रेक्षक खूप वैतागले. त्याच्याशी तास-दीड तास झकास गप्पा झाल्या. रगभूमीत ज्या प्रकारच नाटक चालू आहे त्यान त्यांच समाधान होत नाही. यातून रगभूमीनं नवा आकार घ्यावा असं त्यांना वाटत. नाट्य-माध्यमाच्या आधारानं आपल्या मनातील आशय खेड्यातील लोकां-पर्यंत जावा ही इच्छा. ते स्वतः टाऊन प्लॅनर आहेत. कामानिमित्तान खेडोपाडीही हिंडणं-फिरणं झालय. सार पाहून अस्वस्थ आहेत. सध्या निश्चित नोकरी अशी नाही. शोधात आहेत. पण ती काळजी महत्त्वाची नाही. आपल्या मनातल थिएटर कसं होईल ही विवंचना. स्वतत्र विचार, वेगळी जीवनदृष्टी-कलादृष्टी, वेगळी शैली, झपाट-लेलं कलासक्त मन निर्मितीत गुतलेल आहे. बगाली रगभूमीची ही आणखी ही एक शक्ती. त्याचं नाटक पहाता आलं नाही. पण 'स्पार्टाक्लस्' म्हणून नव्या नाटकाची तालीम पहावयास मिळाली. तालीम एका मैदानाच्या हिरवळीवर होती. सगळी नवीन मुलं घेऊन प्रॉडक्शन करण्याचा विचार. सारंच विचित्र-चक्रमपणाच वाटाव अस आणि तरीही महत्त्वाचं अस व्यक्तिरव !

तरुण रॉय नावाच्या पन्नाशी ओलाडणाऱ्या कलावताची भेट झाली. तीन मजली घर. तिसऱ्या मजल्यावर राहाण्याची जागा. तळ मजल्यावर स्वाःच नाटकाच थिएटर-' थिएटर सेटर ' नावाच ! स्वत.च्या घरात स्वतःच नाटकाच थिएटर असणारा एक थोर माणूस. थिएटरमध्ये शभर खुर्च्या. आटोपशीर पसारा. प्रत्येक रविवारी स्वतः नाटक सादर करतो. इतर वेळी इतरांची नाटकं. पत्नी, मुलगा आणि तो असे तिघेजण नाटक करतात-गेली वीस वर्षे अनेक अनुभव गाठीला. प्रयोग करण्यात सातत्य आहे. जोडीला नाट्यशिक्षण केंद्र. अजूनही नाट्यविषयक धडपड चालूच आहे. बगाली रगभूमीवरचे आणखी एक महत्त्वाचे कलाकार म्हणजे शभू मित्र. त्यांच डोळ्याच ऑपरेशन झालेल होतं त्यामुळ प्रत्यक्ष भेट होऊ शकली नाही. पण त्यांच्या पत्नी तृप्ती मित्र भेटल्या. त्याही मोठ्या कलाकार आहेत. नुकताच परदेश दौरा करून आलेल्या. 'अपराजिता ' हा एकपात्री प्रयोग करतात. मुबईला पु. ल. चा एकपात्री प्रयोग त्यांनी पाहिला आणि त्यापासून स्फूर्ती घेतली. नितीश सेन या नाटककाराकडून एकपात्री नाट्य लिहून घेतले. बंगाली रगभूमीत एकपात्री प्रयोग असा पहिलाच घडला. एकाअर्थी ते श्रेय पुन्हा पु. ल. नाच जात. तृप्ती आणि शभू मित्रांच पु. ल. हे गौरव स्थान आहे. बहुरूपी ही त्याची सस्था. त्याच्या एका नाटकाची थोडी तालीम पाहिली. तिथच 'नटी विनोदिनी ' या प्रख्यात नाट-काचे लेखक भेटले. 'अपराजिता 'चेही लेखक दोन-तीनदा भेटले-नितीश सेन. थोडी पण अभिरुची सपन्न नाटक लिहिणारा नाटककार. 'अपराजिता ' या एकपात्री नाट्यलेखनाच्या निर्मितीचा सविस्तर इतिहास त्यांनी सागितला. खळखळून हसणारा हा माणूस बोलायला गोड आणि चोखदळ आहे. तशीच त्याची वाङ्मयीन आणि कला दृष्टी आहे. त्याला बादल सरकारांची नाटकं आवडतात. तेंडुल-करांच 'शातता कोर्ट ' आवडतं, पण 'सखाराम ' मात्र आवडत नाही. 'सखाराम ' बंगाली रंगभूमीवर हीरो म्हणून मान्यच होणार नाही असं त्यांच मत !

बगाली रगभूमीत नाटकाइतकच 'जात्रा ' या नाट्यप्रकाराला महत्त्व. हा एक लोककला प्रकार आहे. काहीसा मुक्त, काहीसा बदिस्त. मुळात त्याला 'जात्रागान ' अस म्हणत. विशिष्ट पोषाखात, यात्रेच्या प्रवासात म्हटली गेलेली गाणी असं पूर्वी स्वरूप असे. नतर त्याच रूप पालटत गेलं. त्यात सवाद-कथा येऊन त्याला नाट्यरूप आल. पूर्वी पौराणिक-ऐतिहासिक विषय असत. आता सामाजिक विषय आले. पूर्वी लिखित सहिता नसे आता ती असते. इतकच नाहीतर 'जात्रा ' ही आता नाटकासारखी तालमी घेऊन बसवली जाते-दिग्दर्शित केली जाते. जात्रा करणाऱ्या अनेक कंपन्या आहेत. दसऱ्यापासून एप्रिलपर्यंत प्रयोग चालतात. दसरा झाला की जात्रा कपनी प्रयोगार्थ दौऱ्यावर निघते. एका कपनीत पन्नास-पचावन्न माणस असतात. काही कुटुंबेही असतात. कलाकाराना पगार महिन्याला मिळतो. आठ महिने पगार मिळतो. जून ते ऑगस्ट या दोन महिन्यात तालमी चालतात. त्या तालमीच्या काळाचाही पगार मिळतो. जेवणखाण-प्रवासखर्च कपनीचा. मधल्या काळात लोक कपन्या बदलतात. कपनीतून लोक फोडले जातात. कलाकार बरेचसे अशिक्षित. सुशिक्षिताच प्रमाण अल्पच. दरवर्षी नवीन खेळ तयार करावा लागतो. प्रथमदर्जाच्या कपन्या दहा-बारा आहेत. दुसऱ्या-तिसऱ्या दर्जाच्या पुष्कळच. त्या सर्वांची कार्यालय कलकत्त्यातच.

कलकत्त्यापासून पाऊण तासाच्या अतरावर उलुबेरिया नावाच गाव आहे. तिथ आम्ही 'जात्रा 'चे प्रयोग पाहायला दोन दिवस गेलो होतो. सध्याकाळी त्या गावी जायच आणि सकाळी परत. आम्ही दोन प्रयोग पाहिले. एक म्हणजे 'के ठाकूर डाकात ' आणि दुसरा 'मा, माटेर, मानूस. ' जात्राचा प्रयोग पाहाण ही अनुभव घेण्याचीच गोष्ट असते. एक मोठा मडप. तीन-चार हजार लोक बसतील एवढा. काहीवेळा दहा हजारापर्यंत देखील. मडपाच्या मध्यावर अठरा × अठराच एक चौकोनी स्टेज घातलेलं. त्या स्टेजच्या जवळच दोन बाजूस आर्केस्ट्राचे लोक बसलेले. तिथच प्रॉम्प्टरही असतो. स्टेजच्या तिन्ही बाजूनं प्रेक्षक बसलेले. एका बाजूनं नटाच येण-जाण असतं. ते सर्वांच्या समोरून. पूर्वी रात्रभर प्रयोग चालायचा. आता तीन-साडेतीन तास असतो. प्रयोगाला मध्यतर नाही. पण जर हा प्रयोग नाटकाच्या थिएटरमध्ये झाला तर मात्र मध्यतर असत. निदान तिथल्या चहावाल्याच्या विक्रीसाठी आवश्यक असतं. पण मडपात ते अशक्य आहे.

नाटक आणि जात्रा यामध्ये महत्त्वाचा फरक रगमचाचा जसा आहे तसाच अभिनय पद्धतीचाही. जात्रात तिन्ही बाजूनी प्रेक्षक पहात असल्यामुळं नटाला तिन्ही बाजूवर अवधान ठेवून रगमंचावर फिराव लागत. अभिनय दर्शन घडवावं लागत. तसच हजारो प्रेक्षक दूरवरून पहात असल्यानं भडक स्वरूपाचा अभिनय करावा लागतो. अभिनयातील-आवाजातील सूक्ष्मता-तरलता या ठिकाणी नसते. रगमंचावर कोणत्याही प्रकारच साहित्य-नेपथ्य काही नसतं. त्या-

मुळं साहजिकच सारा भर आणि भार शब्द आणि कृती यावरच असतो. आम्ही पाहिलेले दोन्ही प्रयोग चोख बसवलेले होते. त्या जात्रात अभिनयाबरोबरच नृत्य आणि गायन दोन्हींचाही वापर होता. विनोदही बऱ्यापैकी होता. पण महत्त्वाचं म्हणजे बाई रंगमंचावर नाचू–गाऊ लागली की, आपल्याकडच्या तमाशाप्रमाणं पब्लिकमधून शिट्टया नाहीत. अचकट-विचकट शिव्या नाहीत...

'जात्रा'त काही नवीन घडवून आणणारे अमर घोष नावाचे गृहस्थ भेटले. त्यांनी जात्रात लेनिन, स्टॅलिन, हिटलर, सुभाषचंद्र इत्यादींची जीवनकथा रंगवून दाखविली आहे. परंपरागत जात्रात 'विवेक' नावाचं पात्र होतं. ते केव्हाही येत असे अन् जात असे. त्यांनी आता ते बदलून वास्तव पात्र तयार केलंय. पूर्वी मुख्य पात्र हे दिग्दर्शक असे. ती प्रथा अमरबाबूंनी मोडली. सरकारनं त्यांच्या काही जात्रांना करही माफ केलाय. या अमरबाबूंनी आम्हाला जात्राची खूप माहिती दिली.

त्यांनी दिलेली माहिती ऐकून असं वाटलं की, आता जात्राचं अस्सल रूप जात चाललंय. जात्राला नाटकाचं बंदिस्त रूप येऊ पहातंय. टागोरांनी या प्रकाराबद्दल म्हटलं होतं की, जात्रानं नाटकाकडं जावं आणि नाटकानं जात्राकडं ! त्याचा अर्थ सरळ होता की, दोन्ही कलाप्रकारांचं स्वयंभूपण महत्त्वाचं होतं. विद्यमान कलेनं लोककलेकडून काही जिवंत गोष्टी घ्याव्यात ही अपेक्षा. पण जात्राच जर नाटकाचा अनुनय करू लागली तर एकमार्गी प्रवास आहे. परस्परांमधील कलात्मक देवाण–घेवाण संपुष्टात आली. जात्रामधलं उत्स्फूर्तपण, रांगडेपण जाऊन तिला नागररूप आलंय. ते पाहून मात्र मन अस्वस्थ झालं आणि निराशही !

...झंझावाती मुक्काम संपत आला. बंगाली माणूस, बंगाली नाटक आणि महानगर कलकत्ता यासंबंधी अनंत विचारांचा कल्लोळ उठला...कमालीची अस्वच्छता असलेल्या शहरात रहाणारा इथला माणूस दारिद्र्याला, बेकारीला तोंड देतोय. तरीही उत्तम साहित्याची नाटकांची, चित्रपटांची निर्मिती करतोय. त्याचं शहरातलं दैनंदिन जीवन काही वेळेला रंगभूमीत समांतर आहे, काही वेळेला एकजीव आहे तर काही वेळेला फटकून राहिलेलं ! एका बाजूला लहान मुलाशी प्रेमळ गोष्टी कराव्यात अशी मऊ मऊ, सुंदर भाषा, स्त्रीबद्दलचा हळुवार भाव, साहित्यातील भावुकता आणि दुसऱ्या बाजूला आपल्या कृतीनं उग्र रूप धारण करणारा नक्षलवादी, त्याची बंदूक आणि त्याच्यावर गोळी झाडणारा पोलीस. दर्शनी विसंवादी वाटावी अशी दोन्ही रूपं. खोटी वाटावीत इतकी ती रूपं खरी आहेत... अशा संभ्रमित करणाऱ्या महानगरात नाटक–रंगभूमीच्या संदर्भातलं सेन्सॉर बोर्ड नाही. ज्याला त्याला आपल्या आपल्या पद्धतीनं नाटक सादर करण्याची मुभा आहे. येऊन जाऊन प्रश्न येतो तो राजकीय विषयांवरच्या नाटकांतील आशयाचा. सरकारला फारच त्रासाचं झालं तर सरकार खटला भरतं. पण अशा प्रकारं काही महत्त्वाचा प्रश्न रंगभूमीच्या संदर्भात निर्माण झाला तर सारे कलाकार एकत्र येतात. आपापसातले सारे मतभेद बाजूला ठेवून सरकारला आपली बाजू पटवून देतात. सरकारशी भांडतात. नाटकाच्या परिणामाचा विचार सरकारपेक्षा प्रेक्षक अधिक करतो. त्याचा प्रतिसाद आणि साथ महत्त्वाची ठरते. तिथला प्रेक्षक सुसंस्कृत, सुजाण वाटला.

तिथं नाटकाचे प्रयोग दुपारी तीन आणि संध्याकाळी साडेसहाला. आपल्याप्रमाणं रात्री नाटक नाही. त्यांची कारणं विचार करण्यासारखी आणि व्यवहारी आहेत. एक तर या महानगरातून एका जागेवरून दुसरीकडं जाणं हे वाहनाच्या, वेळेच्या आणि सुरक्षिततेच्या दृष्टीनं त्रासाचं, धोक्याचं. आणखी एक गमतीचं कारण सांगितलं गेलं, बंगाली माणूस रात्री दहा–साडेदहाच्या पुढं जेवतो. संध्याकाळी नाटक–सिनेमा पाहून आल्यानंतर त्याला जेवायला आवडतं. नाटकवाल्यांनी प्रेक्षकाच्या याही गोष्टीचा विचार केलेला दिसतोय. व्यावसायिक नाटकांना तुफान गर्दी. तिकिटं सहजासहजी मिळत नाहीत. महत्त्वाचं नाटक आठवड्यातून ठराविक दिवशी एकाच थिएटरला सतत असतं. अनेक नाटकांचे सातशे–आठशेपासून तेराशेपर्यंत प्रयोग झालेत. आम्ही 'टीनेर तलवार' बघितलं तर त्याचा म्हणे, हजारावरचा कोणता तरी प्रयोग होता. प्रयोगसंख्येमुळं गुणवत्तेत कोणताच फरक नव्हता. त्याही दिवसाचा प्रयोग तितकाच जिवंत आणि ताजा. नाटकाचे शेकडो प्रयोग होत असल्यानं आपल्याकडच्या प्रमाणं पंचवीस–पन्नास–शतक महोत्सवी प्रयोगांचं भरघोस कौतुक तिकडं नाही. तिकिटांचे दर साधारणपणं आपल्यासारखेच. जाहिराती मात्र अगदी छोट्या. दोन–तीन ओळीत जाहिरात. त्यामध्ये नाटकाचं नाव, थिएटर, तारीख वगैरे. एखादेवेळी दिग्दर्शकाचं नाव. मुख्य म्हणजे संस्थेचं नाव महत्त्वाचं असतं. कलाकारांच्या नावांच्या प्रचंड जाहिराती नाहीत. त्यासाठी फोटो, ब्लॉक्स देऊन पैशांची उधळण नाही. नाटकांवर अभिप्राय लिहिण्यासाठी काही वृत्तपत्रांकडं जाणकार समीक्षक आहेत. पण त्यांची संख्या चार–दोनच आहे. बाकी सारा मामला आपल्या इकडचाच ! व्यावसायिक नाटककंपन्यांपेक्षा हौशी–प्रायोगिक नाट्यसंस्थांचे प्रमाण अधिक. महाविद्यालयीन रंगभूमी फारशी अस्तित्वात नाही. प्रत्येकजण आपल्या आवडीचं–ताकदीचं नाटक करीत असतो. एकमेकांच्या नाटकांबद्दल, संस्थेच्या स्वरुपाबद्दलची मतं आहेत, पण मत्सर नाहीत. निदान मोठ्या कलाकारांच्या बोलण्यात तशी तुच्छता आणि अहंता दिसली नाही.

या वंग रंगभूमीचं दर्शन घडत असताना आणि नंतर सहाजिकच मराठी रंगभूमी तुलनेनं समोर दिसत होती. त्यांच्या राजकीय विषयांचा नाट्याविष्कार आणि 'वर्तमाना'ला नाट्याशयात लाभलेलं महत्त्वपूर्ण स्थान हा लक्षवेधी विशेष. पण त्या विशेषाच्या सामर्थ्यातच त्याच्या मर्यादा आहेत. कारण केवळ 'वर्तमाना'चा

पृष्ठ २५ वर

नॅशनल
ब्लॅक टूथ पावडर
काजळ, नेत्रांजन, बाळगोळी

उत्पादक
काकडे अँड सन्स, २८ नवी पेठ, पुणे ३०

# आफ्रिकेत
## गोऱ्यांच्या सत्तेस हादरे

वा. दा. रानडे

पोर्तुगालमधील क्रांतीने आफ्रिकेतील राजकारणाला नवे वळण लागले आहे. आतापर्यंत अभेद्य मानल्या गेलेल्या गोऱ्या वसाहतवाद्यांच्या सत्तेस या क्रांतीने हादरे दिले आहेत. पोर्तुगालच्या नव्या राजवटीने गिनी बिसाऊ या वसाहतीचे स्वातंत्र्य मान्य केले. मोझांबिकमधील फ्रेलिको या स्वातंत्र्यवादी संघटनेच्या नेत्याशी स्वातंत्र्याचा करार केला. अंगोलामध्येही 'पीपल्स मूव्हमेंट फॉर दि लिबरेशन ऑफ अंगोला या स्वातंत्र्यवादी संघटनेच्या नेत्याशी पोर्तुगालने युद्धबंदी करार केला असून सत्ता संक्रमणाबाबत वाटाघाटी चालू आहेत.

पोर्तुगालमधील या बदलाचे परिणाम आफ्रिकेतील पोर्तुगीज वसाहतींना लागून असलेल्या ऱ्होडेशिया आणि दक्षिण आफ्रिका या अल्पसंख्य गोऱ्यांची सत्ता असलेल्या राष्ट्रांवर होणे अपरिहार्य होते. पोर्तुगीज वसाहती स्वतंत्र झाल्याने या गोऱ्या राजवटींचा एक मोठा आधार गेला. आफ्रिकन राष्ट्रवाद्यांची स्वातंत्र्य चळवळ दडपून टाकण्यासाठी या गोऱ्या वसाहतवाद्यांनी संयुक्त आघाडी केली होती. पोर्तुगालचा दुवा त्यातून निखळल्याने ही आघाडी कमकुवत झाली. ऱ्होडेशियातील आफ्रिकनांच्या चार राष्ट्रवादी संघटनांनी एकजूट करून निर्धाराने आपला लढा पुढे चालविण्याचे ठरविले तेव्हा आपली सत्ता पूर्णपणे उलथली जाण्यापेक्षा या संघटनांच्या नेत्यांशी बोलणी करून तडजोडीने आपले वर्चस्व व हितसंबंध टिकवावेत असा प्रयत्न ऱ्होडेशियाचे गोरे सत्ताधारी करू लागले. आफ्रिकन संघटनांशी त्यांनी युद्धबंदी करार करून नवी घटना तयार करण्याबाबत बोलणी करण्याचे मान्य केले. वाटाघाटी करायला गोरे सत्ताधारी तयार झाले हाच ऱ्होडेशियातील आफ्रिकन राष्ट्रवाद्यांचा मोठा विजय म्हटला पाहिजे. बहुसंख्य आफ्रिकनांच्या हाती सत्ता आली पाहिजे ही त्यांची मुख्य मागणी आहे. आणि या बाबतीत कोणतीही तडजोड स्वीकारायास ते तयार होणार नाहीत. ऱ्होडेशियातील लोकसंख्येचे अगदी अलीकडचे आकडे उपलब्ध नाहीत. पण १९६९ च्या गणती प्रमाणे तेथे ५०,९०,००० आफ्रिकन आणि २,२५,५८० गोरे होते. म्हणजे साधारणपणे वीस आफ्रिकनामागे एक गोरा असे प्रमाण होते. पण सत्ता मात्र या पाच टक्के गोऱ्यांच्या हाती होती ब्रिटिशांनी तयार केलेल्या १९६१ च्या घटनेत विधीमंडळाच्या ६५ जागांपैकी बहुसंख्य आफ्रिकनांना फक्त १५ जागा होत्या. आफ्रिकन पक्षांनी या निवडणुकांवर बहिष्कार टाकला होता. पुढे १९६५ साली ऱ्होडेशियाचे पतप्रधान इयान स्मिथ यांच्या सरकारने गोऱ्यांच्या हाती सत्ता टिकविण्यासाठी एकतर्फी स्वातंत्र्य पुकारले. ब्रिटिशांनी स्मिथ सरकार बडतर्फ केल्याचा हुकूम काढला पण प्रत्यक्षात या सरकारचे बंड ते मोडू शकले नाहीत. स्मिथ सरकारला वठणीवर आणण्यासाठी कॉमनवेल्थ राष्ट्रांनी त्यांच्याशी आर्थिक नाकेबंदी केली. यूनोनेही आर्थिक नाकेबंदीचे ठराव केले. पण दक्षिण आफ्रिका, पोर्तुगाल, पश्चिम जर्मनी, जपान आणि अमेरिका यांनी या ठरावाकडे दुर्लक्ष करून ऱ्होडेशियाशी व्यापार चालूच ठेवला. त्यामुळेच स्मिथ राजवट गेली नऊ वर्षे तग धरू शकली. पण आता पोर्तुगालचा आधार गेल्याने आफ्रिकन नेत्यांशी वाटाघाटी करणे स्मिथ यांना भाग पडत आहे.

पोर्तुगालमधील क्रांतीचा परिणाम ऱ्होडेशियाप्रमाणे दक्षिण आफ्रिकेवरही होऊ लागला आहे. आता आपणास पूर्वीसारखी गोऱ्यांची अनिर्बंध सत्ता टिकविता येणार नाही याची जाणीव पंतप्रधान व्होर्स्टर यांना झाली असून आफ्रिकनांना अधीक हक्क व प्रतिनिधित्व देण्याची तयारी ते दर्शवू लागले आहेत. वर्णभेदाचे धोरण त्यांनी पूर्णपणे सोडले असा याचा अर्थ नाही. ते थोडे सौम्य करणे त्यांना भाग पडले आहे. दक्षिण आफ्रिकेत १९७० च्या गणतीप्रमाणे ६९टक्के आफ्रिकन, १९ टक्के गोरे, ९ टक्के मिश्रवर्णीय आणि ३ टक्के आशियाई (मुख्यत: हिंदी) आहेत. बहुसंख्य आफ्रिकनांच्या हाती सत्ता जाईल अशी घटना तयार करण्याची गोऱ्या सत्ताधाऱ्यांची मुळीच तयारी नाही. दक्षिण आफ्रिकन सरकारने वर्णभेदाचे धोरण सोडून आफ्रिकनांना समानतेने वागविले पाहिजे असे ठराव यूनोने अनेक वेळा पास केले. हे ठराव पाळणे दक्षिण आफ्रिकन सरकारला भाग पाडण्यासाठी त्या राष्ट्राची आर्थिक नाकेबंदी करण्याचा आदेश यूनो सभासदांना दिला. पण काही गोऱ्या राष्ट्रांनी ही नाकेबंदी न मानल्याने ती यशस्वी झाली नाही. वर्णभेद मानणे यूनो सनदेविरुद्ध असल्याने दक्षिण आफ्रिकेचे यूनो सभासदत्व वास्तविक रद्द व्हावयास हवे. पण यूनो घटनेनुसार सुरक्षा समितीच्या शिफारशीशिवाय कोणत्याही राष्ट्राचे सभासदत्व रद्द करता येत नाही. आणि अमेरिका, ब्रिटन, फ्रान्स या दक्षिण आफ्रिकेच्या गोऱ्या पाठिराख्यांनी प्रत्येक वेळी व्हेटो वापरल्याने यूनोतून दक्षिण आफ्रिकेची अजून हकालपट्टी होऊ शकलेली नाही. पण तसे करता आले नाही तरी या अधिवेशनापुरती दक्षिण आफ्रिकेची प्रत्यक्षात हकालपट्टी आशिया व आफ्रिकेच्या राष्ट्रांनी यूनोत बहुमताने ठराव पास करून घडवून आणली. यूनोचे निर्णय धुडकावण्याचे धोरण दक्षिण आफ्रिकेने या पुढेही चालू ठेवल्यास हेच शस्त्र ते प्रत्येक अधिवेशनाच्या वेळी वापरू शकतील.

वर्णभेदाप्रमाणेच नामिबियाला (नैऋत्य आफ्रिकेला) स्वातंत्र्य देण्याच्या बाबतीतही यूनोचे निर्णय दक्षिण आफ्रिकेने आतापर्यंत धुडकावले. नामिबिया ही पूर्वीची जर्मन वसाहत. पहिल्या महायुद्धानंतर शासित प्रदेश म्हणून त्याचा कारभार राष्ट्रसंघाने दक्षिण आफ्रिकेकडे सोपविला. दुसऱ्या महायुद्धानंतर दक्षिण आफ्रिकेने या प्रदेशाच्या कारभाराबाबत यूनोशी विश्वस्त करार केला नाही. हा विश्वस्त प्रदेश असून त्याच्यासंबंधी अहवाल दक्षिण आफ्रिकेने यूनोस दरवर्षी सादर केले पाहिजेत असा ठराव यूनोने केला. पण तो मानण्याचे दक्षिण आफ्रिकेने नाकारले. काटेकोर कायदेशीर दृष्टीने नसले तरी प्रत्यक्षात या प्रदेशाला दक्षिण आफ्रिकेने आपली वसाहतच बनवून टाकले आहे. नामिबियावरची सत्ता दक्षिण आफ्रिकेने सोडली पाहिजे आणि यूनोचे निर्णय मानले पाहिजेत. यासाठी यूनोने आणखी पाच महिन्यांची मुदत दिली आहे. नामिबियाची लोकसंख्या १९७० च्या गणतीप्रमाणे ७,४६,३२८ असून त्यापैकी फक्त ९० हजार गोरे आहेत. या प्रदेशाला स्वातंत्र्य न देणे हा दक्षिण आफ्रिकेचा साम्राज्यवादच आहे. याबाबत दक्षिण आफ्रिकेविरुद्ध प्रभावी उपाययोजना करण्यास यूनो निष्क्रिय ठरली आहे. कारण अमेरिका, ब्रिटन, फ्रान्स यासारखी बडी राष्ट्रे दक्षिण आफ्रिकेची पाठिराखी आहेत. आणि सुरक्षा समितीत त्यांना व्हेटोचा अधिकार असल्याने यूनोचे त्यांना अमान्य असलेले निर्णय ते धुडकावून लावू शकतात. पण आफ्रिकन राष्ट्रवाद्यांच्या संघटित लढ्याच्या सामर्थ्यापुढे पोर्तुगालप्रमाणेच दक्षिण आफ्रिकेलाही अखेर मान तुकवावी लागेल. □

यंदाच्या माणूस दिवाळी अंकातील या लेखिकेचा गॉर्की अनेकांच्या लक्षात असेलच !

# पुष्किन

## सौ. सुमती देवस्थळे

सबंध रशियाला आपल्या स्वत्वाचे प्रतिबिंब ज्याच्या साहित्यात दिसते, असा अलेक्झॅण्डर सर्जीव्हिच् पुष्किन् हा एक स्वतंत्र बाण्याचा साहित्यिक होऊन गेला. तो जाऊन आता जवळजवळ दीड शतक लोटत आहे आणि तरीही सर्वसामान्य रशियन मनावरील पुष्किन्चा प्रभाव अद्यापही पुसटलेला नाही. काळाच्या वेगवान प्रवाहात विरून न जाता रसिक मनाला सतत आकर्षित करणारा असा हा कलंदर, बेफिकीर अन् मनस्वी माणूस !

पुष्किन्चा जन्मदिवस २६ मे १७९९. वडील–सर्जीलाओविच पुष्किन्–लष्करी अधिकारी–श्रीमंत खानदानी वारसा. आई–नादेजदा ऑसिपोव्हना हनिबाल. पीटर दि ग्रेटच्या दरबारी अब्राहम हनिबाल नावाचा एक चलाख निग्रो होता, त्याची ही नात. त्या निग्रो हुजऱ्यावर पीटर दि ग्रेटची बहाल मर्जी. त्यामुळे त्याचा भराभर उत्कर्ष होत गेला. त्याच्या व्यक्तिजीवनातील क्रूरकथा अंगावर शहारे आणणाऱ्या आहेत. पण त्यांचा दरबारी मानमरातबाशी काही संबंध नव्हता. स्वतःच्या चलाखपणाचे भांडवल करून त्याने दरबारात खूप प्रतिष्ठा मिळविली. पुष्किन् हा आईकडून त्याचा पणतू. तेव्हा त्याच्या रक्तात रशियन खानदान व निग्रो रासवटपणा यांचे मोठे चमत्कारिक मिश्रण झालेले होते. त्याला एक मोठी बहीण (ओल्गा) व भाऊ (लिओ) अशी भावंडे होती. पुष्किन्चा जन्म मॉस्को शहरात झाला. तो जन्मला ते घर नेपोलियनच्या स्वारीच्या वेळी आगीच्या भक्ष्यस्थानी पडले. आता फक्त त्या जागी एक खुणेचा फलक लावलेला आहे.

लहानपणी पुष्किन् हा अगदी मद–ठोकळ्यासारखा मुलगा होता. नकटा–चपटा, कुरळ्या केसांचा, कमालीचा संकोची अन् लाजरा–बुजरा. खळखळून हसणे–मोकळे बोलणे असे त्याला माहीत नव्हते. भारी मंद ! धावणे–पळणे जवळजवळ नाहीच. अगदी लहानपणापासूनच तो सबंध घराचा, घरात घडणाऱ्या घटनांचा अंदाज घेई. विलक्षण संवेदनाशील असल्याने कितीतरी गोष्टी त्याच्या लक्षात येत असत. त्याची बहीण अन् भाऊ चांगले चपळ–तरतरीत होते. त्या मानाने पुष्किन् आईच्या नजरेला भारी ठोंब्या वाटायचा. हा म्हणजे एक बिनडोक प्राणी आहे याबद्दल तिला संशय नव्हता. त्यामुळे तिला त्याच्या भवितव्याची काळजी वाटत असे.

पुष्किन्ची आई स्वभावाने अत्यंत उथळ व लहरी होती. तिचे पुष्किन्च्या वडिलांशी मुळीच पटत नसे. हा आपल्या बापाच्या वळणावर गेला अशी तिची खात्री. त्यापायी पुष्किन्चा राग ! तिला घराची व्यवस्था पहाण्यात बिलकुल रस वाटत नसे. गृहिणीच अशी बेपर्वा असल्यावर घराला काय घरपण रहाणार ? नोकराचाकरांवर कामे सोपवून या बाईसाहेब सामाजिक उचापती करण्यात दंग असत. उथळपणाबरोबर दिखाऊपणाचाही खूप सोस होता. त्यामुळे कोणी पाहुणे आले की, पुष्किन्ची आई मुलाशी गोडगोड बोले–कौतुक करी–पण एरवी मात्र मुलांना हिडीसफिडीस चाले. श्रीमती प्रदर्शनासाठी मोठ्यामोठ्या पार्टीज् व्हायच्या...चार लोकांत प्रेमाचे प्रदर्शन करायचे...पण वस्तुस्थिती मात्र उलट...असा प्रकार होता. पुष्किन्चे वडीलही घरात लक्ष घालीत नसत. सर्व काही बायकोवर सोपवून मोकळे ! परिणामतः घराला काही कळा नव्हती. आईवडिलांच्या वागण्यातला दुटप्पीपणा पुष्किन्ला अगदी बालवयातच समजला होता. कोवळ्या वयातच तो अंतर्मुख बनला. नेहमी जोरजोराने तळहात चोळीत राही. त्यातून त्याची मानसिक अस्वस्थता व्यक्त होत असे. आपण म्हणजे आईवडिलांना नकोसे लोढणे आहोत ही गोष्ट त्याला बालवयातच समजली होती, कारण तो कमालीचा संवेदनाशील व बुद्धिमान होता.

पुष्किन् दोन-अडीच वर्षांचा झाल्यावर त्याचे सर्व कुटुंब पीटर्सबर्गला रहायला गेले. त्याला सांभाळायला एक अत्यंत विश्वासू, प्रेमळ व कल्पक अशी दाई होती. तिच्याशी पुष्किन्ची छान गट्टी जमली. तिने सांगितलेल्या कल्पनारम्य गोष्टी हा अगदी भान हरपून ऐकत राही. रुसवा मात्र पटकन येई. मग तासन् तास कोपऱ्यात ठाण ! आज्ञाधारकपणाचे नाव नाही स्वतःला वाटेल तसेच वागायचे हा बाणा ! एकदा एका नोकराने त्याला सहज गंमत म्हणून मुळाक्षरे शिकविली. अक्षर-ओळख होताच या एकाड्या अंतर्मुख मुलाला जणू काही जादुनगरीचे दार खुले झाले. वाचनाचा जबरदस्त नाद लागला. त्याच्या अवतीभोवती फ्रेंच भाषा बोलली जाई. वयाच्या ५ व्या वर्षापासूनच तो उत्तम लिहू-वाचू लागला.

६ व्या वर्षी फ्रेंच अभिजात वाङ्मयापर्यंत मजल गेली. त्याच्या धाकट्या भावाने तर अशी आठवण लिहिली आहे की, वयाच्या ११ व्या वर्षी पुष्किन्‌ला कित्येक फ्रेंच अभिजात साहित्यकृती केवळ मुखोद्गत होत्या ! त्याच्या कानावर जास्ती करून तीच भाषा पडत असे. शिकवायला नेमलेले शिक्षकही फ्रेंच. घरात वडिलांनी विद्वत्तेचा देखावा करण्यासाठी व त्या जोरावर प्रतिष्ठा मिळविण्यासाठी मोठी लायब्ररी केली होती.उत्तम ग्रंथसंग्रह होता. घरच्या वाचनालयात बसून वडील पुस्तके चाळीत, किंवा वाचनाचा अभिनय करीत तासन् तास बसून रहात. पुष्किन् मात्र दिवसाच नव्हे तर रात्रीही वाचीत राही. वाचनाची त्याची भूक दिसामासी वाढत गेली. त्याच्या एका काकांना साहित्यात रस होता. कौटुंबिक समारंभाच्या वेळी ते आवर्जून काव्यरचना करीत. तेव्हा त्या कौटुंबिक कवीबद्दल पुष्किन्‌ला बालवयात खूप आदर वाटत असे. त्याच्या तोंडून एकादी सुंदर कविता ऐकणे हा त्याचा बालवयातला मोठा आनंद होता.

हळूहळू पुष्किन्‌ला कविता करण्याचा छंद जडला. त्याचे शिक्षक त्याच्या पोरसवदा रचनेची चेष्टा करीत, तर कोणी दुर्लक्ष करी, तर कोणी असले उद्योग केल्याबद्दल नाराज होई. काव्यरचनेच्या छंदाला काही घरातून प्रोत्साहन मिळाले नाही. पण प्रतिभेचा एक निकोप अंकुर मनोभूमीतून वर डोकावत होता खास. तो कोणत्याही उपायाने नाहीसा होणार नव्हता, तर वाढतच जाणार होता. पाश्चात्य वाङ्मयाच्या वाचनामुळे पुष्किन्‌च्या ठिकाणी रशियन स्लाव्ह संस्कृती व पाश्चात्य प्रगतीशील संस्कृती यांचे मनोज्ञ मिश्रण झाले. साहित्याच्या कल्पनारम्य सृष्टीत तो तन्मय होऊन जाई. घरात आईवडिलांचे वितुष्ट— निष्प्रेम वातावरण. फक्त ग्रंथाचा सहवास— तोच आनंद.

इ. स. १८११ मध्ये झार पहिला अलेक्झॅण्डर याने उच्चकुलीन व बुद्धिमान मुलांना शिक्षण देण्यासाठी आणि अत्यंत कार्यक्षम असे अधिकारी तयार करण्यासाठी एक आदर्श शाळा विस्तृत राजवाड्यातच काढली. त्या शाळेत फक्त ३० मुलांनाच प्रवेश. या मुलांची निवड अत्यंत चोखंदळपणाने व्हायची होती. एकदा प्रवेश मिळाला की, उज्ज्वल भवितव्याचे आश्वासन होते. स्वाभाविकच पुष्किन्‌च्या वडिलांनी आपल्या मुलाला प्रवेश मिळावा म्हणून खटपट सुरू केली. घरापासून दूर, समवयस्क मित्रांच्या सहवासात, उंची युनिफॉर्म घालून रुबाबात वावरण्याची कल्पना पुष्किन्‌ला अतिशय आवडली. भरपूर तयारी करून त्याने त्या शाळेत प्रवेश मिळविला.

या खास राजेशाही शाळेतला नभ्यासक्रम चांगलाच भारदस्त होता. अनेक विषय ! ते शिकविण्यासाठी तज्ज्ञांच्या नेमणुका— संबंध दिवसाचे वेळापत्रक आखलेले. त्यानुसार वागण्याचे प्रत्येकावर कडक बंधन— सत्त्वयुक्त उत्तम आहार—घोडदौड, पोहणे, लष्करी शिक्षण यांचा समावेश, भरपूर व्यायाम, चित्रकला व इतर कलानाही प्रोत्साहन—मात्र एक कडक मर्यादा होती. सहा वर्षेपर्यंत शाळेचे ( अत्यंत विस्तृत ) आवार ओलांडायचे नाही. तो एक शैक्षणिक प्रयोगच होता. त्यामुळे नेपोलियनची स्वारी, मॉस्कोदहन इ. प्रकार घडून गेले तरी मुले शाळेच्या भिंतीत सरळ शिकत होती. त्यांना या वादळाचा त्रास झाला नाही. राजवाड्यातले झारचे ग्रंथालय विद्यार्थ्यांना खुले होते. मुले त्याचा भरपूर लाभ घेत. रशियनच्या शिक्षकांनी त्याच्यातले काव्य गुण ओळखले असले तरी इतर शिक्षकांच्या मते मात्र तो उथळ, बडबड्या व चिडका होता. कित्येकांना तो उडाणटप्पूही वाटत असे. मात्र संबंध वर्गात त्याच्याएवढे वाचन केलेला दुसरा कोणीही नव्हता हे सर्वांना माहीत होते.

अगदी सहज, येता जाता, खोड्या काढता काढता किंवा शिक्षकांची टिंगलटवाळी करता करता पुष्किन् अर्थपूर्ण, औचित्यपूर्ण काव्यरचना करू शकत असे. नेमके मर्म व्यक्त करणाऱ्या दोन दोन ओळी (cuplets) तो अगदी सहज लिहून जाई. त्या वर्गात आणखीही काही मुलांना काव्य रचना करायची आवड होती हे लक्षात आल्यावर शिक्षकांनी काव्यवेड्या कुमारांचा एक गट केला. उत्तमोत्तम काव्यावर चर्चाही चालत असे. मुलांच्या उत्साहाला इतका बहर आला की त्यापायी शाळेची पोलादी शिस्त बिघडू लागली. त्यामुळे हा गट बरखास्त करावा लागला.

कुमारवयात पुष्किन्‌च्या भावजीवनाचे मूलस्रोत दोन—काव्य आणि प्रेम. प्रेमाच्या कल्पनेवरच तो उत्कट प्रेम करीत होता. त्याच्या प्रेमाचा निमित्तमात्र विषय कोणता होईल हे सांगणे कठीण होते. एखादी मेट्रन, डायरेक्टरांकडे आलेली पाहुणी, शिक्षकांची एखादी विधवा नातेवाईक—कोणीही ! उत्कट प्रेमभावनेचा आविष्कार त्याच्या रचनेतून होत असे. ही गोष्ट शिक्षकांच्या लक्षात आल्यावर त्या अधिक शहाण्या पोरापासून ते सावध राहू लागले. पुष्किन्‌ची वासना वयाच्या ९ व्या वर्षापासून हुंकारू लागली होती. अत्यंत प्रमाथी, अतृप्त व अक्षय अशा काल्पनिक भावानुभवाने तो सतत उद्दीपित झालेला असे. त्याच्या मनातील गहनता तेजस्वी डोळ्यांतून व्यक्त होई. दिसायला काही तो सुंदर नव्हता. पण दुसऱ्याला चटकन आकर्षित करून त्याच्यावर छाप पाडण्याची किमया त्याला साधून गेलेली होती. बुद्धिवैभव, कोटिबाजपणा, सखोल व चौफेर वाचन, चित्रकलेतील प्राविण्य या गुणविशेषांमुळे तो चटकन् नजरेत भरत असे. शाळेत असताना त्याच्या अयोग्य वागणुकीबद्दल त्याला जबरदस्त शिक्षा ठोठावण्याची वेळ आली होती. पण मुख्याध्यापकांनी मध्यस्ती करून त्याला सावरून घेतले. शाळेत असताना कॅरॅमॅझिन् या दरबारी इतिहासकाराशी त्याचा परिचय झाला. त्याच्याशी चर्चा करणे, त्याच्या संशोधनाची पद्धती पहाणे, त्यातून स्फूर्ती घेणे, फापटपसाऱ्यातून निके सत्त्व ओळखणे, बुद्धीचा नेमकेपणा, मार्मिकता या गोष्टी पुष्किन्‌ने आत्मसात केल्या. अशा रीतीने भरपूर बौद्धिक शिदोरी घेऊन त्याने १८१७ मध्ये अभ्यासक्रम पुरा केला.

शाळा संपल्यावर आपण लष्करात दाखल व्हावे अशी पुष्किनची इच्छा होती. परंतु आईवडिलांना ते मंजूर नसल्याने परराष्ट्रीय खात्यात ज्यूनियर सेक्रेटरीच्या जागेवर प्रशासकीय अधिकारी म्हणून पुष्किन्‌ची नेमणूक झाली. असल्या नोकरीच्या चौकटीत पुष्किन्‌सारखा मनस्वी वृत्तीचा बुद्धिमंत माणूस रमणे शक्यच नव्हते. त्याला नोकरीत रस वाटेना. त्याऐवजी आजवर केलेल्या कवितांपैकी निवडक उत्कृष्ट कवितांचा

संग्रह छापून प्रसिद्ध करण्याची त्याची खटपट सुरू झाली. त्याला नोकरीच्या चाकोरीत रुळून मळून जायचे नव्हते. कणाकणाने जगायचे होते. 'देवाने दिधले असे जग स्वये आम्हासि खेळावया, विश्वी या प्रतिभा बले विहरतो...' ही वृत्ती. बौद्धिक तशीच शारीरिक मेहनतही त्याला हवीहवीशी वाटे. सपाटून घोडदौड, पोहोणे, फिरणे या त्याच्या आवडीच्या गोष्टी होत्या. एकदर 'माणसाची' त्याला खूप जिज्ञासा होती. दुर्दम्य जिज्ञासा, दुर्दम्य शक्ती...आणि या वैशिष्टयाचा दुर्दम्य अभिमान! पुष्किन्‌ची हालचालसुद्धा अगदी विजेसारखी तल्लख असे. थोरा मोठयांच्या ओळखी करून घ्यायच्या, त्यांच्याशी आत्मविश्वासाने बोलायचे, चर्चा करायची या सर्वांची त्याला विलक्षण हौस होती. थोडक्यात म्हणजे पुष्किन् ही मुळी एकसंध अशी एक व्यक्ती नव्हतीच. दहाबारा व्यक्तिमत्त्वे विधात्याने त्याच्या देहात कोंबून टाकलेली होती. त्याची कलंदरवृत्ती, स्वतंत्र बाणा, संवेदनाशीलता, बेफिकीर मनस्वीपणा हे सारे गुण काव्याला पोषक असे होते. अनेक धोके पत्करण्याची त्याला आवडच होती. कोणत्याही परिमाणाने त्याचे मूल्यमापन होण्यासारखे नव्हते. ¤

नोकरीवर रुजू झाल्याबरोबर दोन दिवसानी त्याने प्रदीर्घ मुदतीची रजा मागितली. नुकतीच नोकरी लागली आहे, रजा–इतकी मोठी रजा कशी मागावी हा व्यावहारिक विचार त्याला शिवलाही नाही. तो आपल्या वतनवाडीवर–मिखिलोव्हस्की येथे आला. किती दिवस रहाणार हे अप्रस्तुत. 'जगाचे बंध कोणाला? जगाने बांधला ज्याला!' पण पुष्किन् हा सर्व बंधनाच्या पार गेलेला होता. काव्यरचनेत मग्न होता. Rusian and lydmila या दीर्घ खण्डकाव्याच्या रचनेस त्याने सुरवात केली. काव्यरचनेबरोबर त्याच्या जीवनातले वासनाकाण्डही सुरू झालेले होते. त्याच्या जीवनात एक लांबलचक डॉन ज्युआन् यादीच तयार झालेली होती. पुष्किन्‌च्या चिकित्सक अभ्यासकांनी त्या यादीचे दोन भाग केलेले असून एका बाजूला घनिष्ठ संबंध व प्रेम असलेल्या स्त्रिया व दुसऱ्या बाजूला अगदी धावती प्रमप्रकरणे असलेल्या स्त्रिया यांच्या नोंदी आहेत. या दोन्ही याद्या आश्चर्य वाटावे इतक्या मोठ्या आहेत.

घरी आल्यावर त्याची प्रकृती बिघडली. आजारात त्याची रचना सुरू. मोकळा वेळ म्हणून इतिहासाचे आठ खण्ड वाचून काढले. क्षणही वाया घालवला नाही. पुष्किन्‌ला साहित्याप्रमाणेच साहित्यिकांच्या सहवासाची गोडी होती. Green Lamp नावाच्या साहित्य संस्थेचे त्याने सभासदत्व मिळविले. या संस्थेत काव्य, राजकारण इत्यादी विषयावर चर्चा, वादविवाद होत असत. तेथे जाऊन पुष्किन् इतरांची व्यंगे व्यक्त करणाऱ्या खोचक वात्रटिका लिहीत असे. मोठमोठ्या प्रतिष्ठिताना डिवचीत असे. त्याच्या कवितेच्या छोटया छोटया ओळी समाजाच्या सर्व स्तरांत हातोहात फिरत असत. त्यातून झारसकट सर्वांना रेशमी चिमटे होते. थोरामोठयाची गुपिते तो हलक्याफुलक्या कोपरखळ्या देऊन जाहीर करून टाकी. त्याचबरोबर स्वातंत्र्यप्रेमाची उत्कट गाणीही तो रचीत असे. किंबहुना तो जे जे लिही, त्यात प्रस्थापितावर हल्ला चढविलेला असायचा, आणि मुक्ततेचा जयघोष निनादत असायचा. त्या काळात सत्ताधाऱ्याचे (धर्मसत्ता व राजसत्ता) दडपण सर्वच स्तराना बोचत होते. समाजात स्वातंत्र्य प्रेमाचे वारे खेळत होते. त्यामुळे पुष्किन्‌च्या कवितेला उत्स्फूर्त दाद मिळू लागली. झारचे पक्षपाती चवताळले. पुष्किन्‌ची झडती घेऊन त्याला हद्दपार करण्याचे बेत शिजू लागले. त्याला सश्रमकारावास द्यावा की आणखी पुढची पायरी ओलांडावी एवढाच काय तो प्रश्न होता.

आपल्या खोलीची झडती घेणार अशी शंका येताच या स्वतंत्र बाण्याच्या कवीने एकूण एक संशयास्पद कागदपत्रे जाळून टाकली. लवकरच झारच्या आज्ञेवरून मिलिटरी गव्हर्नरने झडती घेतली. त्याला भेटीला बोलावले. आक्षेपार्ह ओळीचा जाब विचारला. या ओळी फ्रेंच क्रांतिकारकाच्या संदर्भात असून त्याचे स्वातंत्र्यप्रेम व्यक्त करणाऱ्या आहेत अशी चतुर बतावणी करून पुष्किन् मोकळा झाला. बाकीची रचना कोठे आहे असे विचारताच 'माझी सारी रचना इथे आहे' असे म्हणून त्याने आपल्या डोळ्याकडे बोट दाखविले. लिहून दाखविण्याची तयारी दाखविली, आणि अनुज्ञा मिळताच त्याने वही मागवून घेऊन त्यात भराभर कविता लिहायला सुरुवात केली. गव्हर्नर आश्चर्याने सर्द झाला. इतक्या बुद्धिमान कवीला दहशत दाखविण्याची त्याला काही हिंमत झाली नाही. तथापी पुष्किन्‌च्या रचनेमुळे बरेचसे अधिकारी दुखावले होते. तेव्हा अगदी कैद किंवा हद्दपारी जरी नाही, तरी थोडीशी सत्तेची चुणूक दाखवायलाच हवी होती. त्या हेतूने झारने त्याची पार दक्षिणेत एका रुक्ष गावी बदली करून टाकली. वर वाटखर्चाला १००० रुबल्स दिले. पैसे घे– पण इथून जा बाबा एकदाचा! तुझी तीव्र बुद्धिमत्ता आम्हाला नाही सहन होत! ही झारची भूमिका.

¤ ¤

पुष्किन्‌चा अशा तऱ्हेने काटा काढल्याबद्दल सरकार स्वत वर खूश होते. पण तो मात्र ताठ मानेने लोकांना सांगत होता की मोठ्या शहरातल्या कृत्रिम वातावरणाचा कटाळा आल्याने आपणच ही बदली मागून घेतली! दहा दिवसांचा खडतर प्रवास करून तो इकेटेटिनास्लाव्ह या लहानशा गावी रुजू झाला. त्या ठिकाणी पुष्किन्‌ला नेमके असे कोणतेही काम नेमलेले नव्हते. जनरल इन्झोव्ह या अधिकाऱ्याच्या हाताखाली काम. हा अधिकारी पुष्किनवर पुत्रवत प्रेम करीत होता. त्याने पुष्किनला स्वत.च्या घरातच सामावून घेतले. त्याची राजासारखी व्यवस्था ठेवली. सबंध दिवस जंगलातून भटकायचे, बोटिंग करायचे, नदीत पोहायचे, रात्रभर वाचायचे असा अगदी अनिर्बंध कार्यक्रम सुरू! हा बेफाटपणा मनाला आवडला तरी शरीराला पेलला नाही. परिणामतः आजारभरपूर ताप... तळमळ... जनरल इन्झॉव्हला काळजी.

त्याचवेळी जनरल रेव्हिन्स्की हा नेपोलियनशी झालेल्या युद्धात उज्वल पराक्रम गाजविणारा रशियन जनरल कॉकेशसमध्ये विश्रांतीसाठी जात होता. वाटेत त्याचा मुक्काम पुष्किन्‌च्या गावी होता. जनरल रेव्हिन्स्कीचा मुलगा पुष्किन्‌चा मित्र असल्याने भेटायला आला. वरिष्ठाची परवानगी काढून त्याने पुष्किन्‌लाही आपल्याबरोबर हवाबदल करायला नेण्याचे ठरविले. इतक्या तापात प्रवास करणे धोक्याचे होते खरे, पण जनरल

रेव्हिन्स्की यानी ती जबाबदारी स्वीकारली. कॉकेशसच्या आसमतात अप्रतीम निसर्ग-सौंदर्य पसरलेले होते. उष्ण पाण्याच्या झऱ्याची वाफ... अन् एका बाजूला बर्फाच्छादित शिखरे... दोन्ही शोभा लक्षणीय होत्या. पुष्किन् निसर्गसौंदर्याने मंत्रमुग्ध झाला. सोबतीला त्याच्या प्रसन्नवृत्तीच्या बहिणी– तेव्हा हास्यविनोदात आजार केव्हाच पळाला. मतरलेले ते दोन महिने कसे निघून गेले ते कळलेसुद्धा नाही. परतल्यावर लगेच एका अनामिक बेचैनीने त्याला वेढून टाकले. वैराण खेड्यात रहाणे ही शिक्षा वाटू लागली. मग डेव्हिडॉव्ह या आपल्या मित्राला भेटण्याच्या उद्देशाने तो जवळच्या गावी गेला.

डेव्हिडॉव्ह चांगला गर्भश्रीमंत होता. प्रशस्त घर– मोकळे वातावरण– श्रीमती थाटमाट– उत्तम मित्रमैत्रिणी असा सारा डाव जमून आलेला होता. त्याला काही परत जावेसे वाटेना. मग डेव्हिडॉव्हने पुष्किन्‌ला बरे नसल्याचे खोटेच पत्र धाडून दिले. अधिकारी महाशय इतके वत्सल की त्यानी वाटेल तितकी रजा मंजूर केली. 'खडखडीत बरा झाल्याशिवाय पाठवू नका' अशी मित्राला विनती केली. या मुक्कामात पुष्किन्‌ने Prisoner of Cawacius ही गाजलेली कविता लिहिली. आणखीही रचना तो करीत होताच. त्याचे वागणे फारच मोकळेपणाचे होते. त्यामुळे तेथील क्रांतिकारकानी पुष्किन्‌ला काही अगदी आतल्या वर्तुळात घेतले नाही. १८२५ च्या डिसेंबरिस्ट क्रांतीचा उठाव करणारे बरेचसे क्रांतिकारक तेव्हा पुष्किन्‌च्या अवतीभोवती वावरत होते. इथे काही तरी क्रांतीचा कट शिजतो आहे याचा सुगावा त्याला लागला. तथापी हा कलंदर माणूस गुप्त क्रांतिकारकाना पुरेसा विश्वासार्ह वाटला नाही.

यानंतर पुष्किन्‌ची पाठवणी किश्नेव्ह येथे झाली. ते एवढेसे गावढे पुष्किन्‌ला आवडणे शक्य नव्हते. तेथे तो सर्वांशी तिरसटपणाने वागत होता. त्याच्या वागण्याला उन्मत्तपणाचा वास येई. स्वाभिमानाचे रूपांतर दुरभिमानात होई. त्यापायी अनेक लोक त्रस्त होत. डॉन ज्युआन् यादी एकसारखी वाढतच होती. राजसत्ता आणि धर्मसत्ता यांची बंधने त्याला जाचक वाटत होती. दोन्ही सत्ताविरुद्ध वैचारिक बडाचे उद्रेक कवितेतून व्यक्त होत होते. पैशाची चणचण– कर्ज झालेले–

आता मात्र लिखाणावर हक्काने पैसे मिळविण्याचे त्याने ठरविले. संपादकांशी चक्क व्यापारी सौदा केला. अशी अशी कविता आहे, त्याबद्दल मला इतके मानधन हवेय्– देता का? नाही तर गेलात उडत अशी त्याची संपादकाशी बोलणी चालत. एखादा चांभार ज्याप्रमाणे आपण बनविलेल्या तयार बुटाच्या जोडीकडे पहातो, आणि फायदा करून घेण्यासाठी तो जोड विकतो, त्याप्रमाणे मी माझ्या कवितेकडे पहात असतो. 'साहित्य ही एक निर्मिती' आहे, त्यापासून पैसे मिळालेच पाहिजेत ही त्याची ठाम भूमिका. कवितेसाठी हक्काने पैसे मागून घेणारा, त्यासाठी व्यावहारिक स्तरावर चक्क व्यापारी बोलणी करणारा पुष्किन् हा पहिला कवी दिसतो. त्याच्या कविताना चांगला भाव मिळू लागला. तथापी पैसे खर्च करण्याची तऱ्हा विलक्षण उधळेपणाची असल्याने पैसा कधीही पुरत नसे. त्याच्या वासनेच्या पोताची ज्वाला सतत वर उफाळणारी होती. त्याचा उपसर्ग वरिष्ठांच्या घरापर्यंत पोहोचू लागला. त्यामुळे त्याला एका ठिकाणी ठेवणे अत्यंत गैरसोयीचे होऊन बसले... गैरवर्तनाबद्दल खटला भरावा लागला. खटल्याच्या कामासाठी त्याला राजधानीत जायचे होते. वाटेवर तो स्वत:च्या घरी थांबला. आई-वडिलाना भेटण्यासाठी थांबला. पण सरकारने वडिलानाच त्याच्यावर गुप्तपोलिसी नजर ठेवण्याच्या कामात सामील करून घेतले होते. सरकारी नजरेच्या कक्षेतून त्याला दूर होताच येईना. पुष्किन्‌ला ही अवस्था बिलकुल आवडत नव्हती. रशियासारख्या सत्ताधाच्या देशात जन्माला आल्याबद्दल तो सतत नशिबाला बोल लावीत होता. त्या मुक्कामातही पुष्किन्‌चे लिखाण सुरूच होते. कोणत्याही क्षणी त्याची सृजनशक्ती शबल झाली नाही. तिचे नवनवोन्मेष अत्यंत विलोभनीय होते. जिप्सीज् हे दीर्घकाव्य व औनजिन हे खण्डकाव्य रचले गेले. Ode to Freedom ही कविताही त्याने लिहिली.

पुष्किन्‌च्या प्रतिभेचा आविष्कार मुख्यत: काव्याच्या माध्यमातून होत असला, तरी इतर साहित्यप्रकारांशी त्याचे वावडे नव्हते. Boris Godunov हे अप्रतीम नाटक त्याने लिहिले. त्यासाठी तत्राचा योग्य तो अभ्यास केला–शेक्सपिअर व रेसीन याच्या नाटकाचे अध्ययन केले; आणि वयाच्या २६ व्या वर्षी त्याने नाटक पूर्ण लिहिले.

इ. स. १८२५ सालची अखेर पुष्किन्‌च्याच नव्हे तर अखिल रशियाच्या राष्ट्रजीवनात महत्त्वाची होती. डिसेंबरिस्टानी राजसत्तेविरुद्ध मोठे बंड केले होते, आणि राजसत्तेने हे बंड अत्यंत निष्ठुरपणे मोडून काढले होते. डिसेंबरिस्ट क्रांती ही ऐतिहासिकदृष्टया महत्त्वाची होती. क्रांतीच्या धामधुमीत झारने विंटरपॅलेसच्या भोवती जमलेल्या प्रक्षुब्ध जमावावर गोळीबार केला होता, त्यात शेकडो नागरिक प्राणाला मुकले होते. प्रेतांचा खच पडला होता. परिणामी ५ डिसेंबरिस्टांना फाशी व १२० क्रांतिकारकांना सैबेरियात हद्दपारी व सश्रम कारावास अशा शिक्षा ठोठावण्यात आल्या होत्या. स्वातंत्र्यप्रेमी पुष्किन्‌ने लिहिलेल्या कवितांमधून रक्तलांच्छित सत्ताधीशांविषयी तिटकारा व्यक्त होणे स्वाभाविक होते. अधिकाऱ्याना त्याच्या आक्षेपार्ह वाटलेल्या ओळी अशा–

By hangmen we have made our kings ! O horror–shame !

Ws overthrow kings–a murderer surrendered !

फाशी देणाऱ्या मार्गांकडून आम्ही आमचे सम्राट घडवितो आहोत ! केवढे लज्जास्पद दुर्भाग्य आहे ! असल्या खुन्यांनी वेढलेल्या राजांना आम्ही पदच्युत करतो (करू.)

वस्तुत: या ओळी पुष्किनने डिसेंबरिस्ट क्रांतीपूर्वीच लिहिल्या होत्या–रॉबेस्पिअरला उद्देशून लिहिलेल्या होत्या. परंतु या क्रांतीच्या संदर्भात त्यातून वेगळाच अर्थ ध्वनित होत होता. नवा झार निकोलस (पहिला) अत्यंत संतापला. मी काय खुन्याच्या कर्तृत्वाने गादीवर आलो आहे का ? खुन्यानी वेढलेला आहे काय ? इतकी उन्मत्त भाषा काढणाऱ्याला ताबडतोब वठणीवर आणलेच पाहिजे. फाशी–निदान सैबेरियाची वाट तरी दाखवायलाच हवी.

झारने पुष्किन्‌ला भेटीला बोलावले. भेटीचा हेतू सर्वांना माहीतच होता. आता यातून कोणत्या यातनापर्वाची सुरुवात होणार एवढेच काय ते पहायचे होते. पुष्किनने

निर्भयपणाने झारची भेट घेतली. झारच्या सर्व प्रश्नाना मनमोकळी उत्तरे दिली. झारने ड्रॉवरमधून आक्षेपार्ह कविता काढून पुष्किन-पुढे धरली. 'याचा अर्थ काय?'—पुष्किनने ती कविता फ्रेंच राजक्रांतीस उद्देशून लिहि-ल्याचे अगदी सहज सागून टाकले. पुष्किनच्या एकदर स्वाभिमानी वागण्यावरून, बेदरकार स्वच्छ नजरेवरून, नेमक्या उत्तरावरून त्याची बुद्धिमत्ता व सुसस्कृतता या दोन्ही गोष्टी झारच्या मनावर ठसल्या. त्याच्या-सारख्या तरुण प्रतिभावताची गळचेपी करणे हा कमालीचा असस्कृतपणा ठरला असता. बुद्धिमताची गरज होती. तेव्हा कसेही करून पुष्किन्‌ला आपल्या बाजूला वळवून घेणे झारला आगत्याचे वाटत होते. अखेर झार म्हणाला, 'अतःपर तुम्ही शासनाच्या विरुद्ध लिहिणार नाही अशी ग्वाही देता?'

पुष्किन् म्हणाला, 'अहो, मी तसे कधी लिहीतच नाही. पण आपले सेन्सॉरखातेच महाविचित्र अन् सशयी आहे, त्याला काय करणार?'

'बरे तर, आता तुमचे लिखाण मी स्वत:च सेन्सॉर करीत जाईन. मग तर झाले?'

पुष्किन्‌ने होकार दिला. सिहाच्या गुहेतून तो सहीसलामत बाहेर आला. लोकानी त्याला अक्षरशः डोक्यावर घेतले. पुष्किनच्या लोकप्रियतेला उधाण आले. तो जाईल तेथे त्याला काव्य-वाचनाचा आग्रह होऊ लागला. रसिक मत्रमुग्ध होत असत. अनेक स्त्रिया पुष्किन्‌साठी जीव पाखडत होत्या. झारच्या हाती राजकीय सत्ता होती, पण पुष्किन् मात्र जनमनावर अधिराज्य गाजवीत होता.

पुष्किन्‌ला कामाच्या वेठीला बाधण्याच्या हेतूने सरकारने शैक्षणिक वस्तुस्थितीविषयी अहवाल तयार करण्याचे किचकट काम पुष्किनला दिले. त्याने व्यवस्थित अवलोकन करून, परखड शब्दात अहवाल प्रसिद्ध केला. सर्व वस्तुस्थिती निवेदन केली. त्यात सर-कारच्या शिक्षणविषयक आडमुठ्या धोरणाचा निषेध केला. लोकप्रियतेची उसळलेली लाट जरा स्थिरावल्यावर तो पीटर्सबर्गला गेला. तेथे त्याने आपले पणजोबा अब्राहम हनिबाल—याच्या जीवनावर कादबरी लिहिली. (निग्रो ऑफ पीटर दि ग्रेट) Poltava हे दीर्घ काव्य या काळातच रचले. ही त्याची रचना सर्वोत्कृष्ट धरली जाते. या व्यतिरिक्त छोटी-मोठी स्फुट कविता रचली जातच होती.

पुष्किनचे व्यक्तिमत्त्व हे सामान्यतः दुहेरी स्वरूपाचे होते. लिखाणातून व्यक्त होणारा पुष्किन् आणि व्यक्ती म्हणून समाजात वावरणारा पुष्किन् हे दोघे वेगवेगळे होते. तो जसे लिहीत होता, तसेच जगता, तर त्याला सुखी–शात–निरामय जीवन जगता आले असते. आणि तो जगत होता तसे लिहायचे म्हटले तर त्याचे साहित्य अत्यत भडक– कल्पनारम्य– अतिरेकी असे झाले असते!

## नटालीशी परिचय आणि....

इ. स. १८२९ मध्ये सेटपीटर्सबर्गमध्ये पुष्किन्‌ची नटाली गोचेरोव्ह या अत्यत सुदर मुलीशी ओळख झाली. तिच्या सौदर्याने तो मत्रमुग्ध व्हावा यात काहीच आश्चर्य नव्हते. ती केवळ १६ वर्षांची लाजरी-बुजरी अबोल-कोवळी मुलगी होती. पुष्किन हा तरबेज रसिक होता. तिच्या लोकोत्तर सौंदर्याचा प्रभाव पडून तो तिच्या प्रेमपाशात गुतून पडला. नटालीची आर्थिक स्थिती अगदीच वाईट होती. आई लोभी होती. आपल्या मुलीच्या सौंदर्याच्या बळावर गर्भ-श्रीमत जावई पटकवावा आणि मुलीबरोबर आपलीही जन्माची ददात मिटवावी ही तिची स्वाभाविक इच्छा होती. पुष्किन काही श्रीमत नव्हता—तेव्हा तिने त्याला हुलकावण्या देण्यास सुरुवात केली.

नटाली अप्सरेसारखी सुदर होती खरी. पण शारीरिक सौंदर्याव्यतिरिक्त तिच्या-जवळ इतर कोणताही गुण नव्हता. बुद्धी, भावना, शिक्षण इ. सर्व बाबतीत आनदच होता. पुष्किन्‌चे खरे दुर्दैव हे की भावनाशून्य, निर्बुद्ध अशा सुदर बाहुलीशी लग्न करण्याची त्याने चूक केली, आणि परिणामतः बिचारा प्राणास मुकला! नटालीचा उथळपणा समजून येण्यास त्याला मुळीच वेळ लागला नाही.

नटालीजवळ हृदय गुतले असता त्याला कॉकेशस्‌मध्ये जावे लागले. तो गेला तरी त्याचा कीर्तिगध राजधानीत दरवळतच होता. पुष्किन्‌सारख्या लोकप्रिय कवीची पत्नी होण्याची स्वप्ने नटालीला भारून टाकीत होती. झारला निरुत्तर करणाऱ्या, जनतेच्या लाडक्या कवीच्या पत्नीभोवती कीर्तीचे केवढे तरी वलय झगमगत राहिले! ती मान आपणास मिळावा ही तिची इच्छा. पुष्किन्‌ने अद्याप आपला निर्णय व्यक्त केलेला नव्हता. तो जेव्हा आपल्या निर्णया-बद्दल साशक होता, तेव्हा ती त्याचा आवर्जून अनुनय करीत होती. इतक्या सुदर स्त्रीच्या उत्स्फूर्त अभिसाराची उपेक्षा करण्याइतका पुष्किन् अरसिक होता काय? लग्नाच्या बेडीत अडकावे की नाही याबद्दल सदेह मात्र सपत नव्हता.

रशिया व टर्की यातील चकमकी सुरू होत्या. पुष्किन्‌ला थेट युद्धाच्या आघाडीवर सीमेवर जाण्याची आज्ञा झाली. रशियन सेना पार टिफलिस्‌पर्यंत मजल मारीत गेल्या. पुष्किनने युद्धात फारसा पुढाकार घेतला नाही, परतु चकमकी सपल्यावर तुर्की पाशाला त्याने आपल्या कविता ऐकविल्या. गुणग्राहक पाशाने पुष्किनचा चागला मान-सन्मान केला. आघाडीवर असताना त्याचे गुण शत्रूच्या राजानाही समजत होते... पण पिछाडीवरचे टीकाकार मात्र पुष्किन्‌वर टीकेची राळ उडवीत होते. 'पुष्किन्‌ची कविता म्हणजे लॉर्ड बायरनची भ्रष्ट नक्कल आहे...', 'हा बेटा आफ्रिकन निग्रो आहे...', 'वागण्यात रानवट आहे' असे टीकेचे प्रहार होत होते. पुष्किन्‌ने या विधानाना औचित्य-पूर्ण कवितेतून ठामठोक उत्तरे दिली.

आपल्या मुलाची कीर्ती वाढत असलेली पाहून पुष्किन्‌च्या वडिलाना खूप आनद वाटला. त्यानी त्याला आपल्या वतनवाडीचा काही भाग व २०० गुलाम एवढी इस्टेट देऊन टाकली. पुष्किन् काही दिवस आपल्या वतनवाडीवर राहिला. तेथील वास्तव्यात त्याने युजीन ओनेजिन ही आपली स्वतत्र सामाजिक कादबरी लिहिली. सपूर्णतया वास्तव नायक रगविणारा पुष्किन् हा पहिला लेखक. त्यानतर त्याने चार नाटके व लघु-कथा (बेल्किन्स टेल्स) लिहिल्या. अत्यत साध्या सोप्या भाषेत लिहिलेल्या या कथा खूप लोकप्रिय झाल्या. याखेरीज लहानसहान कविता तो लिहीत होताच. अत्यत वेगाने साहित्यनिर्मिती होत होती. जणू लग्नाची बेडी अडकवून घेण्यापूर्वी तो साहित्याचे देणे देऊन टाकीत होता.

त्याने लग्नाला होकार देताच नटालीच्या आईने खर्चाचे आकडे धडाधड सागायला सुरुवात केली. वस्तुत हुडा (रशियात भर-

पूर हुंडा घेत असत!) आणि वधूचा वेष ह्या खर्च नटालीच्या आईने करायचा होता. हुंडाबिडा काही मिळाला नाही! अन वर वधूच्या वेषाचा खर्च (१२००० रुबेल्स!) पुष्किन्ने करावा असा नटालीच्या आईचा हट्ट! नुसत्या एका पोषाखावर इतकी रक्कम खर्च करणे पुष्किनला महामूर्खपणाचे वाटत होते–पण सासूचा आग्रह तर मोडवत नव्हता! अखेर कर्ज काढून, आपले साहित्य प्रकाशकाला विकून पुष्किन्ने पैसा उभा केला. लग्नाच्या आदल्या दिवशी 'ब्रह्मचर्याचा' अखेरचा दिवस मित्राच्या सहवासात साजरा केला. आणि अखेर १८ फेब्रुवारी १८३१ रोजी त्याने लग्न केले. लग्नाच्या वेळी विलक्षण अपशकून झाले. पवित्र धर्मग्रंथ खाली पडला. मेरीमातेपासच्या मेणबत्त्या विझल्या. आणि बोटात घालताना अंगठीसुद्धा खाली पडली. ही दुश्चिन्हे धर्मगुरूना आणि उपस्थितांना बेचैन करून गेली. दुष्ट भविष्याची शंका सर्वांच्याच मनात डोकावून गेली.

स्वतः पुष्किनही शकुन-अपशकुन-भविष्य असल्या गोष्टीवर विश्वास ठेवीत असे. एकदा एका भविष्य सांगणाऱ्या जर्मन स्त्रीने त्याचे भविष्य वर्तवले. 'आज तुम्हाला पैसे मिळतील, मित्राचे पत्र येईल... तुमचा खून होईल–उंच अशा व्यक्तीकडून तुमचा वध होईल. त्या व्यक्तीचे केस खूप दाट असतील.' पुष्किन्ने त्या भविष्याचा प्रथम काही फारसा गंभीरपणे विचार केला नाही. पण घरी येतो, तो खरोखरच मित्राने पत्र व पैसे धाडलेले आढळले... मग मात्र त्याचा विश्वास बसला.

नटाली सबंध दिवस सौंदर्याच्या आराधनेत दंग असे. सुंदर कपडे घालायचे, पार्टीजमध्ये मिरवायचे–बाहेर मार्केटिंग करीत हिंडायचे, सर्वांकडून स्वतःच्या सौंदर्याची स्तुतिस्तोत्रे ऐकायची–घरात काहीही–काम तर सोडाच–पण लक्षही द्यायचे नाही–फक्त आत्मरतीत दंग! असा तिचा कारभार (?) होता. त्यामुळे नोकराना सारे रान मोकळे! हिशोबाचा पत्ताच नाही–संसार करणे हा आपल्या कर्तव्याचा भाग आहे, ती एक जबाबदारी आहे असे काही तिला वाटत नव्हते. नटणे-मुरडणे, सौंदर्यासक्ती, कलासक्ती–बस् एवढेच! तिच्या असल्या वागण्यापायी पुष्किन्ला भयंकर त्रास होऊ लागला. कित्येकदा कविराजांना नोकराच्या भांडणात लक्ष घालावे लागे–एखाद्याला काढून टाकून दुसरा नेमावा लागे–शोधावा लागे. असल्या उद्योगात लक्ष घालणे अटळ झाले. बायको अप्सरा होती–ती असल्या फालतू गोष्टीकडे पहातही नसे.

पुष्किन्ची व्यथा एवढ्यावरच थांबली नाही. नटाली फक्त पार्थिवाशीच खिळलेली होती. तो ज्या अमूर्त गहन जगाचा वेध घेत होता, त्याची जाणीव तिला मुळीच नव्हती. दोघांची भाषाच मुळी वेगळी होती–अन् एकमेकाना ती कळत नव्हती. तिला त्याच्या कीर्तीचा झगमगाट हवा होता–पण त्याचे काव्य मात्र मुळीच नको होते (समजतच नव्हते!). इतर कोणाच्या आग्रहाने तो स्वत:ची कविता म्हणू लागला, की ती जांभया देत म्हणे, 'पुरे. बाई! कटाळा आला त्या कविताचा!' हे तिचे विधान ऐकले की पुष्किन्चा उत्साह एकदम मिटून जाई. समाजात आपला मोठेपणा मिरवायचा, सौंदर्यप्रसाधन करायचे, स्तुतिपाठकाना विषय पुरवायचे असल्या गोष्टीत ती अत्यंत पारगत होती. विवाहापूर्वी पुष्किन् एकदा म्हणाला होता, 'सुंदर स्त्रियाना सुशील असण्याची काही तरी गरज असते काय? आपले सर्वांग सुंदर राखणे हेच त्यांचे मुख्य काम–ते त्यांनी केले म्हणजे पुरे!' आता या वाक्याचा पूर्ण प्रत्यय घरात येऊ लागला होता. आणि तो अनुभव अक्षरशः बेचैन करणारा होता.

एकदा एका बॉल नृत्याच्या वेळी नटाली झारच्या नजरेस आली. त्याला ती विलक्षण आवडली. काही ना काही कारणावरून तिला राजवाड्यावर नाच-मेजवान्यांचे आमंत्रण येऊ लागले. तिने राजवाड्यावर नेहमी यावे यासाठी पुष्किन्ला हिस्ट्रोग्रॅफर ही जागा दिली. पीटर दि ग्रेटच्या काळातील ऐतिहासिक साधने जमविणे, जुळविणे असले काम त्याला दिले. ते काम संपल्यावर परराज्यखात्यात नेमणूक! काम काही नाही. पुष्किन्मधला कलावंत विलक्षण वेगाने काम करीत होता. कविता-कादबऱ्या-लोककथा यांचे लिखाण चालू होते. याच सुमारास त्याची गोगोल या रशियन लेखकाची भेट झाली. समानधर्मा भेटल्याचा आनंद केवळ शब्दातीत होता.

लग्नानंतर वर्षभराने नटालीला मुलगा झाला. पण ती अप्सरा मुलाच्या मायापाशात गुंतून पडली नाही. समाजात मिरविण्याची दांडगी हौस. पुष्किन् त्यावेळी 'डचुब्रोव्हस्की' ही कादंबरी लिहीत होता. नाटचरचनाही सुरू होती. त्याने लिहिलेल्या वात्रटिका हातोहात फिरत होत्या. पुष्कळशा लब्धप्रतिष्ठितांच्या टोप्या उडत होत्या. अधिकारीवर्ग पुष्किन्वर नाराज! पण त्याचे उच्चारण करणे अशक्य. कारण खुद्द झारच नटालीसाठी खुळावला होता. ती वस्तुस्थिती सहन करणे पुष्किनला केवळ असह्य वाटत होते. पतीपत्नीत दुरावा निर्माण झाला होता. तिच्या गैरवर्तनाचा उल्लेख करताच ती त्याला त्याच्या विवाहापूर्वीच्या गैर वागणुकीची आठवण देत असे, वेळेनुसार काडकन् थोबाडीत द्यायलाही मागेपुढे पहात नसे. तिचे चाहते असख्य होते. पुष्किन् अगदी घुसमटून जात होता. काही दिवसांपुरता तो आपल्या वतनवाडीवर रहायला गेला–नटाली बरोबर आली नाही. तिथे खेड्यात थोडेच असे ऐटदार स्तुतिपाठक होते? इथे तर झारचीही मर्जी होती! मग काय उणे पडणार?

पुष्किन्चा सर्वश्रेष्ठ गुण म्हणजे त्याची अलौकिक प्रतिभा. पण त्या प्रतिभेची नटालीच्या लेखी शून्य किंमत होती. तिला फक्त त्याची कीर्ती हवी होती. पुष्किन्च्या प्रतिभेचे उन्मेष अखिल रशियाला भारून टाकीत होते. ब्रान्झ हॉर्स–युजीन–क्वीन ऑफ स्पेड–फिशरमन् अॅण्ड दि फिश प्रिन्सेस–अशा साहित्यकृती निर्माण झाल्या. पण त्या तिने नगण्यच मानल्या. १८३३ च्या अखेर पुष्किन् पुनश्च पीटर्सबर्गला आला. तो काही झारकडे डान्सला वगैरे जात नसे. नटालीने बॉल डान्सला यावे अशी झारची इच्छा. पण भवऱ्याला बोलावणे नसल्याने तिला जाता येईना. अखेर झारने सोपी युक्ती काढली. पुष्किन्ला Gentleman of the Chember हा किताब (?) देऊन राजवाड्यात हजर रहाणे भाग पाडले. पुष्किन्ला गणवेश चढवायला लावून, राजवाड्यात हजर रहाण्याची सक्ती करणे हा भयकर उपहास होता. त्याच्या स्वतंत्र प्रतिभेची ती क्रूर, जीवघेणी थट्टा होती. राजसत्तेने प्रतिभेला

चक्क वेडावून दाखविले होते. पुष्किन् सतापाने झपाटला होता. देशत्यागाच्या प्रयत्नात होता–ते प्रयत्न सफल होणे शक्यच नव्हते...कारण झारची गुप्त पोलिसी नजर त्याचा सतत पाठलाग करीत होती. असल्या प्रतिभेची गळचेपी करणाऱ्या देशात जन्माला आल्याबद्दल पुष्किन् स्वत:च्या नशिबाला बोल लावीत होता. त्याच्या प्रत्येक हालचालीची वर्दी झारपर्यंत जात होती. सर्व पत्रव्यवहार–खाजगी चिट्ठीचपाटीसुद्धा गुप्त पोलिसांच्या कार्यालयात हजर होत होती. राजसत्तेने वटारलेल्या डोळ्यापायी पुष्किन् गुदमरून जात होता.

### संसाराची परवड

पुष्किन्च्या घरातले वातावरण तर केवळ दुःसहच म्हणायला हवे. नटालीला प्रत्येक दीड–दीड वर्षानें मूल होत होते. पण ती महिनाभरसुद्धा मुलात गुतून पडत नव्हती. बाळतपणातून मोकळी झाली की लगेच तिच्या सामाजिक हालचालींना सुरुवात होई. तो तिला लिहीत होता– 'अग, जरा मुलांकडे लक्ष दे...राजवाड्यात नृत्यसमारंभाला जाऊ नकोस ग...१०५ व्या पायरीवर गर्भपात होईल–काळजी घे!' पण तिला घरात ठेवण्यास कोणताही अडसर समर्थ नव्हता. एकदा खरोखरच पुष्किन्ची दुष्ट शंका खरी झाली...पण...उपयोग काय? नटालीला चैनीची अन् नव्या कपड्याची भयंकर हौस. घरात कायम शिंपी बसविलेला असे. सतत नव्या फॅशन्सचे वेड! अक्षरशः चटक! पुष्किन् म्हणे, 'आमचे घर म्हणजे शिंप्याचे दुकान झाले आहे!' ...आपण करतो त्या त्या फॅशन्स नवऱ्याला परवडतात की नाही याचा तिळमात्र विचार नाही! नटालीच्या उधळेपणापायी पुष्किन् कर्जात बुडत होता. भराभर लिहीत होता. प्रकाशकांशी वायदे करून आगाऊ रक्कम मागून घेत होता. पैशासाठी अक्षरशः जिवाचे रान करीत होता–नटालीला पर्वा नव्हती–जाणीव नव्हती. फक्त आत्मरती!

नटालीच्या दोघी बहिणी पुष्किन्च्या घरी कायमच्या रहायला आल्या. (त्याच्या लग्नानंतर ३–४ वर्षांनी) आईच्या दुर्वर्तनास कंटाळून त्या नटालीकडे आल्या होत्या. पुष्किन्ची जबाबदारी आणखीच वाढली. इतके दिवस एकाच स्त्रीला सांभाळून घ्यायचे होते. आता त्यात दोघींची भर पडली. सतत लिहूनही खर्चाची तोंडमिळवणी होईना. नोकरीचा राजीनामा देऊन आपल्या वडिलार्जित वतनवाडीवर जावे व शांतपणे भरपूर लेखन करावे ही त्याची इच्छा. पण झार इतक्या कृपण मनोवृत्तीचा होता की, पुष्किन्ला रजा मंजूर झाली नाही. तरी पण सहा महिन्यांतच रजा घेऊन तो मिखिलोव्हस्कीच्या वतनवाडीवर गेलाच. नटालीने बरोबर येण्याचे चक्क नाकारले. नाच, गाणी, शॉपिंग, मिरवणे हेच तिचे जीवितकार्य! मग ती खेड्यात येणार कशी?

पुष्किन्ची मेहुणी अलेक्झॅण्ड्रा हिला मात्र पुष्किन्ची श्रेष्ठता जाणवली होती. ती त्याच्याविषयी मनःपूर्वक स्नेहादर बाळगीत असे; त्याची योग्य ती बूज राखीत असे. तेही क्षुद्र मनोवृत्तीच्या नटालीला कधी आवडले नाही. बहिणीबहिणी मांजरीसारख्या फिस्कारून भांडत असत. हे एक नवेच यातनापर्व होते. घरातली आर्थिक स्थिती कमालीची ताणलेली होती. अनेकांचे पैसे द्यायचे उरलेले होते. घरातल्या चांगल्या वस्तू सावकाराकडे गहाण पडलेल्या होत्या. नटालीचे स्तुतिपाठक ही एक कायमची डोकेदुखी होती. कवितेवरील टीकाकार मूर्खपणाने टीका करून पुष्किन्च्या मन:शांतीला चूड लावीत होते. तशात पुष्किन्ची आई मृत्यूच्या दारात पडली होती आणि नटालीचे दिवस भरत आलेले होते.

अशा स्थितीतही पुष्किन्चा आशावाद दुर्दम्य होता. त्याने नव्या उमेदीने एक त्रैमासिक काढण्याची योजना हाती घेतली. त्यात खोडा घालणारे अनेक हितशत्रू होते. सरकारी परवानगी रेंगाळली–पोलिस् बडगा...सी. आय्. डी. ची नजर...या सर्वांमुळे पुष्किन् अक्षरशः वैतागून गेला. रशियात जन्मल्याबद्दल तो स्वत:ला दुर्दैवी समजत होता यात मुळीच आश्चर्य नाही. सतत नाकेबंदी चाललेली होती. अखेर एकदाची मासिकाला परवानगी मिळाली. तो पीटर्सबर्गला त्रैमासिक काढण्यासाठी निघाला. तत्पूर्वी पुष्किन्ला त्याच्या मित्राने खास मेजवानी दिली. मेजवानीच्या वेळी इतके अपशकून झाले की पुष्किन्चा पाय काही निघेना...अखेर मध्यरात्र उलटल्यावर तो पीटर्सबर्गला निघाला.

पुष्किन्ने काढलेल्या 'कॉन्टेम्पोररी'–'समकालीन' या त्रैमासिकातून त्याला काही फारसा फायदा झाला नाही. त्रैमासिकाचा सूर असा होता की वरवर पहाता हे मासिक फक्त उच्चभ्रू लोकांसाठी आहे, अशीच सामान्यांची समजूत झाली. त्यामुळे खपावर परिणाम झाला. कर्जाचा भार वाढत गेला. घरातल्या मौल्यवान वस्तूंनी सावकाराच्या घराची वाट धरली. तशा स्थितीतही पुष्किन् लिहीतच होता. 'कॅप्टन्स् डॉटर' ही कादंबरी पूर्ण झाली. तो पुष्किन्चा 'मास्टरपीस' समजला जातो. आजवरचे त्याचे साहित्यक्षेत्रातले कर्तृत्व केवळ आश्चर्यकारक होते. भौतिक जीवनात अनेक ताण होते–पण तरीही त्याला आपल्या अजरामर कर्तृत्वाविषयी अभिमान होता. त्याने लिहिले होते, 'मी संपूर्णपणे कधीही मरणार नाही!'

Friends for the poet you are
grieving
Cut off before the hopes could
bloom,
The world of glory thus
bereaving
He came–unripe to the tomb.
I Shall not wholly die, but in
my songs my spirit
Will, incorruptible and bodiless
survive–
And I shall be renowned as long
as under heaven
One poet yet remains alive,
The rumor of my fame will
sweep through vasty Russia
And all the people speak this
name that yet shall gain
Regard from slav unborn, the
Finn, the savage Tungus,
The kalmuck horsemen of the
plain.

जगाच्या इतिहासात अजरामर होण्याची खात्री पटावी इतकी त्याची साहित्यसेवा विस्तृत व अस्सल होती यात मुळीच संशय नव्हता.

इ. १८३६. नटाली आता चार मुलांची आई झालेली होती. एकंदर पाच वेळा गर्भधारणा. तथापी तिच्या सौंदर्यात रतिमात्र

फरक पडला नव्हता. झार तिच्याबरोबर नृत्य करण्यास, तिचे स्तुतिपाठ गाण्यास अद्याप पूर्वीइतकाच उत्सुक होता. पण आता तिचे लक्ष दुसरीकडे गेलेले होते. बॅरन् जॉर्ज चार्लस् डी ॲन्थीस् हा फ्रेंच माणूस १८३० च्या फ्रान्समधील क्रांतीनंतर देश सोडून रशियात आला होता. लष्करात अधिकारी... अत्यंत देखणे, रुबाबदार व्यक्तिमत्त्व... स्त्रीवर्गात विलक्षण लोकप्रिय...नटालीला डी ॲन्थीसचे आकर्षण वाटले. तिला हवा होता तसाच तो आदर्श पुरुषश्रेष्ठ होता. श्रीमंत होता, सुस्वरूप होता. पुष्किनजवळ हे दोन्ही गुण नव्हते. नटालीची बहीण कॅथेराइन् ही सुद्धा डी ॲन्थीसकडे आकृष्ट झाली– त्यावरून बहिणीबहिणींचे हेवेदावे सुरू झाले. आपली दुसरी बहीण– अलेक्झॅण्ड्रा ही पुष्किन्‌कडे आकृष्ट झालेली आहे असाही नटालीला संशय होता. (तो साफ निराधार होता.) परिणामत: सर्व घर वासनांच्या धगीत होरपळून निघत होते. एकमेकां-विषयीच्या संशयाने घरातल्या आनंदाला चूड लागली होती. सबंध वातावरण नासून गेले. सर्वजण एकमेकांवर डाफरत होते– फिस्कारत होते. भांडणे, वाद, स्वार्थ, आरोप, संशय, रडणे कशालाच अंत नव्हता. पुष्किन् आणि नटाली ही दोघेही शोकावर्तात गर-गरत होती. पुष्किन्‌ला प्रेम मिळत नव्हते. आणि नटालीला आपल्या आवडत्या व्यक्ती-वर मनसोक्त प्रेम करता येत नव्हते. अशी ती दुहेरी शोकांतिका सुरू झाली. अतृप्त वासनांच्या कल्लोळाने सर्वजण अस्वस्थ ! त्या जखमेवर मीठ चोळणारी आर्थिक अड-चण रुद्ररूप धारण करीत होती. भाऊ बहीण सर्वजण पैशाची अपेक्षा करीत होते, त्यासाठी कटकट करीत होते. त्यामुळे ज्या जीवनावर इतके दिवस तो असोशीने प्रेम करीत होता ते जीवनच आता त्याला नकोसे होऊन गेले.

पुष्किन्‌च्या मन:शांतीचे वस्त्र पुरे फाटून गेले होते. तशात असह्य आघात केला तो हितशत्रूकडून आलेल्या निनावी पत्रांनी. अत्यंत हिडीस भाषेत तो बाईलवुद्धया व नालायक नवरा असल्याची किताबत त्या पत्रात दिलेली होती. कोणाही व्यक्तीला असली भाषा, इतका उपहास सहन होणे केवळ अशक्य होते. तो जाईल तेथे ही निनांवी पत्रे हजर होत– त्याला अस्वस्थ करून सोडीत. पत्रलेखक समोर भेटला असता, तर पुष्किन्‌ने त्याचा गळा दाबून तेथल्या तेथे ठार केले असते. पण पत्रलेखक भेकड होता... *निनावी राहून भेकडपणाने* खोडी काढीत होता. सतत पत्रांचा मारा करीत होता... कोण होता तो ?

डी ॲन्थीसची नटालीशी सुरू असलेली वाढती मैत्री पाहून याच वदमाशाने हा पत्र-लेखनाचा उपद्व्याप केला असावा अशी पुष्किन्‌ची समजूत झाली. त्याने डी ॲन्थीसला युद्धाचे आव्हान दिले. ते स्वीकारण्यास डी ॲन्थीस कचरला. अशा तऱ्हेने बदुकीने द्वंद्व करू नये यासाठी डी ॲन्थीसच्या बाजूने भरपूर प्रयत्न झाले. इतके, की त्याने आपले कॅथेराइनवर खरोखरच प्रेम आहे असे व्यक्त करण्यासाठी घाईघाईने तिच्याशी लग्नसुद्धा करून टाकले. कॅथेराइनला (नटालीची बहीण) आपल्याला इतका सुंदर, श्रीमंत नवरा मिळेल अशी स्वप्नातही अपेक्षा नव्हती. पण आपण या पत्रलेखनाच्या भानगडीपासून अलिप्त आहोत हे सिद्ध करण्यासाठी १० जानेवारी १८३७ रोजी डी ॲन्थीसने लग्न करून टाकले.

आणि तरीही असली भीषण उपहास करणारी पत्रे येतच राहिली– पुष्किन् बेफाम होतच राहिला ! या सर्व प्रकाराचा शेवट द्वंद्वयुद्धाशिवाय होणे शक्य नाही, असेच त्याच्या मनाने घेतले. घरात सुखाची सावली नव्हती. बाहेर बेअब्रूचा धाक ! झारचे गुप्त-पोलीसखाते अत्यंत कार्यक्षम ! त्यापायी देश सोडून जाणे अशक्य ! नटालीचे वर्तन सुधारण्याची आशा सुटलेली. अशा अवस्थेत द्वंद्व करून मोकळे होणेच बरे असे त्याने ठरविले. जगलो, तर शत्रूला ठार करून जगेन– मेलो, तर सर्व त्रासातून एकदाचा सुटेन अशी त्याची भूमिका !

२७ जानेवारी १८३७ रोजी ठरल्याप्रमाणे शहरापासून दूर ठिकाणी हे द्वंद्व झालेच. त्यात डी ॲन्थीसची गोळी पुष्किन्‌च्या तळ-पोटात तिरपी खोल घुसली. तशा अवस्थेत त्याने प्रतिपक्षावर गोळी झाडली. डी ॲन्थीस घायाळ झाला. पण मेला नाही. पुष्किन्‌ला उभे रहाणे अशक्य झाले. जखम भयंकर होती. खडबडीत रस्त्यावरून येताना गाडीच्या हिसक्यापायी असह्य यातना होत होत्या. भळभळ रक्त वहात होते. पुष्किन्‌चा चेहेरा अगदी आक्रसून गेला होता.

घरीं आणून निजविल्याबरोबर पुष्किन-साठी डॉक्टरांना बोलवण्यात आले. त्यांना पुष्किन् म्हणाला.

'खरं सांगा डॉक्टर–जखम कितपत भया-नक आहे ? '

'मी तुम्हाला अंधारात ठेवू इच्छित नाही. जखम काळजी करण्यासारखी आहे. पण आम्ही खूप प्रयत्न करू.'

मग लगेच ख्रिश्चन धर्मानुसार धार्मिक विधी उरकण्यात आले. डॉक्टर म्हणाले, 'तुम्हाला विशेष कोणाला भेटायचे आहे काय ? '

पुष्किन्‌ने प्रतिप्रश्न केला, 'त्याची आताच गरज आहे काय ? '

'तसे नाही...पण भेटायचे असल्यास निरोप देता येईल...' पुस्तकांच्या रांगांकडे पाहून हात हालवीत पुष्किन् म्हणाला, 'मित्रांनो, गुड्बाय ! '

द्वंद्वयुद्धात पुष्किन्‌ला जिव्हारी जखम झाल्याची वार्ता वणव्यासारखी पसरली. त्याच्या घराभोवती लोकांचे थवे जमा झाले. गर्दी क्षणाक्षणाला वाढत गेली. इतकी अपार गर्दी पाहून एक जख्ख म्हातारा म्हणाला, 'रशियाचा सेनापती कुटुझोव्ह अखेरचे श्वास मोजीत होता–तेव्हा याच्या निम्म्याने देखील गर्दी नव्हती ! '

पुष्किन्‌ला यातना सहन होत नव्हत्या. जिवाची अक्षरश: तडफड चालली होती. आपली उलघाल नटालीने पाहू नये म्हणून तो तिला खोलीबाहेर जायला लावी. किंचित बरे वाटले की तिला बोलावून घेई...पण थांबू देत नसे. मृत्यू अगदी समीप दिसू लागल्यावर त्याने तिला सांगितले की... १–२ वर्षे तरी तू लग्न करू नयेस. दूर–शहरापासून दूर रहा–आणि मग चांगला घरंदाज प्रतिष्ठित माणूस पाहून लग्न कर–पुनश्च संसार कर...(नटालीने ही पुष्कि-न्‌ची इच्छा तंतोतंत पाळली हे सांगायला नकोच.) मग त्याने मुलांना पहाण्याची इच्छा व्यक्त केली. एकेक करून चारही मुलांना जवळ आणण्यात आले. त्यांनी बापाला आपल्या बाळडोळयांनी पाहून घेतले. अत:पर त्यांना तो फक्त चित्रातच

दिसायचा होता. दोन दिवस मरणप्राय यातना सहन करून २९ जानेवारी १८३७ रोजी पुष्किन्चा देहान्त झाला.

बंदुकीने द्वंद्वयुद्ध करणे हे बेकायदा असल्याने कायदेशीररित्या पुष्किन् 'गुन्हेगार' धरला गेला. मृत्यूनंतरही सरकारने त्याच्या 'गुन्हेगारीला' (?) क्षमा केली नाही. त्याच्या अंत्ययात्रेची विलक्षण परवड केली. एका विशिष्ट चॅपेल्मध्ये अंत्यसंकार करण्यात येईल असे सरकारने जाहीर केले. तेथे अतोनात गर्दी लोटणार, लोक या सरकारविरोधी कवीला उत्स्फूर्त मानवंदना देणार हे स्पष्ट दिसून येताच सरकारचे धाबे दणाणले. पुष्किन् हा सत्ताधीशांचा विरोधक ...सरकारी दृष्टचा तर चक्क गुन्हेगार... तेव्हा असल्या माणसाविषयी जनतेने प्रेमादर व्यक्त करावा ही गोष्ट कांही सरकारला योग्य वाटेना. काहीही करून अंत्ययात्रेत जनतेला सामील होऊ द्यायचे नाही आणि राजसत्तेला विरोधी असणाऱ्या माणसाचा मृत्यूनंतरही जयजयकार होऊं द्यायचा नाही असे झारने ठरविले.

रात्री पुष्किन्च्या घरात हत्यारबंद पोलीस पाठवून त्याचे शव सरकारने ताब्यात घेतले. दुसऱ्याच एका लहानशा चर्चमध्ये ठेवले. अंत्यसंस्काराची जागा व वेळ याबाबतीत जनतेची चक्क फसवणूक करण्यात आली. पुष्किनला सतत विरोध करणाऱ्या मोजक्या सरकारी अधिकाऱ्यांच्या औपचारिक उपस्थितीत अलिप्तपणे प्रार्थना म्हणण्याचा उपचार उरकण्यात आला. नंतर तो देह एका लाकडी पेटीत कोंबून घाईघाईने Pskov येथील स्मशानभूमीत पाठवून देण्यात आला. तेथे पाठविण्याचे कारण की पुष्किन्च्या वडिलांची दफनभूमी तेथे होती, आणि वडिलांच्या जागीच पुष्किन्चेही दफन करण्याची झारची आज्ञा होती. एखादा चोरीचा माल घाईघाईने पळवावा त्याप्रमाणे पुष्किन्चा देह सरकार अक्षरशः पळवून नेत होते. तीन दिवस एका वैशिष्टचहीन वाहनातून प्रवास चालला होता. ठराविक ठिकाणी घोडे बदलण्याची व्यवस्था केलेली होती. एका ठिकाणी घोडे बदलीत असता चौकस माणसाने गाडीत शवपेटिका पाहून सारथ्याला विचारले, 'कोण आहे हो?' अडाणी गाडीवान म्हणाला 'कोण जाणे बुवा! कोणी तरी पुष्किन् पुष्किन् म्हणून म्हणतात तो असावा!'

Pskov येथील स्मशानभूमीत केवळ ३–४ जणांच्या उपस्थितीत पुष्किन्चे दफन झाले–एखाद्या गुन्हेगाराप्रमाणे! लोकांच्या मनात संताप उसळून आला. पण खुद्द झारनेच केलेल्या कृत्याचा जाब कोणाजवळ मागणार?

पुष्किन् कायमचा नजरेआड झाला, आणि त्याच्या लोकप्रियतेस उधाण आले. शत्रूही मित्र बनले. १८३८ मध्ये 'संपूर्ण पुष्किन्' सरकारी खर्चाने प्रकाशित झाले. पुष्किन्ला असलेले जवळ जवळ दीड लाखाचे कर्ज झारने मिटविले. १८४० मध्ये बेलिन्स्कीने अभ्यासपूर्ण टीपा देऊन पुनश्च संपूर्ण पुष्किन् प्रकाशित केला. त्यानंतर अनेक प्रकारचे संशोधन होऊन पुष्किन् स्पेशॅलिस्ट तयार झाले. पुष्किन्चे साहित्य हा रशियाचा मानबिंदू समजला गेला. त्याने लिहिलेल्या ओळी रशियन भाषेत वाक्प्रचारासारख्या रूळून गेल्या, अजरामर झाल्या. रशियामधल्या फॅशन्स बदलल्या, सरकार बदलले, जीवनपद्धतीही बदलली तरीही जनमानसावरील पुष्किन्ची प्रतिमा स्थिर आहे. त्याची जीवनावरील श्रद्धा व प्रेम आजही रशियन माणसाला जीवनाभिमुख करीत असते. □



# बीबीनगरचा डाका...

● अशोक परळीकर, परभणी ●

'भारत माता की जय' 'महात्मा गांधी की जय' 'स्टेट कॉंग्रेस जिंदाबाद' १०-१२ तरुणांनी केलेल्या जयजयकाराने बीबीनगरचे निःस्तब्ध रेल्वे स्थानक खडबडून जागे झाले. स्थानकावरील कर्मचाऱ्यांना सर्वस्वी अनपेक्षित घटना होती ही. आपापल्या स्थानकावरून उठून ती मंडळी बाहेर आली तर त्यांना 'नारे' देत, स्थानकाबाहेर पडलेली मुले दिसली. ही मुले अशी का धावताहेत? या काळात इतक्या स्वातंत्र्याने 'भारत माता की जय' 'स्टेट कॉंग्रेस जिंदाबाद' असे नारे ही मुले का लावताहेत? या घोषणांचा काय परिणाम होईल याची यांना कल्पना नाही काय? बीबीनगरच्या त्या तरुणांना रेल्वे कर्मचारी चांगले ओळखीत होते. तांदूळ आणण्यासाठी रोज ही मुले जनगावला जात. बीबीनगरला तांदूळ मिळत नसल्यामुळे या मुलांचा धंदा व्यवस्थित चालायचा. पण रोजचा आपला पोटापाण्याचा धंदा सोडून ही मुले आज मोकळी कशी? 'भारत माता की जय' ही घोषणा इतक्या उघडपणे हे कसे आणि का देताहेत? थोड्यावेळापूर्वी दुरून जिंदाबादचा आवाज या रेल्वेवाल्यांनी ऐकला होता. मग ही मुले प्लॅटफॉर्मवरून तिकडेच धावली की काय? तरुण मुलांच्या घोषणांचा आवाज स्थानकावर अजूनसुद्धा प्रतिध्वनित होत होता.

रेल्वे स्थानकाबाहेर आलेली ही मुले उत्साहाने, उंचउंचस्वराने घोषणा देत मुख्य रस्त्याला लागली. समोरून दोन लॉऱ्या आणि एक जीप हैदराबादकडे जाणाऱ्या रस्त्यावरून येत होती. घोषणा देणारी मुले आणि ही वाहने समोरासमोर आली. मुलांच्या घोषणा चालूच होत्या. हा जयघोष कानी पडताच ती वाहने थांबली आणि समोरच्या लॉरीतून शस्त्रधारी सैनिक खाली उतरले आणि या मुलांच्या मागे धावले. लॉरीतून उतरणाऱ्या सैनिकांना पाहाताच मुलांचे धाबे दणाणले आणि घोषणा थांबवून ते गावाच्या दिशेने भरधाव धावले. सैनिक त्यांच्या मागे होतेच. बिचारी मुले! थोड्यावेळापूर्वी उत्साहाने घोषणा देणारी मुले, भयभीत होऊन, या राक्षसांच्या हाती न सापडावे म्हणून, आश्रयार्थ, गावाकडे वळली.

१० जानेवारी १९४८ ची गोष्ट. मुस्त्यालपल्लीच्या छोटेमियाकडे मजलिसे इत्तेहादुल मुसलमीनचे अध्यक्ष, रझाकारांचे सालारे आझम, कायदे सिद्दिक, फील्डमार्शल आलीजनाब कासीम रझवीसाठी 'खास दावत' होती. त्या दिवसात रझवीचे फार प्रस्थ होते. राज्याचे प्रधानमंत्री लायकअली याच्या मर्जीतले होते. याच्याच दबावामुळे सर मिर्झा इस्माईल आणि छत्तारी नबाबाला प्रधान मंत्रीपदावरून हलविण्यात आले. याला कोणी दुखवीत नसे. थोडक्यात हैदराबादचे राज्य याच्या 'मुठीत' होते. कासीम रझवी हैदराबादचा 'डी फॅक्टो' शासक—बादशहाच होता. हैदराबादला स्वतंत्र ठेवण्यासाठी—नव्हे हैदराबादचे स्वतंत्र इस्लामी राज्य बनविण्याचे स्वप्न पूर्ण व्हावे म्हणून निझाम, कासीम रझवीला आणि त्याच्या तालावर नाचणाऱ्या अन्य व्यक्तींना, प्रोत्साहन देत होता. कासीम रझवी निझामाचा प्रवक्ता बनला होता. त्याने रझाकारांची एक सेनाही उभारली होती. त्याच्या सैन्याचा दररोजचा खर्च जवळपास तीस हजार होता.

मुस्त्यालपल्लीच्या छोटेमियाकडे आज कासीम रझवीला खास जेवण होते. मुस्त्यालपल्ली भोंगीर डिव्हिजनमधील एक छोटेसे खेडे आहे. परंतु हा छोटेमिया मात्र महाकाय होता—पहेलवान गडी होता. त्या परिसरात गुंडगिरीमुळे त्याने स्वतःसाठी एक असामान्य (!) स्थान निर्माण केले होते. त्याच्या नावाचा वचक भयंकर होता, लोक चळचळा कापत असत. रझवीच्या आजच्या येण्याने त्याच्या कीर्तीत (!) भर पडली होती. कासीम रझवीच्या नाकातील बाल असा बोलबाला होण्याची शक्यता होती. छोटेमिया रझाकार नेता होता.

सालारे आझम कासीम रझवीचे प्रवासाला बाहेर पडणे त्याच्या लौकिकाला साजेलसे होते. मागेपुढे शस्त्रसज्ज रझाकार सैनिक असलेल्या लॉऱ्या आणि जीपमध्ये खास सहकाऱ्यांसह रझवीचे आसन. नेहमीप्रमाणे आजही आपल्या अंगरक्षक दलासह कासीम रझवी 'खान्या'ला उपस्थित होता. आजच्या 'खान्या'ला खासखास मंडळी पाचारली गेली होती. कुलपाकचा तहसीलदार, मोतकूरचा दाढीवाला अमीन (याच नावाने प्रसिद्ध (!)), भोंगीरचे डेप्युटी कलेक्टर, गुडूरचे दस्तबंदार मीर कादर अलीखान आणि मोहम्मद हाजी सिकंद्राबाद आदि खास निमंत्रणावरून उपस्थित होते. जणू भोंगीर विभागातील भुतावळ एकत्र झाली होती. त्या दिवसात राज्यात अन्नधान्याचे दुर्भिक्ष होते. जेवणावळीवर बंदी होती. परंतु रझाकारांसाठी या बंदीला काही अर्थ नव्हता. अशा विशेष प्रसंगी खेड्यातून अन्नधान्य, बकरे, कोंबड्या आणि दूध खंडणी म्हणून 'वसूल' केले जाई. अर्थात खंडणी देणारा वर्ग नेहमी हिंदूच असायचा.

हसत, गप्पा मारीत खाना आटोपला. भोजनोत्तर आराम करून आवश्यक सल्लामसलत झाली. साधारणतः चार वाजण्याच्या सुमारास आपल्या अंगरक्षक दलासह कासिम रझवी परतीच्या प्रवासाला निघाला. भोंगीर मार्गे त्याचे आगमन गुडूरला झाले. तेथे दस्तबंदार मीरकादर अलीखानकडे चहापाणी झाले. आता ते हैदराबाद मार्गावरील बीबीनगर या गावावरून जात होते. रस्त्यात जिथे जिथे एखादे खेडे, वस्ती आदी दिसे तेथे रझाकार सैनिक जोरजोरात घोषणा देत. बीबीनगरच्या जवळ आले तसे रझाकारांनी 'आझाद हैदराबाद जिंदाबाद' 'शाह उस्मान जिंदाबाद', 'कायदे सिद्दिक कासिक रझवी जिंदाबाद' अशा गगनभेदी घोषणा दिल्या. स्थानकावर उभ्या मुलांना या घोषणा ऐकू गेल्या. त्यांना वाटले, 'स्टेट कॉंग्रेस जिंदाबाद'चा जयनाद आहे. बहुधा स्टेट कॉंग्रेसचे कार्यकर्ते सत्याग्रहासाठी जात असावेत. तेव्हा स्टेट कॉंग्रेसने सत्याग्रहास प्रारंभ केला होता. त्यांच्या सत्याग्रहाचे लोण

खेड्यापाड्यांपर्यंत पोचले होते आणि म्हणूनच सुरुवातीला उल्लेख केल्याप्रमाणे 'भारतमाता की जय', 'म. गांधी की जय' 'स्टेट कॉंग्रेस जिंदाबाद' आदी जयघोष करीत ती मुले 'जिंदाबाद' आवाज देणाऱ्या दिशेकडे धावली होती.

बीबीनगर एक सामान्य खेडे होते व आहे. हैदराबाद–वरंगल राजमार्गावर हैदराबादपासून २०–२१ मैलावर हे गाव वसलेले आहे. हे एक छोटेसे रेल्वेस्थानकही आहे. तेव्हा निझामाच्या खास जहागीरला 'सर्फे खास' म्हटले जाई. अंबरपेठ तालुक्यात हे खेडे होते. निझामाच्या कोण्या बीबीने हे गाव वसविले म्हणून बीबीनगर हे नाव पडले असे म्हटले जाते. गावाच्या चारही दिशेस चार प्रचंड मेहराबदार दरवाजे आहेत आणि मध्यात एक चौबारा. बीबीनगर कांडानंतर इथेच पोलीस चौकी कायम करण्यात आली.

दुपारचे साडेबारा वाजले असावेत. असहाय्य तरुण आश्रयार्थ वस्तीकडे धावत होते आणि सशस्त्र रझाकार त्यांचा पाठलाग करीत होते. सर्वप्रथम स्टेशन मास्तरांचे घर लागले. रझाकार घरात घुसले. स्टेशन मास्तर अंजनेयलु आणि घरातील अन्य सर्वांना मारहाण करण्यात आली आणि त्यांचे घर लुटण्यात आले. ३०–४० तोळे सोने त्यांना मिळाले आणि वर रोकड रक्कमही मिळाली. पळणाऱ्या तरुणांपैकी एकाने पोसम्मा नाइनच्या घरात आश्रय घेतला. रझाकारांनी त्या घराला आग लावली. शेजारच्या झोपड्याही त्यांनी पेटविल्या. एकच हाहा:कार उडाला. एकेक झोपडी पेटता पेटता अनेक झोपड्या पेटल्या. आगीचे लोळ गगनाला भिडू पाहू लागले. त्या झोपडीवाल्यांच्या मदतीला अन्य गावकऱ्यांनी येऊ नये म्हणून रझाकारांनी अधून मधून 'आवाज' काढले. ग्रामवासीय आपापल्या घराचे दरवाजे बंद करून बसले. पण...? सारा गाव रझाकारांनी वेढला. अग्नीच्या तांडवाने आणि हिंदू जनतेच्या करुण आरडाओरडीने आकृष्ट झालेल्या, रझाकारांचा सालारे आझम, कासिम रझवीने आपली गाडी गावात घेतली. ज्या घरातून लभ्यांश होण्याची शक्यता होती ते घर उघडण्यास भाग पाडण्यात आले. लुटालुटीचे बेबंद सत्र सुरू झाले. झोपड्या, घरे पेटविण्यात येऊ लागली. मारो–जलावो–पकडो–ठोको या आवाजाशिवाय करुण आरडाओरडीचे आणि रडण्याचे आवाज–एकच कोलाहल–गावात भरून वाहू लागले. या आवाजाची भीषणता कमी म्हणून की काय मधूनमधून 'गोळ्यांचा आवाज' ही काळीज करपवून जात होता.

रत्नम्मा नावाच्या अध्यापिकेच्या घरात रझाकार घुसले. ती बिचारी थरथर कापू लागली. संगीनीच्या आधारे तिच्या हातातील (चार) सोन्याच्या बांगड्या आणि एक अंगठी काढण्यात आली. शेजारच्या अय्यावार पुरुषोत्तमाचारी यांना भरपूर मारझोड करण्यात आली आणि हजार–बाराशे रुपयांचे दागिने हस्तगत करण्यात आले. जाता जाता त्यांनी काय विचार केला कोण जाणे परंतु, परतून, त्यांनी पुरुषोत्तमाचारी यांना दोरखंडाने बांधून आपल्याबरोबर नेले. त्यानंतर मल्लागिरी शिवय्या नावाच्या व्यापाऱ्याकडे त्यांनी मोर्चा वळविला. त्याला भयंकर मारहाण करण्यात आली. दागदागिने आणि पैसाअडका मिळाल्यानंतर त्यालाही बांधून बरोबर घेण्यात आले. मंगार राजय्याच्या घरावर



हल्ला करून रझाकारांनी लुटालूट केली. माराच्या भयाने राजय्या पळाला तो एका कोरडया विहिरीत पडला. त्याला असा मार बसला की बिचारा नतर दोन महिने इस्पितळात होता. पिशाच्चानी आपली दृष्टी वजाऱ्याकडे वळविली. बानका बालस्थाला मारझोड करण्यात आली. शिवाय सुऱ्यानी घाव घालण्यात आले. त्याचे घर धुवून घेऊन त्यालाही बांधून घेऊन रझाकार पुढे सरकले. हिंदूचे एकूण एक घर लुटण्यात आले, हिंदूना अमानुष मारझोड करण्यात आली आणि तरुण व तगडया हिंदूना दोरांनी बांधून बरोबर घेण्यात आले. बीबीनगरमध्ये हाहा:कार उडाला. बीबीनगरात दोन तासासाठी रझवीचे अनिर्बंध राज्य होते–सैतानी राजवट होती. या वेळात, या छोटया गावात जाळपोळ, लुटालूट, मार-काट आणि बलात्काराना ऊत आला होता–आणि विशेष म्हणजे हे सर्व सालारे आझम कासिम रझवीच्या उपस्थितीत घडत होते. त्याला आनदाच्या उकळया फुटत होत्या. निझामाने आझाद हैदराबादच्या स्वप्नपूर्तीसाठी सैतानी रझाकाराच्या हाती हिंदू प्रजेला सोपविले होते. बीबीनगरवर झालेल्या अमानुष अत्याचारानी प्रत्यक्ष सैतानसुद्धा लज्जित झाला असावा.

सारी लूट आणि बांधलेले १५–२० कैदी सगाती घेऊन रझाकार सेना आपल्या सालारे आझामबरोबर परत निघाली. जणू रझाकाराच्या एखाद्या महान विजयाची शोभा यात्रा होती ती. साह् उस्मान जिंदाबाद, आजाद हैदराबाद पाईन्दाबाद 'चा जयघोष फिरून एकवार दुमदुमला. एकीकडे बीबीनगर धुं-धु करीत जळत होते. जखमी लोक वेदनेने ओरडत होते. बलात्कारित स्त्रिया–? आणि इकडे विजयाचा (!) जल्लोष करीत रझाकारमडळी गावाबाहेर पडत होती,

कस्टम ऑफिसजवळ येताच बाधलेल्या कैद्यांना लाथा बुक्क्यांचा मनसोक्त प्रसाद देण्यात आला–अगदी स्पर्धा लावून. त्या सर्वाची हाडे खिळखिळी झाली आहेत हे पाहिल्यानतर स्वत: कासिम रझवी पुढे झाला आणि त्याने सर्वांना सुनावले की त्यानी रझाकार आणि शासन याना मनापासून साथ दिली पाहिजे. नाहीतर–त्यांना उपदेशाचे डोस पाजून जाण्यास सांगण्यात आले. कासिम रझवी गाडीत चढला. सर्व रझाकर ट्रकमध्ये चढले. जाता जाता पुन्हा एकदा 'शाह् उस्मान जिंदाबाद 'ची घोषणा देण्यांत आली. वाहने दूरदूर गेली परतु किती तरी वेळ त्यांच्या घोषणेचा आवाज कानावर पडत होता.

त्या छोटयाशा गावाला स्मशानाची अवकळा आलेली होती. अंधार पडावयास सुरुवात झाली होती. त्या अधारात जळती घरे आणि झोपडया यांचे चित्र भयावह आणि भेसूर वाटत होते. सगळीकडे स्मशान शांतता होती. रात्री ९–१० च्या सुमारस मोटारीचा आवाज ऐकण्यास मिळाला आणि त्या गाडयाच्या हेडलाइटसूचा प्रकाश गावाकडे येऊ लागला. त्या गाडयाचे स्वागत वस्तीवरील कुत्री भूकून भूकुन करीत होती. बहुतेक हिंदू जनता गाव सोडून पळाली होती. जे लोक परिस्थितीमुळे जाऊ शकत नव्हते–शकले नव्हते त्याच्या पोटात भीतीचा गोळा उठला. कोणते नवे संकट येणार या काळजीने त्याचे चेहरे पांढरे फट्ट पडले.

स्टेशन मास्तर आजनेयलुने घरावर झालेल्या हल्ल्याचे आणि लुटालूटीचे वृत्त तारेने (टेलिग्राफ) रेल्वे अधिकाऱ्याना (सिकदराबाद येथील) कळविले. तावडतोब रेल्वे अधिकाऱ्यांनी अबरपेठ पोलीस केंद्रावर सूचना दिली आणि बंदोबस्तासाठी पोलीस पथक ट्रक्समधून बीबीनगरकडे निघाले. साधारणत: रात्रीच्या ९ वाजता ते पथक इच्छित स्थळी पोचले. रस्त्यांत त्याची आणि रझाकाराची भेट वार्ता झाली असावी कारण पोलिसानी गावात आल्यानंतर ज्या प्रकारे हे प्रकरण हाताळले त्यावरून कल्पना येऊ शकते.

पोलिसानी आल्यानतर पहिल्यांदा मुसलमान वस्तीकडे जाणे केले आणि त्याना आपापल्या सामानासह वस्तीपासून दूर नेण्यात आले. मुसलमान स्त्रीपुरुष, वृद्ध, तरुण, बालक–सर्वांना सुरक्षित स्थळी हटविण्यात आले. रहाता राहिले हिंदू, त्यांचा जीव टागणीला लागला. पोलिसांनी मुसलमानाना गावाबाहेर, सुरक्षित स्थळी, न्यावे याचा अर्थ काय ? पूर्ण गाव जाळण्याचा तर या लोकांचा विचार नाहीना ? हिन्दूची सरसकट कत्तल तर व्हायची नाही ना ? हिन्दूची अवस्था अति केविलवाणी झाली होती. परंतु मुसलमानांना हलविण्यात आले याचे कारण निराळेच होते. रातोरात एखादे वेळी हिंदू मुसलमानांवर हल्ला करतील आणि बिचाऱ्या मुसलमानांना (!) त्रास देतील म्हणून त्यांना गावाबाहेर डाक बगल्यात, पोलीस पहाऱ्यात, रात्रभर ठेवण्यात आले आणि सकाळी घराकडे जाऊ देण्यात आले.

सकाळी पोलीस पाटील आणि पटवारी यांचा जबाब घेण्यात आला. जबाब काय ? त्यांच्याकडून लिहून घेण्यात आले की कम्युनिस्टांनी अचानक गावावर हल्ला केला, लोकाना मारझोड केली, घरे लुटली आणि शिवाय घरें पेटविली आणि पळाले. पोलीस पाटील ए. लक्ष्मीकान्त रड्डीने एकूण परिस्थितीचा विचार करून त्याना हवा तसा जबाब लिहून दिला. गुप्तचर विभागाने मात्र सत्य कथन करावयास सागितले आणि त्याप्रमाणे लिहूनही घेतले. परतु न कोणाला पकडण्यात आले, न कोणाला शासन झाले.

या झालेल्या घटनेने हिन्दू नेत्याना धक्का बसला. त्यानी तावडतोब बीबीनगरला भेट दिली. भेट देणाऱ्यात सर्वश्री बी. रामकिशनराव, बॅ. लक्ष्मी-रेड्डी, काशीनाथराव वैद्य, विनायकराव विद्यालकार आदि प्रमुख होते. त्यानी घरोघर जाऊन विचारणा केली, हिन्दूचे सांत्वन केले, त्याना धैर्य दिले. 'इमरोज' आणि 'डेक्कन क्रॉनिकल' या वृत्तपत्रानी निर्भयतेने या घटनेचे पूर्णवृत्त दिले. बीबीनगरमधील अधिकांश हिन्दू पळून गेले होते. पोलीस अधिकाऱ्यांनी पोलीस पाटलाला सांगितले की त्याने हिंदू लोकांना परत बोलवावे, आता, त्याचे रक्षण आम्ही करू त्याच्या 'जानो माला' (वित्तप्राण) ला भय नाही. त्यानी नि:शक मनाने आपापल्या घराकडे वळावे, काळजी करू नये. पोलीस पाटील लक्ष्मीकांत रेड्डीने पळालेल्या लोकाना समजावले आणि गावाकडे आणले. (अन्यथा त्याची खैर नव्हतीच) लक्ष्मीकात रेड्डीला पोलीस-पथकाच्या व्यवस्थेत दिवसरात्र जोडल्या हाती उभे रहावे लागे. त्यावेळची त्याची अवस्था केवळ तोच जाणे.

हुजूर निझाम जेव्हा जेव्हा आपल्या प्रजेचा उल्लेख करी तेव्हा तेव्हा म्हणे की, हिंदू व मुसलमान मला माझ्या दोन्ही

डोळ्या इतके प्रिय आहेत. नव्हे. ते माझे दोन डोळेच आहेत. निझामाची वाचा व कृती यामध्ये खूप तफावत होती. वरील प्रकार त्याचेच उदाहरण आहे.

बीबीनगरच्या या घटनेनंतर थोड्याच दिवसात तय्यब रझवी महाशय तेथे आले. त्याने आपला डेरा गावाबाहेर घातला. हे महाशय सालारे-आझम कासिमरझवीचे भाऊ होते असे म्हणतात. पोलीस बंदोबस्तासाठी (कोणाचा ?) आलेले होते. तय्यब रझवी लुटलेल्या आणि पीडित बीबीनगरकडून मालगुजारी वसूल करण्यासाठी आला होता. त्याचे आगमन बीबीनगरवासियांसाठी तापदायकच होते. तय्यब रझवी आपल्या कामाशिवाय पोलीस आणि रझाकारांच्या द्वारे कम्युनिस्टदमन कार्यक्रम घडवून त्यात त्यांना सहाय्य करी.

आल्या आल्या त्याने शेजारच्या खेड्यांवर वर्गणी लागू केली. प्रत्येक खेड्याकडून दोनशे-तीनशे रुपये जबरदस्तीने काढण्यात येत. याशिवाय पोलीस व रझाकारांसाठी या ग्रामवासियांना बकऱ्या, कोंबड्या, अंडी, दूध, तूप, धनधान्य यांचा मलिदा द्यावा लागे तो वेगळाच. बिचारे हिंदू मुकाटपणे हा अन्याय सहन करीत.

आजाद हैदराबादच्या मार्गात हिंदू युनियन (इंडियय युनियनचे रझाकारी नाव) अडसर बनला होता. काही लोक हिंदू युनियनचे एजंट म्हणून काम करीत होते. हैदराबाद शासनाला जगभर बदनाम करण्याचा त्यांनी विडा उचलला होता. बीबीनगर प्रकरणाने त्यांना खाद्य मिळाले आणि त्या एजंटांनी जगभर वादळ निर्माण केले अशी तय्यब रझवी महाशयांची धारणा होती. त्यांना बीबीनगर प्रकरणातील अवघे सत्य (!) जगासमोर आणावयाचे होते. म्हणून बीबीनगर प्रकरणावर एक लघुचित्रपट काढण्याची त्याची योजना होती. कम्युनिस्टांनी लुटालूट, मारझोड, अन्याय, अत्याचार केल्यानंतर पोलीस आणि रझाकारांनी आपल्या प्राणांची पर्वा न करता हिंदूंचे रक्षण करून शांतीस्थापना (!) केली. रझाकार आणि पोलीस यांचे कार्य अत्यंत कौतुकास्पद आणि परीक्षेचे (अग्निदिव्याचे) राहिले हे चित्रित करावयाचे. आजाद हैदराबादचा प्रश्न निझाम युनो मध्ये नेऊ इच्छित होता. आणि तय्यब रझवीची अभिलाषा होती की, त्याचे संकलित समाचारचित्रही पुराव्यादाखल तेथील सदस्यांना दाखविले जावे. परंतु त्याची इच्छा फलद्रुप होऊ शकली नाही कारण थोड्याच दिवसात पोलीस ॲक्शन झाले.

प्रजेच्या इज्जत–अब्रू–वित्त आणि प्राण याची या बदमाशांच्या नजरेत काय किंमत होती या संबंधी खालील उदाहरण पुरेसे बोलके आहे. एके दिवशी कुलपाकचा तहसीलदार, मोतकूरचा दाढीवाला अमीन, सिकंदराबादचा महमंद हाजी आणि गुडूरचा दस्तबंदार बीबीनगर येथील रझवीच्या कँपमध्ये जमा झाले. जणू सैतान एकत्र आले. नव्या नव्या उत्पातांची योजना चालू होती. दुपारचे तीन वाजले होते. त्यांचे बोलणे आटोपले होते. निरोपापूर्वी चहापान होणे अनिवार्य होते. परंतु दूध नव्हते तेव्हा लक्ष्मीकांत रेड्डीला ताबडतोब दूध आणण्यास सांगण्यात आले. खेड्यातून दुपारी बहुधा दूध मिळतच नाही. सकाळी उरलेल्या दुधाचे दही बनविले जाते. बिचारा पटेल रिकाम्या हाती, गाव पालथे घालून, परत आला. त्याचे हात हलवीत परत येणे या चौकडीला असह्य झाले. तय्यबने आज्ञा दिली की, चरावयास नेलेल्या म्हशी त्यांच्यासमोर हजर केल्या जाव्यात. लक्ष्मीकांत रेड्डीने प्रयत्नांती तीस-चाळीस म्हशी कँपसमोर आणून उभ्या केल्या. आज्ञेचे काटेकोर पालन तो करीत होता बिचारा ! त्याची अवस्था अत्यंत दयनीय होती. त्याच्या हातून चूक होणे म्हणजे मृत्यूलाच आमंत्रण हे तो पुरेपूर जाणून होता. त्या राक्षसांना कोठली दया यायला ? 'दूध निचोडो' म्हणून आज्ञा केली. कांतरेड्डीने प्रयत्न केले. परंतु अवेळी म्हशी दूध कसा देणार ? दूध मिळत नाही हे पाहून तय्यब अत्यंत रागावला. त्याने कांतरेड्डीचा उद्धार केला. त्या सैतानाने 'म्हशीचे दूध काढता आले नाही, तर तुमच्या बायकांच्या स्तनांचे दूध आणावे लागेल असे धमकावले. दूध मिळत कसे नाही ? आम्हाला चहा पाहिजे. ताबडतोब जाऊन–' इतक्यात तय्यबचा विश्वासपात्र धनगर आला. तो हिंदू असून रझाकारांना फितूर होता. त्याने काही महत्त्वपूर्ण बातमी आणली होती. म्हणून दुधाचा प्रश्न लांबणी-



UH 743

वर पडला. अन्यथा आपल्या बीभत्स मनोविनोदासाठी त्या गावातील हिंदू माता भगिनीवर कोणता प्रसग येता हे परमेश्वरच जाणे. त्या दिवसात या सैतानाचे अनिर्बंध राज्य होते. आणि म्हणूनच सारा अपमान असे बीभत्स बोलणे कातरेड्डीला नाइलाजाने ऐकून घ्यावे लागत होते. अतर्क्य असहाय्यता होती.

पिलाईपल्ली या गावावर एके दिवशी कम्युनिस्टविरोधी कारवाई झाली. ट्रक भरून सशस्त्र पोलीस सोबत होते. कांतरेड्डीलाही सोबत घेण्यात आले. रस्त्यात दिसेल त्या हिंदूला पकडण्यात येई. त्याला बेदम झोडपण्यात येई. आणि तो आसन्नमरण झाला की त्याला टाकून ते पुढे जात. ज्या पापरेड्डीसाठी ही सारी तयारी होती तो रस्त्यातच भेटला. परतु कातरेड्डीने त्याची ओळख दिली नाही. पिलाईपल्ली गावात घुसून यांनी पापरेड्डीच्या घराला आग लावली. आणि हा सारा ताफा गावाबाहेर पडला. गावाबाहेर असलेल्या नदीकाठी बाट पहात असलेल्या कम्युनिस्टानी गोळीबार सुरू केला. एक तास दोन्ही बाजूंनी मारा चालू होता. पोलिसांनी जवळपास पाचशे फैरी झाडल्या. परतु शेवटी त्याना पळून जावे लागले. त्यांनी इन्कीरियाल या गावी आश्रय घेतला. असे होते निझामाचे पराक्रमी (!) पोलीस.

कम्युनिस्टाच्या शोधासाठी 'कोन्डामडगु' या गावी एके दिवशी पोलीस आणि रझाकारपथक नेण्यात आले. गावातील सर्व हिंदू जनता एकत्र करण्यात आली. त्या सर्वांना जमिनीवर पालथे झोपण्यास सांगण्यात आले. त्याना अमानुषपणे मारण्यात आले. रझवी आणि त्याच्या सहकाऱ्यांना प्रत्येक हिंदू कम्युनिस्ट दिसावयाचा. एखादा गरीब रस्त्यात भेटला की त्याला कम्युनिस्ट लेखून झोडपण्यात येई. आणि जेव्हा खरोखरच कम्युनिस्टांशी प्रसग पडे तेव्हा हे बहाद्दर चौखूर उधळत. 'तलवार चली और हम नदारद' अशी बाब होती.

कासीम रझवीला आज कम्युनिस्टांच्या ठावठिकाणासबधी निश्चित अशी माहिती कोणा फितुराकडून मिळाली. तो स्वत.वर बेहद्द खूश होता. एखाद्या जातीवत शिकाऱ्याला सिंहाचा ठावठिवठिकाणा लागल्यावर आनंद व्हावा तसा आनद रझवीला झाला. त्याने योजना आखली. दिवस आणि वेळ ठरविला. सशस्त्र पोलीस आणि रझाकारानी भरलेला एक ट्रक सोबत घेण्यात आला. अधिकाऱ्यांची जीप वेगळी होतो. पूर्ण तयारीनिशी आणि आवश्यक दक्षतेसह हे द्विदल (पोलीस व रझाकार) बीबीनगरच्या बाहेर पडले. एकूण तयारीवरून आजची मोहीम भारी आहे असे वाटत होते. पोलीसदलात बहुधा मुसलमान महाजरीन (शरणार्थी) होते. या शरणार्थ्यांना शेजारच्या प्रांतातून विशेष प्रलोभन दाखवून हैदराबाद राज्यात स्थाईक करण्याच्या हेतूने आणण्यात आले होते. हिंदूचे बहुसख्यत्व कमी करता न आले तर निदान दोघाची सख्या समान व्हावी हा हेतू होता. या शरणार्थ्यांचा जोष काय विचारावा? इस्लामची सेवा करण्यासाठी आणि (हिंदूचा काफीराचा नायनाट करण्यासाठी) ते आपले घरदार सोडून आलेले होते. स्थानीय रझाकारांच्या उत्साहाला भलतेच उधाण आलेले होते. सोबत कान्तरेड्डीलाही न्यायचे आणि मध्येच त्याचा निकाल लावायचा असे ठरले होते. कारण रझवीला आताशा कान्ततेड्डीच्या इमानदारीबद्दल शंका वाटत होती. कान्तरेड्डीला कारस्थानाची कुणकुण लागली आणि तो भूमीगत झाला. सशस्त्र पोलीस आणि रझाकारासह रझवी ब्राह्मणपल्ली मार्गावर असता 'मराठी बाईकी बाऊली' पाशी कम्युनिस्टानी अचानक हल्ला केला. ते तिथे होते. परतु एकही हाती लागला नाही, शेवटी हे द्विदल ब्राह्मणगल्लीत घुसले. तेथील रामचद्ररेड्डी पाटील बऱ्याच दिवसापासून फरार होता. अन्न आणि प्राणरक्षणार्थ घरदार जमीन जायदाद सोडून तो अन्यत्र गेला होता. अर्थात् त्याचे पळणे म्हणजे निझामी राजवटीला अपमानकारक होते. त्याचे घर पेटविण्याचे निश्चित झाले. सर्व साहित्य सोबत होतेच. धनधान्ययुक्त घराला आग लावण्यात आली. परतताना त्याना त्यांच्या सुदैवाने नऊ कम्युनिस्ट (!) इकडे तिकडे दिसले. त्याना गोळ्या मारण्यात आल्या. एका दिवसात नऊ कम्युनिस्ट मारणे ही असामान्य सफलता होती. बीबीनगरला पोहोचताच हेडक्वार्टरला पराक्रमाची सूचना देण्यात आली. बीबीनगर कॅम्पमध्ये खास दावत झाली. आनदी आनद झाला. 'शाह उस्मान जिंदावाद' आजाद हैदराबाद 'पाइदावाद'च्या घोषणानी वातावरण दुमदुमले.

दुसऱ्या दिवशी सकाळी सबइन्स्पेक्टर महम्मदखाँ आणि विभागीय पोलीसप्रमुख (D. I. G.) श्री. मजिदुल्लासाहेब चौकशीसाठी येऊन पोहोचले. त्यानी कम्युनिस्टांची प्रेते पाहाण्याचा आग्रह धरला. गावकऱ्यानी प्रेतांना मूठमाती दिली होती. मजिदुल्लांनी सर्व प्रेते बाहेर काढविली. ती प्रेते म्हणजे निष्पाप, सेवाचाकरी करणाऱ्या गरिबांची होती. D. I. G. साहेब हे चतुर आणि समजदार अधिकारी होते, स्तिमित झाले. एकूण प्रकरण त्यांच्या ध्यानात आले. निष्पाप, गरीब आणि असहाय्य जनतेला पोलीसदलाने मारल्यामुळे मजिदुल्ला नाराज झाले आणि त्यानी ताबडतोब पूर्ण पोलीसदलाची बदली केली. आणि नव्या पोलीस अधिकाऱ्यासमवेत दुसरे पथक व्यवस्थेसाठी त्यानी पाठविले. त्याच्या हातात होते तेवढे त्यानी केले. परतु तय्यब रझवीला न ते बदलू शकत होते; न अडवू शकत होते. न त्याचे काही बिघडवू शकत होते. म्हणूनच इतके रामायण होऊनही तय्यब रझवी बीबीनगरातच ठिय्या देऊन होता. तय्यब कासीम रझवीचा भाऊ होता. म्हणजेच बडी आसामी होता. मजिदुल्लाला तय्यब विरुद्ध कारवाई करणे म्हणजे सकटाला आमत्रण याची पुरेपूर कल्पना होती.

कम्युनिस्ट विरोधी कारवाई म्हणून जे सत्र चालावयाचे ते इमरोज मल्लय्या नावाच्या एका खास फितुराच्या सागण्यावरूनच चालावयाचे. इमरोज मल्लय्यामुळे गावकरी अगदी त्रस्त झाले होते. कम्युनिस्ट आणि रझाकार या (जात्याच्या) दोन पेडांत बिचारे हाकनाक भरडले जात होते. इमरोज मल्लय्या या सर्व कारवायांच्या आणि उत्पातांच्या मुळाशी आहे हे कळताच गावकऱ्यानी त्याचा काटा काढावयाचा असे ठरविले. हा धनगर जोवर जिवत आहे तोवर आपले भवितव्य निश्चित नाही याची कल्पना त्याना होतीच. त्यांनी इमरोज मल्लय्यावर पाळत ठेवली. एके दिवशी तो गावाबाहेर गावकऱ्यांच्या हाती सापडला. गावकऱ्यांनी त्याला कायमची विश्रांती दिली. आता तो बातम्या पुरवू शकत नव्हता, ठाव-

ठिकाणा सांगू शकत नव्हता किंवा कारस्थानात भाग घेऊ शकत नव्हता. गावकऱ्यांनी सुटकेचा श्वास घेतला. परंतु आपला नवरा अशा रीतीने मारला गेला हे पाहून त्याची पत्नी रडत-ओरडत बीबीनगर कॅंपवर पोचली. तेथील अधिकाऱ्यांना आश्चर्य वाटले. मल्लय्या फितूर असल्याचे कळणे केवळ जवळच्या हिंदूलाच शक्य होते. हे काम बहुधा पोलीस पाटील लक्ष्मीकांत रेड्डीचेच असावे. कारण अन्य अशिक्षित वा मोलमजुरी करणाऱ्यांची अशी मजाल होणे शक्य नाही. लक्ष्मीकांत रेड्डीच्या प्रामाणिकपणाबद्दल आधीपासूनच शंका होती, ती आता बळकट झाली. ही खोडी कांत रेड्डीचीच असा निर्णय घेण्यात आला. ताबडतोब कांत रेड्डीला पकडण्यात आले. चौबाऱ्याच्या शेजारी असणाऱ्या एका व्यापाऱ्या घरात एका खास अधिकाऱ्याकरवी तपासणी चौकशी (त्याची) सुरू झाली. लागोपाठ तीन दिवस त्यांना असह्य यातना देण्यात आल्या. सारे शरीर माराने सुजले. तळव्यांची अवस्था तर भयानक झाली होती. यापेक्षा जास्त मारपीट होणे शक्य नाही हे अधिकाऱ्यांनी पाहिले. कांत रेड्डी उठू बसू शकत नव्हता. चवथ्या दिवशी भल्या पहाटे ठाण्यासमोर त्याचे गाठोडे आणून टाकण्यात आले. योगायोगाने त्याच दिवशी मजीदुल्लासाहेबाचा दौरा निघाला. कांत रेड्डी पोलिसांच्या कैदेत नव्हते. त्याला जमानतीवर मुक्त करण्यात आले. असहाय्य अवस्थेत तो चबुतऱ्यावर पडून होता. बिचाऱ्याला घरापर्यंत जाणेही शक्य नव्हते. माली पाटील जग्गारेड्डीलाही अमानुष मारहाण करण्यात आली होती. मजीदुल्लांनी कांतरेड्डीची अवस्था पाहिली, चौकशी केली आणि पुन्हा एकवार सपूर्ण पोलीस पथकाची बदली तेथून केली. यावेळी त्यांनी एका शीख हिंदू इन्स्पेक्टरची रवानगी केली. बिचाऱ्या कांत रेड्डीने मुसलमान अमानुषतेचा असा धसका घेतला होता की तो सतत त्या शीख इन्स्पेक्टरच्या छायेत राहावयाचा. त्याला तय्यब रजवीचे भय वाटावयाचे. पोलीस ॲक्शन नंतर किशनसिंग हैद्राबादला जाण्यास निघाला तेव्हा कांतरेड्डीसुद्धा त्याच्या सोबत गेला. हैदराबादला पोचताच निझामाच्या शरणागतीचे वृत्त त्याला कळले. त्याने सुटकेचा श्वास घेतला. चेहरा समाधानाने उजळला· जीवनाच्या अशाश्वतेचे रूपांतर शाश्वतेत नाही तरी निश्चिततेत झाले. त्याच्या जिवात जीव आला. मियां तय्यब रजवी सप्टेंबर तेराला पोलीस ॲक्शन सुरू होताच बीबीनगरहून पळाला. गावकऱ्यांना पोलीस ॲक्शनची कल्पना नव्हती. अन्यथा त्यांनी तय्यब रजवीची कबर बीबीनगरात अवश्य बांधली असती.

पोलीस ॲक्शन नंतर बीबीनगर कांडाची पूर्ण चौकशी करण्यात आली. विशेष न्यायालयात कासीम रजवीवर कत्तल आणि डाक्याच्या आरोपाखाली खटला भरण्यात आला. फील्ड मार्शल कासीम रजवी आरोपीस डाकू आणि खुनी म्हणून न्यायासनासमोर उभा केला गेला. त्याच्यावर 'डाक्याचा' आरोप सप्रमाण सिद्ध झाला आणि न्यायालयाने त्याला सात वर्षांची सश्रमकारावासाची शिक्षा दिली.

या खटल्यात साक्षी पुरावे सादर करण्यात तत्कालिन गुप्तचर विभागाचे अधिकारी श्री. नरसिंगप्रसाद यांनी अतीव परिश्रम घेतले. त्यांच्या प्रयत्नाचा आणि कार्यक्षमतेचा विसर इतिहासाला पडता उपयोगी नाही. त्यांच्यामुळेच हा फील्ड मार्शल (!) कायद्याच्या कचाटयात आला. अन्यथा हा राक्षस एवढे सर्व करूनही पुन्हा मोकळाच रहाता. बीबीनगर ग्रामवासियांनी परिश्रमपूर्वक साक्षी नोदविल्या, हाल अपेष्टा सहन केल्या परंतु अल्पांशाने का होईना कासीम रझवीला धडा शिकविला.

गहू पेरुनी गुलाब नाही
फुलावयाचा जगती
कृती ज्यापरी फळे त्यापरी
हीच जगाची रीती

□ □

## महानगर कलकत्ता : पृष्ठ ९ वरून

विचार करणारी रंगभूमी ही एकाच आशय–विषयाच्या आवर्तात फिरत रहाणार. नाटचविषयातील कल्पकता, काव्यात्मता, तरलता हरवून बसणार. नाटचविषयाचा प्रवास जर असाच एकारलेला राहिला तर जीवनातील विविध विषय नाटचांकित व्यक्त होण्याच्या शक्यता नाकारल्या जातात. या उलट आपल्याकडचे नाटककार (तेंडुलकर, खानोलकर, एलकुंचवार इ) जीवनातल्या विविध विषयांचा, विविध अंगांनी शोध घेत घेत थेट आशयाशी भिडण्याच्या प्रयत्नात आहेत. आजच्या जीवनाच भान त्यांना जरूर आहे, पण फक्त एवढच नाही. असा प्रयत्न तिकड बादल सरकार, नितीन सेन करताहेत...तिकडच्या नाटकात अभिनयदृष्टया खास अस काही वाटल नाही. म्हणजे तिकड उत्तम नटनटी जरूर आहेत. पण त्यांच्या अभिनयाचा दर्जा आपल्याकडच्या नटांपेक्षा लक्षणीय वाटला नाही. अभिनयात वास्तवता, सुजाणता मात्र निश्चितच होती.

राजकीय, प्रचारकी थाटाच नाटक हे आपल्या इकड एकदम मान्य होणारं नसल तरी तिकडच्या काही गोष्टींचा विचार तर आपण जरूर करायला हवा. प्रयोग–तंत्र–विज्ञानातील सफाई ही एक गोष्ट...आणि दुसरी म्हणजे रंगभूमी या माध्यमाचा त्या लोकांनी केलेला व्यापक–विस्तृत उपयोग. निदर्शन, मोर्चे, निवडणूक प्रचार इत्यादी गोष्टींसाठी नाटचमाध्यमाचा वापर कसा आणि किती होऊ शकतो याचा आपण सखोलपणान कधी विचारच केलेला नाही. या माध्यमाच्या शक्तीच्या सर्वंकष उपयोगाची शक्यता आपण अद्यापही अजमावून पाहिली नाही असंही वाटल ! एवढ मात्र खर की, प्रदेशविशिष्ट अनेक गोष्टी घेऊन बंग रंगभूमी सिद्ध आहे. एकदा जरूर पहाण्यासारखी आहे. ती पहाताना आपण ओशाळायच काहीच कारण नाही. आपण आपल्या ताकदीनुसार करीत असलेला रंगभूमीचा प्रवास तितकाच मोलाचा आहे, लक्षणीय आहे. त्यातल्या त्रुटी, उणीवा जाणवूनही निराशेचा नाही...

□ □

# ‘ उध्वस्त धर्मशाळेच्या ’ निमित्तानं

विश्वास मेहेंदळे

‘ साहेब, डॉ. लागूचा फोन आहे. ’ शिपायाच्या या निरोपानं मी जरा चक्रावलो. कारण डॉक्टराचा फोन या पूर्वी कधीच आला नव्हता. ‘ गार्बो ’च्या वेळी ‘ बेस्ट लक् ’ करता केलेल्या फोनलाही डॉक्टरांनी फोननही उत्तर दिल नव्हत. ‘ फार कामात असतात, नसेल झाला वेळ अशी मी समजूत करून घेतली होती. अर्थात ते खूप कामात असतात यात शकाच नाही. ‘ कशा करता केला असेल फोन ? ’ असा विचार करीत मी फोन उचलला.

‘ हॅलो ! मी विश्वास मेहेदळे बोलतोय् ’ मी.

‘ अरे विश्वास ! अशा करता फोन केला होता, की आमच्या या ‘ उध्वस्त धर्मशाळेचे लेखक आहेत ना, गोविंद देशपाडे, त्यांची मुलाखत व्हावी टी. व्ही. वर असं वाटल म्हणून केला होता फोन. म्हटल आपलं कोण आहे टी. व्ही. वर तर लगेच तुझं नाव आलं डोळयापुढं. आणखी हे बघ विश्वास ते उद्याच्याच दिवस आहेत मुबईत, डॉक्टरांनी फोन ठेवला.

मी परत चक्रावलो. एका दिवसात शूटिंग अॅरेंज करणं फार कठीण असत, अर्थात हे डॉक्टरानाही ठाऊक होतं. परतु त्यांना फार मनापासून हा नवा लेखक व त्याची मत टी. व्ही. वर यावीत असं वाटताना दिसत होत. कलेच्या क्षेत्रात डॉक्टर हे आमचे गुरु, निदान आम्ही तसं मानतो. त्यामुळ पटापट परवानग्या वगैरे गोळया केल्या. शूटिंगची तयारी केली व डॉक्टराना ओ. के. कळवल. दरम्यान त्याच रात्री ‘ धर्मशाळा ’ बघून टाकलं. कसं शूटिंग करायच त्याच त्याची आखणीही केली.

आणि याच दोन दिवसांच्या काळात पुन्हा एकदा डॉक्टर व त्याची नवी प्रायोगिक नाटयसस्था ‘ रूपवेध ’ यांचं जवळून दर्शन घडलं. १॥–२ वर्षापूर्वी डॉक्टर पार्ल्याला रहात असताना त्यांच्या या नव्या सस्थेबद्दल ते बोलले होते व त्याचवेळी ‘ गार्बो ’चा सकल्पही त्यांनी केला होता. ‘ गार्बो ’ ते ‘ उध्वस्त धर्मशाळा ’ या त्यांच्या व सस्थेच्या छोटयाशाच प्रवासात काही गोष्टी आवडल्या, काही खटकल्या, काही मनपसत झाल्या, त्या साऱ्याचा आलेख काढण्याचा हा एक प्रयत्न. अर्थात चांगल्यासाठीच.

## ‘ रूपवेध ’चे नवे रूप

‘ गार्बो ’च्या प्रचड अपयशानंतर बहुधा ‘ रूपवेध ’ बद होणार असे वाटले होते. परतु सुदैवानं तस घडलं नाही. खुद्द डॉक्टरांनीच एका मुलाखतीत गार्बोबद्दल ‘ आय हेव फेल्ड ’ अशी स्पष्ट कबूली दिली आहे. त्यामुळं त्याबद्दल उगाचच वेळ वाया घालवून चर्चा करण्याच कारण नाही. मात्र एक गोष्ट जाणवली ती ही, की त्यावेळी ‘ रूपवेध ’ या सस्थेच जे स्वरूप दिसत होतं त्यापेक्षा आजचं तिच रूप वेगळं व त्याचबरोबर चागल वाटत आहे. त्यावेळी ती सस्था कुणा एकाच्या मालकीची वाटली. परंतु आता ती अनेक इतर प्रायोगिक संस्थासारखी परंतु प्रगल्भ, बुजुर्ग नेतृत्व लाभलेली विचारवंताची नाटय सस्था वाटते.

‘ गार्बो ’ पडलं. परतु महेश एलकुचवार यांच्यासारखा विवाद्य नाटककार मराठी रगभूमीला माहीत तरी झाला. चांगल्यारितीनं माहीत झाला. तोच प्रकार ‘ उध्वस्त धर्मशाळे ’च्या बाबतीत म्हणता येईल. हे नाटक तसं बरेच दिवसापूर्वी लिहिलेल आहे. गोविंद देशपाडयांना ‘ रूपवेध ’चा आधार मिळाला. एका बुद्धिमान नाटककारला, त्याचा विचार, नीटरितीन मांडू शकणारा रंगमंच दिला तो ‘ रूपवेध ’ या सस्थेनेच. दिल्लीच्या ‘ इन्स्टिटयूट ऑफ इटर नॅशनल स्टडिज् ’ या विद्वान विद्यार्थ्यांकरता असलेल्या सस्थेत शिकवणारे प्रा. गोविंद देशपांडे हे खरोखरीच सामर्थ्यवान लेखक आहेत हे सिद्ध होईल अस त्याच नवं नाटक ‘रूपवेध’नं सादर केल यात शंका नाही.

## भावे पति-पत्नी

‘ रूपवेध’च्या नव्या स्वरुपात काही गोष्टींना नक्कीच महत्त्व आहे. एक तर डॉ. लागूंच्यासारखा कलावंत, दिग्दर्शक, नाटककार (व टीकाकारही) या सस्थेच्या अध्यक्षपदी आहे. उपाध्यक्ष म्हणून प्रा. पुष्पा भावे काम बघणार आहेत. या बाईंचा पाश्चात्त्य रगभूमीचा व्यासग व अभ्यास बराच दाडगा आहे. प्रायोगिक रगभूमी, त्यातही मराठी प्रायोगिक रगभूमीचा अभ्यास म्हणजे या बाईंचा प्राण आहे. उगाचच फाफटपसारा न माडता मुद्देसूद टीका लिहिण्यात त्यांचा हातखडा आहे. पुन्हा सर्वांत महत्त्वाचे म्हणजे त्यांना ‘ कळते ’ हे इतर बऱ्याच जणाना मान्य आहे. त्यामुळे प्रायोगिक रंगभूमीवर येणारी कलाकृती निवडताना डॉक्टरांना बाईंचा बराच उपयोग होईल. त्याचबरोबर व्यवसाय प्राध्यापकाचा असल्यानं, सस्थेकडे येणारे ‘ स्क्रिप्ट ’ वाचून बाई पटापट् निर्णय देऊ शकतील. प्रायोगिक रगभूमी म्हणजे काय, याची अत्यत स्पष्ट कल्पना असल्यामुळ नाटक निवडताना त्यांचा गोंधळ होणार नाही व ‘ रूपवेध ’ खऱ्या अर्थानं प्रायोगिक नाटक निवडील अशी आशा करायला हरकत नाही.

प्रा. अनत भावे हे या नव्या सस्थेचे चिटणीस आहेत. हेही चागले टीकाकार आहेत. अभ्यासू वृत्ती आहे. बनचुके नाहीत. स्वतःच्या ‘ लिमिटेशन्स ’ त्याना माहीत आहेत. प्रसगी अगमेहनीला तयार होणारे वाटतात. व मुख्य म्हणजे लोकांना हवे हवेसे वाटतात. त्या मुळं सस्थेला एक चांगला व थड डोक्याचा संघटक लाभला आहे.

## खुद्द डॉक्टर

व्यावसायिक रगमचावर यशस्वी होऊन नव्हे, चागल्या पैकी यश सपादन करून प्रायोगिक रगमचाची सेवा करण्याचा डॉक्टरांचा उपक्रम अत्यत स्तुत्य आहे. आज तरी श्रेष्ठ कलावतांपैकी अशी सुयोग्य सागड घालताना कुणी अन्य दिसत नाही. हे करताना हौशी रंगमंचाच्या मर्यादा अनेकदा चागल्या व्यावसायिकाच्या आड आल्याखेरीज रहात नाहीत. डॉक्टराच्या सारख्या ‘ बिझी कलावताची एक ‘ शिफ्ट ’ त्याला बरेच पैसे मिळवून देते. परतु मुळातच प्रायोगिक रगभूमीवर प्रेम करणारा हा कलावत ते सार दुय्यम मानून काही ना काही तरी ‘प्रयोग’ करीत आहे. ‘आविष्कार’ निर्मित ‘ प्रतीमा ’ करतानाही डॉक्टराचे

काही अनुभव गमतीदार होते. म्हणे ते वेळेवर येत व अन्य 'हौशी 'नाच उशीर होत असे. वगैरे. परंतु वंग रगभूमीवरच्या उत्पल दत्ता सारख्या कलावताबरोबर तुलना करावी असा हा कलावत पर्यायान पदरमोड करूनच काही नवे प्रयोग रंगभूमीला देत आहे. त्यातून रंगभूमी विकसितच होणार आहे.

'गार्बो' ही 'धर्मशाळे' प्रमाणंच 'लो बजेट' प्रॉडक्शन काढल असतं तर कदाचित त्याचे आणखी काही प्रयोग झालेही असते. परंतु मग आजच्यासारखी 'रूपवेध' मात्र झाली नसती. तिचं स्वरूप काही वेगळंच दिसलं असतं.

## दर्जेदार ऑडियन्स

छबिलदास दादर या शाळेत प्रायोगिक रगभूमीकरता रगमच उपलब्ध करून देण्यात वाटेकरी कोण, तर आज अनेक नाव पुढं येतात. परतु अधिकृतरित्या 'आविष्कार' ही सस्था व तिच्या सचालकांचाच यात मोठा वाटा असल्याचं सागितल जात. हा विवाद्य मुद्दा बाजूला ठेवू. परतु या रगमंचाकडे आज जो बुद्धिमान 'ऑडियन्स' खेचला जातो आहे, तसा प्रेक्षक कर्मशियल थिएटर मध्ये पदर मोड करून तर सोडाच परतु अक्षत पाठवूनही मिळणार नाही. केवळ मराठीच नव्हे तर हिंदी चित्र सृष्टीतले अनेक 'दादा' इथ आठवणीनं हजेरी लावतात. दृष्ट लागावी इतकी बुद्धिमान माणसं या ठिकाणी भेटतात. सान्याच क्षेत्रातली. उकडण्याची तक्रार करीत नाहीत. 'बसायला साधी खुर्ची नाही, कसले साले हो ५ रुपये घेतात, असा दम देत नाहीत. अत्यत चोकसपणानं नाटक बघतात. विचार करीत, विनातक्रार आपापल्या घरी जातात.

डॉ. श्रीराम लागू, सतीश दुभाषी, माघव वाटवे, सत्यदेव दुबे रत्नाकर मतकरी, अरविंद देशपांडे, दामू केंकरे अशी किती तरी माणस प्रायोगिक रगमचाचा वारसा सागतात. ती सगळी जर इथं आली तर कर्मशियल थिएटरे ओस पडतील अशी भीती वाटते. मी अनेक प्रेक्षकांच्या वतीनं त्याना तस आवाहन करतो.

थोडयाशा अतिशयोक्तिन परंतु मनापासून वाटतं म्हणून लिहितो विजयाबाई मेहतांसारखी मराठी प्रायोगिक रंगभूमीची गंगोत्री या प्रायोगिक रगभूमीवर केव्हा येणार, याची प्रेक्षक तरी वाट बघताहेत. मतभेद असतीलही. परतु खूप दिवस झाले आता. कला प्रांतात कसले आले आहेत मतभेद!

मडळी कल्पना करा, डॉक्टर, विजयाबाई, अरविंद, दामू, सतीश, इ. या त्या मानान 'ओल्ड' जनरेशनचं आणि अच्युत, अमोल, दिलीप, रमेश पवार, सतीश आळेकर, जब्बार, या त्या मानान नवीन पिढीच अस एक कोडाळ या रिंगणात उतरल आणि तेंडुलकर, देशिंगकर, देशपाडे, खानोलकर अच्युत वझे, सतीश आळेकर या मंडळीनी पुन्हा आपल्या लेखन्या सावरल्या तर धमाल येईल की नाही! आपण नुसतं बघण्याचच काम करणार. परतु क्रिकेटची मॅच नुसती पाहणाऱ्यावर नव्हे, तर खेळाडूच्या मुळेच रगते ना! या दृष्टिनं प्रयत्न व्हावेत.

थोडस विषयातर झालं. तर मी मघाशी हेच सागत होतो, की आता 'रूपवेध' या संस्थेचं स्वरूप बहुरूपी, आविष्कार, अमोल थिएटर, अभिव्यक्ति, इत्यादी प्रायोगिक संस्थांसारखंच झाल आहे. हे फार चांगलं झालं. म्हणजे आता त्यात व्यवसायाला अजिबात स्थान नाही व ती शका ही कुणी घेणार नाही. किंबहुना घेऊ नये.

## अरूण काकडे मात्र हवेत

शूटिंग होतं 'छबिलदास 'च्या हॉलमध्येच त्यावेळी जो अनुभव आला त्यातला एकच सागतो. बाकी बरेच आहेत. प्रत्यक्ष 'टेक' करताना पखे बद करावे लागत. सस्थेशी संबधित व शूटिंगमध्ये प्रत्यक्ष भाग न घेणारे अनेक लोक तिथे असत. 'अरे जरा पंखे बद करा रे' अस सांगितल, तर बऱ्याचदा अरूण काकडेच पखे बद करायला धावताना व 'शॉट 'मध्ये वा 'फ्रेम 'मध्ये येणारी 'झालर' ऊंच करण्यासाठी धावताना दिसे. बाकीच्या मडळींच्या चेहऱ्यावर भाव असे, तो असा, की आपला या कामाशी काय सबध! वस्तुतः अरूण काकड यांचा 'रूपवेध' या संस्थेशी प्रत्यक्ष सबंध नसल्याच कळतं. परंतु अशा माणसांच्या रक्तातच काम असत. त्या मानानं स्वत.च्या लिमिटेशन्स ओळखूनही धावपळ करताना दिसत होत्या त्या दीपा श्रीराम. डॉक्टरांच्या पत्नी.

स्वतःची कवच कुंडलं बाजूला ठेवूनच मडळीनी खर तर अशा सस्थातून यायच असत. परतु तस घडताना दिसत नव्हत. डॉक्टरानी अगमेहनत करावी अशी अपेक्षाच नव्हती. ते रास्तही नव्हते. इतक्या शॉर्ट नोटिसन काम करीत असताना. बाकी 'मिनी' डॉक्टराचं काय? त्याना तर डॉक्टर व्हायला अजून वेळ आहे ना?

मला वाटल ते एवढंच, की डॉक्टराच्या सारख्या कुशल सघटकानं आणि त्याच्या रूपवेधीय सहकाऱ्यानी उत्तम, दर्जेदार कलावंताच्या बरोबरच हरकामे, सांगकामे, निष्ठावंत बॅक स्टेज वर्कर गोळा केले पाहिजेत. त्याच महत्त्व ओळखल पाहिजे. सस्था उभ्या राहातात त्या अरूण काकडे आणि श्रीधर राजगुरुंच्याच जिवावर-बळावर. व्यवसाय चालतो तो मात्र चालू नाण्यावर. 'रूपवेध 'सारख्या प्रायोगिक सस्थेला अरूण व अण्णा (राज रू) अशा माणसाना हेरावच लागेल. कारण ती व्यावसायिक नव्हे प्रायोगिक सस्था आहे. अर्थात मी हे डॉक्टराना सांगण्याची गरज नाही. ते हे जाणतात. पण त्या दिवशी जाणवल त्यामुळ हे सागितलं एवढेच.

□ □


# श्रीग्रामायन

| | | |
|---|---|---|
| मूल्य | लेखक | राजहंस प्रकाशन |
| पंधरा रुपये | श्री. ग. माजगावकर | पुणे ४११ ०३० |

# साप्ताहिक भविष्य

**कृष्ण माईणकर**

**२८-१२-७४ ते ३-१-७५**

### अनिश्चिततेच्या छायेखाली केंद्र मंत्रिमंडळ

*माझ्या 'माणूस 'मधील गेल्या आठवड्यातील* राजकीय भविष्यात व त्यापूर्वीच्या तीन चार भविष्यात मी केंद्रातील स्थित्यंतराचे बदलाचे काही आडाखे बांधले होते *त्याचा प्रत्यय वाचकांना आलाच आहे.* श्री. ललित नारायण मिश्राची एकेक नवी भानगड इंदिराजीच्या मर्जीतून त्यांना दूर न्यायला कारणीभूत होईल. केंद्रीय मंत्रिमंडळांत त्याच्यावरूनच मतभेद निर्माण होऊ लागतील. पतप्रधान काही निर्णय घेण्याची शक्यता आहे. मंत्रिमंडळातील सदस्यात अनिश्चिततेचे वातावरण निर्माण होईल. आयात परवाने प्रकारात असतोषाला बराच वाव मिळेल. यानिमित्ताने काँग्रेस पक्षातील मतभेद चव्हाटयावर येतील. येतील. जयप्रकाश नारायण यांच्या चळवळीला व्यापक क्षेत्र व यश लाभेल. महाराष्ट्रात विद्वानाचा सरकारविरुद्ध टीका उठाव. आर्थिक क्षेत्रात खळबळ माजेल.

---

### मेष : नव्या पर्वाची चाहूल

लवकरच रविसारखा *अतरिक्षातील अत्यंत* तेजस्वी ग्रह दशमस्थानी यायला निघणार आहे. तरीसुद्धा सध्या देखील त्याची तुमच्यावर मोठीच कृपा आहे. कारण तो भाग्यस्थानी आहे. दशमस्थान मडित करण्यापूर्वी तो तुमच्या भाग्यवृद्धीची पार्श्वभूमी तयार करीत आहे. विशेष करून नोकरी व्यवसायात त्याच्या कर्तृत्वाचा प्रत्यय येणार आहे. या दोन्ही क्षेत्रात नव्या पर्वाची सुरुवात होणार आहे. लाभदायक घटनांची नांदी याचवेळी घडणार आहे. चालू नोकरीत तुमची कोणतीच मागणी मान्य होत नव्हती. पण यावेळी याबाबतीत सहानुभूतीने विचार होऊ लागेल. मंगळवार हा तुमचा शुक्रवार आहे. त्यादिवशी मनातील एखादी कल्पना अथवा योजना साकार होईल. बुधवार ते शुक्रवार तव्येतीला जपा. जुना एखादा आजार हळूच डोके वर काढणार नाही याची काळजी घ्या. या आठवड्यात ५, ६, ९ या तुमच्या शुभ राशी आहेत. महिलाच्या नोकरीच्या बाबतीत अनेक इच्छा पूर्ण होतील.

### वृषभ : स्थलांतराची शक्यता

नोकरीत सध्याच्या जागी तुम्ही कटाळला आहात, प्रयत्न करूनही तुमची बदली होत नाही पण मित्र हो, मला आनदाने सागावेसे वाटते की, या आठवड्यात अशी एखादी अकल्पित घटना घडेल की तुमचे स्थलातर तुम्हाला अनुकूल अशा पद्धतीने विनासायास घडून येईल. सार्वजनिक कार्यात तुमच्यावर येणारे दडपण दूर होईल. शनिवार ते सोमवार व गुरुवार शुक्रवार व्यापार व्यवसायांत महत्त्वाची उलाढाल होईल. वायदे ठरतील. कलावतांना व लेखकांना प्रसिद्धी मिळेल. लेखकाचे पुस्तक अथवा लेखन गाजेल. तुमच्या शुभराशी ५, ११, १२ या आहेत. या लाभदायक आहेत. आर्थिक परिस्थिती फारशी अनुकूल नसली तरी वाईटहि नाही. प्रवासाचा बेत टाळा, ससारात मिळचे जुळते घ्या. बेकार पदवीधरांना आशादायक असा हा काळ आहे. महिलाना मनाचे समाधान होण्यासारखे नोकरीत काम मिळेल.

### मिथुन : मतभेद टाळा

हा आठवडा आपणास अनेक बाबतीत महत्त्वाचा ठरणार आहे. नव्या नव्या सधी येतील. काही लाभतील काही हुकतील. मतभेद व वाद टाळून जुळवून घेण्याचा प्रयत्न केला तर आठवडा तसा काही नुकसानीचा जाणार नाही. तुम्ही बुद्धीवान लोक आहात. बुद्धि कौशल्याचा उपयोग करा. त्याचा तुम्हाला फायदा होईल. तुमचा शुक्रवार आहे व यावेळी ४, ७, ११ या तुमच्या शुभराशी आहेत. ही ग्रह परिस्थिती लक्षात घेऊन वागावे. अशक्त तब्येत असणाऱ्या व्यक्तींनी सर्व बाबतीत काळजी घ्यावी. जास्त विचार करू नये व भावनेच्या आहारी जाऊ नये. एरवी नोकरीत नुकसान नाही. पण आजूबाजूच्या सहकाऱ्यावर बारीक लक्ष ठेवणे आवश्यक आहे. वरिष्ठाच्या बोलण्याला साथ द्या. ज्या क्षेत्रात मदी येत आहे असे बोलले जाते त्या क्षेत्रातील नोकरांनी भीती बाळगण्याचे कारण नाही. नोकरीवर परिणाम होणार नाही. महिलानी नसती भीति बाळगू नये. नुकसान नाही.

### कर्क : मनाला उत्साह

जोपर्यंत शनी, राहू, मगळ तुम्हाला अनुकूल साथ देत नाहीत तोपर्यंत कोणतेही नवयोजनेचे, नवकल्पनेचे धाडस करून उपयोग नाही. विनाकारण पश्चातापाची पाळी कशाला आणायची ! पण आठवा गुरू आर्थिक उन्नती करायला उत्सुक आहे. स्थावराच्या व्यवहारात फायदा होईल. स्थावराचा-प्रामुख्याने शेतजमिनीचा फायदा होईल. अनपेक्षित मार्गाने चार पैसे मिळतील. अनेक दिवस मन नाराज आहे. नोकरीत मन रमत नाही. याबद्दल तुम्ही उदास आहात. पण या आठवड्यापासून तुमची ही मनाची अवस्था बदलणार आहे. उत्साह वाटू लागणार आहे. अर्धवट सोडलेले काम पुन्हा पुरे करण्याच्या जिद्दीने कामाला लागाल. सोमवार, मगळवार हे तुमचे शुभ वार आहेत. नवी नोकरी मिळवायची असेल किंवा नोकरीत बदल करायचा असेल तर या दिवशी प्रयत्न करा. ४-७-१० या तुमच्या शुभराशी आहेत. महिलांनी उगाच निराश होऊ नये. श्रद्धेने काम करावे.

### सिंह : गृहप्राप्तीचा योग

आता लवकरच मगळाचे राश्यातर घडू लागेल. हे राश्यांतर निवासस्थान, बगला इत्यादी बाबतीत बलवान ठरावे असा योग दिसतो. आपण तसे व्यवहारी आहात. उगाच कल्पनेच्या भराऱ्यावर आरूढ होण्याचा तुमचा स्वभाव नाही. ही खरोखर तुमची जमेची बाजू आहे. म्हणूनच मगळाचा पद्धतशीर फायदा घेऊन पावले उचला. या वेळी राजकारणात 'उचापती' करू नका.

फायद्यापेक्षा तोटाच अधिक होण्याची शक्यता आहे. सत्तेवर असलेल्या राजकीय नेत्याला सोमवार ते गुरुवार अप्रियता सहन करावी लागेल. बोलण्याचा उलट परिणाम होईल. नोकरीत अपेक्षा पुऱ्या होण्याची सध्या तरी शक्यता कमी वाटते. पण आहे त्या परिस्थितीत त्रास होणार नाही. बेकाराना बरीच पायपीट करावी लागेल. मगळवार व शुक्रवार हे तुमचे शुभ वार आहेत. ५–८–११ या तुमच्या शुभराशी आहेत. महिलांनी मोठेपणाच्या नादी लागू नये. घरात लक्ष द्यावे.

**कन्या : चिडखोरपणा आवरा**

या आठवड्यात तुमच्या रहात्या जागेलबद्द वाद अगर अडचणी निर्माण होण्याची शक्यता आहे. अर्थात त्या वादाचा अतिम निकाल तुमच्याच बाजूने लागेल व शेवट गोड होईल. पण मधल्या अनिश्चित अवस्थेत तुमचे मन बरेच दोलायमान राहील. 'असे की तसे' अशी हॅम्लेटची अवस्था तुमची होईल. यावेळी कुलदेवतेच्या उपासनेनेच तुमचे मन शात राहू शकेल. आर्थिक ताण असह्य होत आहे तो मात्र या आठवड्यात कमी होण्याची चिन्हे दिसू लागतील. येणे असलेले पैसे थोडेफार वसूल होतील. शनिवार ते मगळवार काही महत्त्वाची कामे होतील. विशेष करून नोकरीत अनुकूलता राहील. चिडखोरपणा आवरणे आवश्यक आहे. नोकरीत कामाचा ताण असला तरी वरिष्ठाचा त्रास फारसा जाणवणार नाही. शुक्रवार हा तुमचा शुभ वार आहे. २–७–१० या शुभराशी आहेत. महिलानी वादविवादात भाग घेऊ नये. मन शात ठेवावे.

**तूळ : अनिश्चितता संपेल**

नव्या सधीचा पेला तुमच्या ओठाशी येतो व अचानक दूर लोटला जातो. त्याचबरोबर तुम्ही उपेक्षच्या खोल गर्तेत जाऊन पडता. हर्शल–गुरूचा त्रिकोणयोग खरे म्हणजे नोकरी, राजकारण, सत्ता इत्यादी बाबतीत मनुष्याला वैभवाकडे नेतो. पण राहू, रवी व मगळाच्या प्रतिकूल भ्रमणामुळे तुमच्या वाट्याला उपेक्षा आली होती. ती कोंडी या आठवड्यात फुटणार आहे. तुम्ही राजकीय नेते असाल तर अत्युच्च ठिकाणी तुमच्या नावाची शिफारस होईल. सोमवार, बुधवार व गुरुवार हे दिवस नोद करून ठेवा. गुरुवार व शुक्रवार तुमचे शुभ वार आहेत. ३–८–११ या शुभ राशी आहेत. नोकरीत महत्त्वाची घटना घडू शकेल. लेखनाचा गौरव होईल. कलागुणाना अनुकूल क्षेत्र लाभेल. रेंगाळलेली कामे मार्गी लागतील. विवाहेच्छूंचे विवाह 'लगीनघाई'-वर येतील. महिलांना प्रवासाचा योग. नोकरीत बढती.

**वृश्चिक : भाऊबंदात वाद**

तुमचे वर्चस्व वाढवले आहे ते मंगळाने व तुमच्या भोवती अडचणी निर्माण करीत आहे तो हर्शल. दुसरा रवी पुढच्याच आठवड्यात तिसरा होणार आहे. मग तुमच्या अनेक इच्छा पुऱ्या होतील. तुमचे कर्तृत्व व कार्यक्षेत्र विशाल बनेल. पण या आठवड्यात मात्र परिस्थितीत फारसा फरक पडणार नाही. रविवार ते बुधवार परिश्रमाने पैशाचे काम होईल. पैशासाठी वणवण करावी लागणार आहे. पण शेवटी काम होईलच. या वेळी खरी काळजी घ्यायला हवी ती कौटुंबिक एकोप्याची. बाहेरच्या माणसाला तुमच्या भाडणात हात घालू देऊ नका. नोकरी-धंद्याच्यादृष्टीने आठवडा फारसा वाईट नाही. नोकरीत कायम होऊ शकाल. महिलांना परदेशी प्रवासाचा योग आहे. मंगळवार व शुक्रवार हे शुभवार असून ४–६–१० या शुभ राशी आहेत.

**धनू : प्रतिकूलतेला ओहोटी**

तुम्ही अडचणीने व आजाराने अगदी गाजन गेलात हे खरे पण असे दिवस फार थोडेच राहिले आहेत. प्रतिकूल परिस्थितीला व दिवसाला ओहोटी लागण्याची प्रक्रिया याच आठवड्यात सुरू होणार आहे. 'गेले ते दिवस' असे म्हणण्या इतके चांगले दिवस आता येऊ लागतील. सोमवार, गुरुवार शुभसूचक घटनाची नांदी ठरावी. नोकरीतील अस्थिरता, अनिश्चितता संपण्याच्या मार्गाला लागणार आहे. मालकाला अगर वरिष्ठाना तुमची गरज भासणार आहे. तुमचा शुभ दिवस गुरुवार आहे. त्या दिवशी दत्तउपासना करा. फळ मिळणार आहे. ६–१०–११ या तुमच्या शुभराशी आहेत. महिलानी व्यापारात शिरावे, लाभ होईल.

**मकर : सावधानता हवी**

पुढील आठवड्यात संक्रमण घडले की तुमच्या प्रगतीला वेग येऊ लागेल. अडलेली कामे रेंगाळलेल्या योजना गतीमान होऊ लागतील. तोपर्यंत मात्र सर्वच बाबतीत सावधानता बाळगायला हवी. नवराबायकोमधील भांडणे वाढवू नये. फार ताणू नयेत. नवविवाहित ससारी व्यक्तीनी मतभेदाला वाव देऊ नये. मुलाचीही काळजी घ्यावी. तरुण मुले भलत्या मोहात अडकणार नाहीत याकडे डोळ्यात तेल घालून लक्ष द्यावे. आर्थिक परिस्थितीत फारशी सुधारणा [illegible] पैशाची गरज भासेल. रविवार ते बुधवार थोडीफार सफलता व यश पदरी पडेल. तुम्ही कोणतेही काम किंवा त्याचा शुभारंभ मंगळवारी करा. यश येईल. नोकरीत दगदग वाढेल. महिलांनी चालू नोकरीत सध्या तरी बदल करू नये. तुमच्या शुभराशी २–९–११ या आहेत.

**कुंभ : स्थित्यंतराची चाहूल**

तुमच्या मनातील योजना आणि तुम्ही आखलेले बेत मनातल्या मनात जिरले व गेले काही दिवस तुमच्या मनात विरक्तीचे वारेदेखील वाहू लागले. पण हे वादळ आता थांबू लागणार आहे हा सबध, आठवडा आगामी भविष्याची व अनुकूल भवितव्याबद्दल चाहूल निर्माण करणार आहे. सोमवार ते गुरुवार इंजिनियरिंग उद्योगात तुम्हाला भागीदार मिळेल अथवा तुम्हाला आर्थिक साह्याय्य मिळेल. खत, शेती अवजारे, पोलाद, लोखड या उद्योगाच्या मालकांना, व्यापाऱ्याना नफा होणार आहे. नोकरीधद्याची स्थिती उत्साहवर्धक राहील. निराशा सपून प्रकाशकिरणे दिसू लागतील, नोकरीत बदली प्रमोशनचा विचार चालू होईल. पदवीधराचे इंटरव्ह्यू यशस्वी होतील. महिलांना लघु उद्योग सुरू करायला अनुकूलता आहे. शुभराशी ५–७–११

**मीन : नोकरीत प्रमोशन**

बाराव्या गुरुची प्रतिकूल कारकिर्द आता अगदी उताराला लागली आहे. त्याचा त्रासदेखील कमी झाला आहे. पण चौथा शनीमात्र तुमची पाठ सोडीत नाही तोपर्यंत अडखळत, रखडतच पुढे जावे लागणार आहे. रोज गुरुचरित्र वाचा व मनःशांती मिळवा. या मन शांतीखेरीज सारे व्यर्थ आहे. तरीपण हा आठवडा थोडा फार प्रगतीचाच जाईल. धद्यातील पेचप्रसग व आर्थिक अडचणी दूर होतील. महत्त्वाकांक्षेला प्रोत्साहन मिळेल. तुम्ही व्यापारी असाल तर साऱ्या अडचणीवर सहज मात करू शकाल. स्थावराचा निकाल तुमच्यासारखा लागेल. विद्यार्थ्यांचे अर्धवट राहिलेले शिक्षण पुढे चालू [illegible] सोमवारी महत्त्वाची घटना घडेल. नोकरीत तुमची मागणी मान्य होईल. महिलाना शिक्षिकेची नोकरी मिळेल. चालू नोकरीत प्रमोशन. शुभराशी २–६–१० □

# फिल्म इन्स्टिटयूटमधील वादळ

वातावरणामध्ये गरमी असली तरी त्याची तीव्रता चटका जाणवण्याइतकी प्रखर नसल्याने खाशा सरकारी ढगाने इन्स्टि-टयूटचा कारभार रीतीप्रमाणे चालू होता. खदखदत असलेले वातावरण उफाळून वर आले ते संस्थेच्या नियामक मडळाच्या वार्षिक बैठकीच्यावेळी. अभिनय विभागाच्या विद्यार्थ्यांनी साग्रसगीत तमाशा केला आणि इन्स्टिटयूट पुन्हा ' न्यूज 'मध्ये आली.

त्याचे काय झाले, दुसऱ्या सहामाहीच्या कामास प्रारभ झाला आणि ' डिप्लोमा फिल्मस् 'च्या कामाला गती मिळाली. या फिल्मस्चे विद्यार्थ्यांच्या लेखी मोल मोठे ! ! कारण विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेचे आणि या फिल्मस्चे नाते असते. इन्स्टिटयूटमध्ये अभिनयाचे शिक्षण घेणारे वीस विद्यार्थी सध्या आहेत. आपल्यापैकी अनेक मडळींची डिप्लोमा फिल्मस्मध्ये वर्णी लागत नाही, हे पाहिल्यावर अभिनय विभाग खवळून उठला आणि या विभागाचे प्रमुख रोशन तनेजा यांच्या आशीर्वादाने एक योजना हाती घेण्यात आली. सस्थेच्या नियामक मडळाच्या वार्षिक बैठकीपूर्वी वातावरण तापण्यास सुरुवात झाली आणि १९७० सालच्या जगत मुरारी विरोधी बडाची याद यावी इतकी परिस्थिती चिघळली. त्या बडाला प्राध्यापक सतीश बहाद्दूर आणि अन्य मुरारी विरोधी गटानी खतपाणी घातले. या बडामागे अभिनय विभाग प्रमुख उभे होते. निदर्शने–घोषणा–उपोषणे–हे लोकशाहीतील राजमान्य मार्ग चोखाळून झाल्यावरही–वृत्तपत्राचे आपल्याकडे लक्ष जात नाही हे लक्षात आल्यावर–माहिती आणि मंत्रालयाचे चिटणीस व नियामक मडळाचे पदसिद्ध अध्यक्ष मिया जमालभाई किडवाई याना ' घेराओ ' घालण्याचा नाट्यपूर्ण प्रकार साजरा करण्यात आला.– त्याचे साग्रसगीत वृत्त पुण्यामुबईच्या वृत्त-पत्रातून झळकले–आकाशवाणीवरून गरजले. म्हणजे पहा हृ–मुरारी गेले–संस्था स्वायत्त झाली. चाकरमानी ओझे मानेवर नसलेले कर्नाड संस्था संचालक झाले–आता सर्व अबादीआबाद असणार या कल्पनेने सुस्तावलेले–माहिती नभोवाणी मंत्रालयही या नवनाटयाने हादरले.

आपण पहिली फेरी जिकली हे लक्षात आल्यावर अभिनयात पारगत असलेली पोरे त्याच्या बुजुर्गांकडे सल्ल्यासाठी धावली. आदेश मिळाला. ' डटके रहना 'ची निश्चित भूमिका घेऊन मडळी बोलणी करावयास बसली.

हृषिकेश मुखर्जी, मृणाल सेन आणि स्वत: जमालभाई यांनी अनेक परीनी समजूत काढली. पण–बाहेरचे कलाकार अजिबात नकोत–अपवाद फक्त बाल कलाकार आणि वृद्ध मंडळी याचा ! या ताठ भूमिकेवरून अभिनय आघाडी इंचभर हलली नाही.

योग्य वेळी हालचाल होती तर–आता जे तडजोडीचे मसुदे प्रसिद्ध झाले आहेत त्यावर जरूर तडजोड होऊ शकली असती. पण वर्ष दीड वर्ष होऊनही इन्स्टिटयूटच्या गलिच्छ राजकारणामध्ये पुरेशी डूब घेऊ न शकलेले कर्नाड नेमके इथे थिटे पडले. इन्स्टिटयूटमध्ये कवडीमोल असलेली असख्य मडळी मोक्याच्या खुर्च्या अडवून आहेत. आपल्या-पैकी कोणाला तरी इन्स्टिटयूटचे सचालकपद मिळावे अशी त्याची अपेक्षा असल्याने बाहेरचा माणूस इथल्या सर्वोच्चपदी येऊन बसला हे त्याना रुचले नाही. कर्नाड यांनी ज्या दिवशी सत्तासूत्रे घेतली त्याच दिवसा-पासून त्यांना कसे हाकलता येईल याचे ' South Indian ' राजकारण रंगू लागले.

कर्नाड अभिनेते, दिग्दर्शक, लेखक म्हणून भले कितीही मोठे असोत पण इन्स्टिटयूटचे राजकारण ते समजू शकले नाहीत, हे निर्विवाद सत्य आहे. आता आताच्याच सपाचे पहा ना. सप मिटविण्यासाठी सपूर्ण Teaching Staff चे सहकार्य अभिप्रेत होते. पण सप म्हणजे गिरीश कर्नाड यांच्या घरची बाब असे एकंदर वातावरण आहे. खाजगी बैठकीत का होईना पण गिरीशजीनी I am fade up with all this non-sence ! ! असे हताशजनक उद्गार काढावेत आणि ' तोडगा ' म्हणून एखाद्या गिरणमालकाने टाळेबंदी करावी तशी टाळेबंदी घोषीत करण्याची वेळ या शिक्षणसस्थेचे सूत्रधार म्हणून त्यांच्यावर यावी यापरते दुर्दैव ते कोणते ? वर्ष सहा महिन्यात कर्नाड कावून निघून गेले तर आश्चर्य वाटू नये. बाजारात त्याच्या नावाला किमत असल्याने ते गेले तर त्यांचे काडीमात्र अडणार नाही. पण चाकरमान्या मंडळीचे तसे नाही. जाण्याची वेळ आली तर त्यांच्या डोळ्यापुढे ' काजवे ' चमकतील. अगदी जगतमुरारी झाले तरी ' Additional controller cum Additionl chief Producer ' ही खास जागा राष्ट्रपतीच्या फतव्याने फिल्मस् डिव्हिजन-मध्ये निर्माण झाल्यावर त्यानी प्राचार्यपदाची खुर्ची खाली केली. सप आणि सस्थेचे सूत्र-धार यांचे जवळचे नाते असल्याने या विषयाची जरा विस्ताराने दखल घेतली. कर्नाड यांच्या बाबतीत आणखी एक दुर्दैवी बाब म्हणजे त्यांच्या दीड वर्षाच्या कारकीर्दी-मध्ये त्यांच्या अस्तित्वाची चुणुक दाखवणारा किंचितही ठसा ते निर्माण करू शकले नाहीत. शत्रूही नाही आणि मित्रही नाही अशी त्याची विचित्र अवस्था आहे. त्याच्या हाती आता–आत्तापर्यंत कोणाही सचालकाच्या हाती नव्हते इतके अधिकार आहेत. पण कर्नाड कुणालाच दुखवायला तयार नाहीत.

संपाच्या संदर्भात झालेल्या पत्रकार परि-षदेमध्ये त्यांना विचारण्यात आले. अभिनय विभागाचे अवाजवी लाड इन्स्टिटयूटने केले–आणि तरीही त्यांना आपण अजून सवलती देता, संस्था बंद ठेवण्याच्या निर्णयाप्रत येता हे कशासाठी ? वास्तविक पहाता हा मर्मभेदक प्रश्न नेमक्या जागी बोट ठेवणारा होता :

पण–सस्थेला सर्व विद्यार्थी सारखे असे काही तरी गुडीगुडी उत्तर देऊन गिरीशजी पुढे सटकले.

### अभिनय विद्यार्थ्यांची बाजू

इन्स्टिटयूटचे प्रशिक्षण पूर्ण करून अभिनयाचा विद्यार्थी मुबईला कामासाठी गेला की निर्माता त्याला सागणार–आपकी डिप्लोमा फिल्म दिखाइये–आता त्याला डिप्लोमा फिल्म मिळालीच नसली तर त्याने काय दाखवायचे? आणि दोन वर्षामध्ये ज्याला डिप्लोमा फिल्म मिळत नाही त्याला कोणता निर्माता काम देणार? उदय चद्रा (ध्रुव) हा एक असा विद्यार्थी किंवा गीता खन्ना ही एक अशी–डिप्लोमा फिल्म नसलेली विद्यार्थिनी, या परिस्थितीमध्ये काम मिळवणे किती अवघड आहे याचे चटके घेत आहे.

या विद्यार्थ्यांच्या आणि त्यांच्या मार्गदर्शकांच्या मागण्या अशा :

१. डिप्लोमा फिल्मसाठी बाहेरचे कलाकार अजिबात बद.

२. सहा महिन्याच्या प्रशिक्षणानंतर विद्यार्थी अभिनयाचे प्रशिक्षण घेण्यास लायक की नालायक ते ठरवावे. नालायक विद्यार्थ्यांना घालवून द्यावे. परंतु डिप्लोमा परीक्षा पद्धत बद करावी व सहा महिन्यानतर कायम ठेवण्यात आलेल्या सर्व विद्यार्थ्यांना गुणवत्ता श्रेणी विरहीत प्रशस्तीपत्रे द्यावीत. इन्स्टिटयूने –रोमेश शर्मा आणि विजय अरोराला सुवर्ण पदक–प्रथम श्रेणी दिली. शत्रुघ्न सिन्हा इन्स्टिटयूच्या द्वितीय श्रेणीचा पदवीधर! हा असला प्रकार आता नकोच.

३. प्रत्येक विद्यार्थ्याला दोन वर्षात किमान तीन फिल्मस मिळाल्याच पाहिजेत.

या एकदर प्रकारामागे आणखी एक पदर आहे. सर्वसाधारणपणे अगदी मुरारींच्या जमान्यापासून अभिनय विभागाला वर्चस्व मिळाले आहे. आणि या विभागाचे विद्यार्थी सातत्याने नाव मिळवून असल्याने त्यांच्या नावाचे नगारे सारखे वाजत आहेत. पदवी-प्रदान प्रसगी प्रसिद्ध होणाऱ्या पुस्तिकेतही–या विद्यार्थ्यांची पानभर छायाचित्रे प्रसिद्ध झाली आहेत. इन्स्टिटयूट म्हणजे–'Acting Course' अशी हवा असल्याने–बाकीच्या सर्व विभागाचे विद्यार्थी नाराज आहेत. त्यांच्या मनामध्ये–अभिनय विभागाबद्दल थोडीफार असूया आहे. तिची धार प्रयत्नपूर्वक बोथट करणे जरूर आहे. याला डिप्लोमा फिल्मससाठी कलाकार निवडण्याचे अधिकार असलेले दिग्दर्शनाचे विद्यार्थीही अपवाद नव्हेत.

१ फेब्रुवारीला इन्स्टिटयूट उघडेल त्या वेळी चातुर्याने परिस्थिती हताळली तर हे वादळ विरून जाईल. सपापासून गिरीशजी अनेक गोष्टी शिकले आहेत. आणि म्हणून तेच या परिस्थितीतून मार्ग काढतील असे वाटते. या परिस्थितीमध्ये–कर्नाड आपल्या जागी घट्ट असणे अपरिहार्य आहे दुर्दैवाने कर्नाड इन्स्टिटयूट सोडून गेले तर इन्स्टिटयूटच्या एकदर प्रतिमेला फार मोठा तडा जाईल.

–प्रतिनिधी

---

पिंगे याच्याबाबत प्रथम लक्षात येते ती त्याची अत्यत पृथगात्म व्यक्तिमत्त्वसपन्न अशी भाषाशैली. आजच्या मराठी साहित्यात व पत्रव्यवसायात शैलीकार तसे मोजकेच आहेत. पु. ल. देशपांडे, दुर्गा भागवत, कृ. द. दीक्षित अगर अप्पा पेंडसे ही सहज आठवणारी काही नावे. यांच्यापैकी व्यक्तिचित्रण बहुतेकानी समर्थपणे हाताळले आहे. पिंग्याची मराठी पोसलेली तर आहेच, परतु तिला स्वत.चे असे एक फाकडे वळण आहे. त्यांच्या हातची कोणतीही चार वाक्ये सलग वाचा; हे वळण जाणवलेच पाहिजे! खेरीज कोणत्याही चागल्या शैलीकाराच्या अगी असणारे गुण : शब्दांच्या सूक्ष्म अर्थच्छटांची जाण, चित्रमयी शब्दयोजना, वाक्यरचनेची आगळी लपेट इ.

–ज्ञानेश्वर नाडकर्णी
रविवार, महाराष्ट्र टाइम्स

# शतपावली

रवींद्र पिंगे
मूल्य : रुपये दहा
राजहंस प्रकाशन

## मुक्काम भंडारा : पृष्ठ ४ वरून

गुजाराची. परंतु सीलिंगमध्ये वाटपात न आलेली. ती बाई त्या जमिनीत गेली तर मालगुजाराच्या लोकांनी तिला हाकलून लावले. हाय हाय करून रडली. मरपंचाकडे गेली. पुढाऱ्याकडे गेली. सर्वांनी कानावर हात ठेवले.

दुसरा उठला देवजी घोत्रागडे. म्हणाला मला जमीन मिळावी म्हणून मी माझी गाय विकली व दोनशे रुपये आले ते पटवाऱ्याला दिले. पटवाऱ्याने फक्तूम जमीन देऊ केली. आपल्यालाही दगा होणार म्हणून आपल्याला जमीनच नको म्हणून भर बाजारात तलाठ्याला पैसे परत मागितले. हा स्वस्थ बसणार नाही म्हणून पटवाऱ्याने कोतवाला करवी पैसे परत केले. ज्याना जमीन मिळाली होती त्यांनी पैसे किती दिले तेही लोकानी सांगितले. जमीन मिळायला पाहिजे होती, मालगुजाराच्या शेतीवर राबणाऱ्या कुळाना, शेतमजुरांना. त्यांचा पहिला हक्क. पण त्यांना बाजूला सारून ज्याच्याकडून पैसे मिळाले त्यांना जमीन देण्यात आली. शेजारच्या काद्री, जाम, उलट या गावच्या लोकानी पैसे दिल्यामुळे त्याला जमीन देण्यात आली. जमीन वाटपाचे सर्व नियम बाजूला ठेवण्यात आले. सर्व परिस्थिती लक्षात आल्यावर एक विस्तृत निवेदन कार्यकर्त्यांनी तयार केले व कलेक्टरकडे गेले. कलेक्टर म्हणाले वाटप बरोबर झाले असणार. ज्यांना जमीन मिळत नाही ते अशा तक्रारी नेहमीच करतात. तुम्ही यात कशाला पडता ? कार्यकर्त्यांनी चौकशीचा आग्रह धरला व ती करण्याचे आश्वासन कलेक्टरांनी दिले.

भंडारा जिल्ह्यातले सर्वोदय कार्यकर्ते एकत्र जमले. त्यानी या घटनेचा विचार केला व जेथे सीलिंगच्या जमिनीचे वाटप झाले असेल तेथे जाऊन पहाणी करण्याचा निर्णय घेतला. देऊळ गावच्या लोकानी न्याय मिळेपर्यंत त्याच्या पाठीशी रहायचे, आवश्यक तर सत्याग्रहही करायचा असा निर्णय झाला. जिल्ह्या सर्वोदय मंडळाचे अध्यक्ष डॉ. प्रभाकर बापट व त्यांचे सहकारी कामाला लागले. देऊळ गावची केस कमिशनरकडेही दाखल करण्यात आली. सचिवालयात मुंबईला महसूल सचिवांकडेही पाठवण्यात आली. सर्व नूर पाहून देऊळ गावच्या तलाठ्याला कलेक्टरनी सस्पेंड केले. व चौकशी करण्याचा हुकूम तहसीलदारना दिला.

कार्यकर्त्यांनी जिल्ह्यात सीलिंगच्या जमिनीचे वाटप कोठे झाले आहे याची माहिती मिळवली. एकूण छत्तीस गावात सीलिंगच्या जमिनीचे वाटप झाले होते. पैकी सव्वीस गावात कार्यकर्ते प्रत्यक्ष गेले. प्रत्येक गावात तीच कथा. कोठेही नियमाप्रमाणे वाटप झालेले नाही. सीलिंगची जमीन ही आपलीच इस्टेट समजून सरकारी अधिकाऱ्यांनी त्याची विक्री केली होती. खालपासून वरपर्यंतच्या अधिकाऱ्यांचे हात यात बरबटले होते. नुसते जमीन वाटपाकरताच पैसे घेतले असे नव्हे तर पटवाऱ्यांनी अर्ज लिहून घेण्याकरता पाच ते पंचवीस रुपये घेतल्याचे आढळून आले. प्रत्येक गावची केस कमिशनरकडे दाखल करण्यात आली.

या सीलिंग जमिनीच्या वाटाच्या प्रकरणी हिंडत असताना अनेक गावात सरकारी कावीलकास्त जमिनीचे जे वाटप झाले आहे त्यातही असेच गैरप्रकार आहेत असे लोकांनी सांगितले म्हणून ही जमीन जेथे वाटण्यात आली आहे त्या गावची पहाणी करता अनेक ठिकाणी नियमाप्रमाणे वाटपच झालेले नाही असे आढळून आले. भूमिहीनाकरता ही जमीन पण मिळाली कोणाला ? आमदाराला, सभापतीला, व्यापाऱ्याला, डॉक्टरला, वकिलाला, जमीनदारांना, ज्यांच्याकडे पैसे होते त्याना. यावर असेंब्लीत प्रश्नोत्तरे झाली. आमदार बमलेच होते. त्यांची मोठी पचाईत झाली. महसूल मंत्र्यांनी उत्तर दिले वाटप चुकीचे झाले. आता ती जमीन त्याचेकडून काढून घेण्यात आली आहे. मात्र जमीन अजून त्यांचेकडेच आहे असे कळते. या प्रकरणाच्याही केसिस कलेक्टरकडे दाखल करण्यात आल्या आहेत.

कमिशनरांकडे केसिस दाखल झाल्या. निकाल झटकन थोडाच लागणार ? रीतसर केसिस सुरू झाल्या. सर्वोदयी कार्यकर्त्यांना प्रत्येक केससाठी हजर रहावे लागले. दरम्यानच्या काळात देऊळ गावच्या तलाठ्याची चौकशी कलेक्टरच्या हुकुमाप्रमाणे तहसीलदारनी गपचिप करून टाकली. बोदु टिलुच्या बायकोला तिचे पैसे व दागिने परत देण्यात आले व तिला गप्प बसवण्यात आले. चौकशीच्या वेळी तक्रार करणाऱ्या सर्वोदयी कार्यकर्त्यांना बोलावण्यात आले नाही. देऊळगाव गावात चौकशी झाली नाही. तहसीलदारनी निर्णय दिला वाटप नियमाप्रमाणे झालेले नाही. बाकी आरोप खोटे आहेत. कलेक्टरनी सर्वोदयी कार्यकर्त्यांना खुश करण्याकरता पटवाऱ्याला तबी देऊन त्याची बदली केली. कमिशनरनी तब्बल दोन वर्षांनी देऊळ गावचे वाटप रद्द ठरवले व फेर वाटपाचा निर्णय दिला. त्यांच्याकडे दाखल केलेल्या अठरा केसिसपैकी सहा केसिसचा निकाल त्यानी दिला व त्या सहाही गावचे वाटप रद्द केले. बाकीच्या केसिस अजून धूळ खात पडल्या आहेत. परंतु त्या सर्व गावचे वाटप रद्द होईल. मुख्य प्रश्न आहे हे गैरवाटप व भ्रष्टाचार करणाऱ्या सरकारी नोकराचे काय ? त्याना जाब विचारला जाणार की नाही ? त्याची चौकशी झाली पाहिजे. ही आता सरकारची जबाबदारी आहे. पैसे घेऊन जमीन देणाऱ्या सरकारी अधिकाऱ्याना शिक्षा व्हायला नको काय ? महाराष्ट्र शासन काय करते पहायचे. □

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक **श्री. ग. माजगावकर** यानी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव पेठ, पुणे ३० येथे छापून १०२५ सदाशिव पेठ, पुणे येथील संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले. सं. **श्री. ग. माजगावकर**